Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख ३ माहे जुलै सन १९१६ इ० [ अंक २६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटींशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भत्त्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

## कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळाविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण-मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

---

## अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० २

---

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षांचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं १ } S. Clements, एजंट

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

---

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साधीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें ग्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

---

### खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा ३ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता.
रामचंद्र सदाशिव मार्कंडे
उद्धवजी मोहला नागपूर शहर

## नोटीस

नोटिस. बेशमी तान्ही मर्द टीकाराम पाटील २ रा. सूर्यभान खारोडे रा. उभयता वरूड बिहाड्याचे पो. तेल्हारा ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार नोटिस देतो ऐसाजे तूं (तान्ही) माझी लग्नाची बायको असून लग्न झाल्यावर तूं सुमारें ८-९ वर्षें माझे जवळ नांदलीस. अलीकडे २-२॥ महिन्या पूर्वीं तूं आपल्या बापाच्या फुसलावणीवरून मी घरीं नसतांना घरचा सुमारें ९९० रु. नगदी व अंगावरचे दागीने असा ऐवज घेऊन त्याचे बरोबर निघून गेलीस. तुला आणण्या करितां बरीच खटपट केली, निरोप पाठविले परंतु तुझा तुझ्या बापाच्या फुसलावणीवरून येण्याचा बेत दिसत नाहीं. करितां तुला या नोटिशीद्वारें बजावतो कीं, ही नोटिस पावतांच ८ दिवसांत वरील ऐवजासह माझे घरीं निघून यावें. तसें न केल्यास उपरिनिर्दिष्ट ऐवजासह तुला ताब्यांत घेण्या करितां योग्य सरकार मार्फत तजवीज करण्यांत येईल. दुसरें रा. सूर्यभान यांस ही बजावतो कीं मी तुमच्या मुलीस नागवित असतां तुह्मी ही विनाकारण भानगड उपस्थित केली आहे. अशा तऱ्हेनें मुद्दाम आमच्या संसारांत व्यत्यय आणून पुढें तुह्मी मुलीच्या खावटीबद्दल तकरार कराल तर मी ऐकणार नाहीं. व तुमच्या या विनाकारण खटपटीबा॥ सरकारकडे दाद मागावी लागेल. माझे बायकोस घेऊन जातांना तिला फुसलाऊन घरांतून ९९० रु. किंमतीचा ऐवज तुमच्या मार्फत लांबविला गेला आहे. त्यांस तुह्मी जबाबदार आहांत. या ऐवजाबद्दल दागिन्याबद्दल व बायकोस ताब्यांत मिळण्याबद्दल मला योग्य सरकारकडे खटपट करावी लागल. व त्यांस लागणाऱ्या खर्चास तुह्मास जबाबदार धरण्यांत येईल. क. ता. २६-६-१९१६

सही

१ टीकाराम चंद्रभान पाटील रा० जळगांव नाटे पो. आडगांव

नो० नं० २२०

## नोटीस

नोटीस बेशनी खुशालसींग वा॥ काशीराम परदेशी रा० धाड हल्लीं मु॥ कारखेड ता० बऱ्हाणपूर जि. खानदेश

यांसः

नोटीस देणार इसामोद्दीन ताजोद्दीन रा० धाड नोटीस देतो ऐसा जे कीं तुह्मी माझा कजबे धाड येथील सर्वे नंबर १७ हा १० वर्षाकरितां स्वामित्वानें घेतला. त्यांत तुह्मी ४ वर्षें वाहीले. बाकीचीं सालें भरणें आहेत. आतां पेरणीचा वेळ असून तुमचा अद्याप पावेतों पत्ता नाहीं. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत तुह्मी येऊन शेती पेरावी नाहींतर सदहू शेती मी स्वतः वाहीन व तुमचा मजवर कौलपत्र्यासंबंधीं कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळावें तारीख २२-६-१६ इसवी दस्तुर मनोहर गोविंद देशपांडे अर्जनवीस रा० बुलडाणें

सही उर्दूत

इसामोद्दीन वा॥ ताजोद्दीन रा. धाड

नो. न. २२१

---

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ शुद्ध ३ शके १८३८

## विद्यार्थी आणि जनता.

सध्याच्या विद्यार्थीवर्गाची स्थिति कोणालाही कींव वाटण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. युनिव्हर्सिटी दरसाल त्यांचा अभ्यासक्रम वाढवीत चालली आहे. त्यांच्या शिक्षणाच्या सोयी व शाळांच्या संख्या वाढत्या प्रमाणांत होण्यास हव्या, पण उलट त्या कमी होत आहेत. परीक्षांत होणाऱ्या निष्ठुरपणाच्या कत्तलीकडे कोणी लक्ष देत नाहीं आणि गरीब, निराधार, निरपराधी विद्यार्थ्यांचा आक्रोश अरण्यरुदितासारखा निष्फळ होत आहे. घरीं गरीबीच्या स्थितींत आपण आईबापांना द्रव्यद्वारा मदत करण्यास तूर्त असमर्थ असल्याबद्दल त्यांच्या मनाला तळमळ लागलेलीच आहे. अल्पवयांत आईबापाच्या हौसेस्तव विवाहास संमति देतांना त्यांना आपलीं समाजसुधारणेचीं तत्त्वें गुंडाळून ठेवावीं लागतात, व विवेकाच्या वाणीचा अनादर करावा लागतो, याबद्दल होणारें दुःख मनांतल्या मनांत दाबून ठेवणें भाग पडतें. या विवाहामुळें लवकरच येऊन पडणाऱ्या प्रापंचिक जबाबदाऱ्या लक्षांत येऊन उरांत धडकी भरतच आहे. अशा स्थितींत विचाराच्या दृष्टीनें तरी स्वतंत्रता असावी तर तें ही नाहीं. त्यांना स्वराज्याबद्दलचे विचार ही मनांत आणतां उपयोगाचें नाहीं. परवानगीवांचून कोणत्याही सभेला जावयाचें नाहीं; कसल्याही संस्थेशीं संबंध ठेवावयाचा नाहीं, व वर्तमानपत्रें वाचावयाचीं नाहींत. आमच्या हिंदुस्थानचे उन्नतीचे भावी आधारस्तंभ जो सध्याचा तरुण विद्यार्थ्यांचा वर्ग त्याची अशी शोचनीय स्थिति आहे. आपली स्वतःची ही स्थिति पाहून आणि विलायतेंत हिंदी विद्यार्थ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांची कशी सक्त नजर आहे, बंगालमध्यें घडणाऱ्या दरोड्यांचा संबंध तेथील विद्यार्थ्यांशीं जोडून देण्यास आंग्लोइंडियनपत्रकर्ते कसे टपलेले आहेत, विद्यार्थ्यांना प्रोफेसरांनीं तुसडेपणानें किंवा अन्यायानें वागविलें असतां तो अपमान मुकाट्यानें सहन न करण्याइतकी तेजस्विता विद्यार्थ्यांनीं प्रकट केल्याबरोबर तिचा कसा विपरीत अर्थ होतो, वगैरे गोष्टी पाहून आमच्या विद्यार्थ्यांच्या मनांत केवढी खळबळ उडत असलेली पाहिजे, त्यांच्या उत्साहाचा केवढा भंग होत असला पाहिजे, व त्यांचे चित्त किती व्यग्र होत असलें पाहिजे यांची बरोबर कल्पना कोणाला करतां येणार आहे? विद्यार्थ्यांच्या दुःखावर डागण्या देण्यासाठींच जणूं काय त्याबरोबर असें ही सांगण्यांत येते कीं विद्यार्थीवर्गाचा हा सगळा छळ त्यांच्या भावी कल्याणासाठींच चाललेला आहे. अभ्यासक्रम बेसुमार वाढविला तो त्यांच्यांत सर्व विषय पारंगत नामांकित विद्वान् निर्माण व्हावेत. ह्मणून परीक्षांतून कत्तल उडते ती कच्चा अभ्यासाचे स्थितींत वरच्या वर्गांत जाऊन तेथें त्यांची फसगत न व्हावी येवढ्या साठीं. अपक्व वयांत त्यांचीं लग्नें करावयाचीं तीं त्यांची मनोवृत्ति उच्छृंखळ न होवां प्रेमपाशानें बद्ध होऊन राहावी येवढ्यासाठीं. त्यांच्या विचार स्वातंत्र्याला आळा घालावयाचा व त्यांच्या वर्तनावर करडी नजर ठेवावयाची ती त्यांच्या हातून कल्पनेच्या भरारींत अविचाराचें एखादें कृत्य होऊं नये ह्मणून. अध्यापक त्यांना तुसडेपणानें वागवितात तेंही अहंभावाचें वारें त्यांच्या डोक्यांत न शिरतां त्यांचे ठायीं शालीनता यावी यासाठीं, वगैरे वगैरे. पण या बाह्यतः समर्पक दिसणाऱ्या समजुतीनें त्यांच्या मनाचें समाधान खरोखर होणार आहे काय ? त्यांच्या अंतःकरणाची तळमळ अशानें कितीशी शांत होण्याचा संभव आहे ? त्यांच्या मनाची व्यग्रता नाहींशी होऊन त्यांचें खरें कर्तव्य जें अध्ययन तिकडे त्यांचें लक्ष एकाग्र होणें कितीसें शक्य आहे ? या गोष्टींचा कोणीच विचार करीत नाहीं हें आश्चर्य आहे. सध्यां समाजाचें नायक राजकीय, सामाजिक व त्याच प्रमाणें इतर बाबतींत आपले स्वतःचे हक्कांस जगण्यासाठीं, अन्यायाचा निरोध कारण्यासाठीं, गमावलेले विचार व उच्चार स्वातंत्र्य पुनः मिळविण्यासाठीं व स्वाभिमान आणि स्वदेशाभिमान यांची स्थापना करण्यासाठीं जी धडपड करीत आहेत ती पाहून आपण ही आपले विषयींचा अन्याय दूर करण्याकरितां व आपले वाजवी हक्क मिळविण्याकरितां कायदेशीर, व नीतीशीं पूर्ण सुसंगत अशा उपायांचें अवलंबन कां करूं नये असा विचार तरुणांच्या मनांत न येणें शक्य आहे काय ? जर नाहीं, तर तरुणांच्या डोक्यांतले स्वातंत्र्याचे विचार, हक्कांविषयींच्या त्यांच्या कल्पना, अन्यायाचे निर्बंधापासून त्यांच्या मनांत उत्पन्न होणारी विकृति वगैरे गोष्टींना योग्य वळण लावण्याचे सोडून ती अंतीबात दाबून टाकण्याचे प्रयत्न शहाणे ह्मणविणाऱ्यांकडून चालले आहेत याचा अर्थ काय? तरुणांचे सगळेच विचार, समजुती, कल्पना तरंग, वगैरे गोष्टी शुद्ध, समयोचित, व परिस्थित्यनुरूप आहेत असें आह्मी ह्मणत नाहीं. ते तसे नाहींत असेंच आह्मी पुष्कळ वेळां ह्मटलें आहे. त्यांना गोडी गुलाबीनें व प्रेमानें सुधारण्याचा यत्न करण्याचें सोडून जबरदस्तीनें त्यांच्या विचाराचा अंकुर खर्ची करण्याचे जे प्रयत्न चालले आहेत त्यांवर आमचा कटाक्ष आहे. ही दिशा सोडून प्रेमानें त्यांची सुधारणा घडवून आणणें हें जनतेचें कर्तव्य नाहीं काय? पण असे प्रयत्न कोठें चालले आहेत ?

---

## राष्ट्र शील.

( मागील अंकावरून पुढें चालु. )

मनुष्यास प्रेम, अद्वेष आणि श्रद्धा या गुणांची अतिशय जरूर आहे. ही मनुष्याची बौद्धिक शोभा आहे. ही त्याच्या चेहऱ्यावर, आसनावस्थेवर, आणि प्रत्येक व्यापारावर ठळठळीत उमटलेली असतात.

जर आपण जन्मास येतांच जसा प्रातःकाळीं प्रभातकाळाबरोबर टवटवीतपणा येतो, त्या प्रमाणें अशाच प्रकारचा जोम आपणास मिळेल, तरच आपणास आपली पुढें स्पृहणीय अवस्था होईल असें मानण्यास जागा मिळेल.

तैतरेय उपनिषद, भारत, नीतिग्रंथ आपणास खरें बोलावें असें शिकवितात. आपल्यांतील प्रत्येकजण विचार करील तर त्यास असेंच आढळून येईल कीं आपला बहुतेक व्यवहार अनृत भाषण करून दुसऱ्यास फसवण्यांत होत असतो. बहुतेक सर्व लोक सत्यास मिथ्या मान देत असतात. आणि त्याच सत्यास पायाखालीं तुडवीत असतात. कोणी आत्मलाभासाठीं तर कोणी फाजील चौकसपणानें दुसऱ्याचे व्यापार जाणण्याच्या बुद्धीनें, कोणी मनोरंजनार्थ तर कोणी अहंमन्यता संपादण्यासाठीं, कोणी आपला अर्थ छपविण्यासाठीं तर कोणी दुसऱ्याचा नाश घडवून आणण्यासाठीं मिथ्याचार बनलेले आढळतात. सत्य हा गूण आपल्या समाजांतून बहुतेक नष्ट झाला आहे. गीतेमध्यें दसऱ्या अध्यायांत ६२ आणि ६३ श्लोकांत वासनेपासून क्रोध उत्पन्न होतो, क्रोधापासून भ्रम आणि भ्रमापासून आपल्याला वेळेवर पूर्ण उदाहरणानें वेळेवर उपयोगी पडण्यासाठीं जमा केलेले स्मरण भांडार नाहींसे होते; आणि स्मरण भांडार नाहींसे झाल्यावर मनुष्याची सारासार विचार करून निश्चय करण्याची शक्ती जिला बुद्धी असें ह्मणतात तीच नाहींशी होते. त्या प्रमाणें व्यवहारांत एकदां कां खोटें बोलण्याची संवय लागली कीं संपूर्ण समाजाचा नाश झालाच ह्मणून समजावें.

हल्लीं आपणास समाज चिरस्थायी कसा होईल व पूर्वजांनीं केलेले उद्योग आपण पुढें कसें चालू ठेवूं याची योजना करणें आहे. एक इंडियन सिव्हिल सर्व्हंट प्रथमतः हिंदुस्थानांत येत असतां त्याचे बरोबर एक फ्रेंच गृहस्थ जहाजांत प्रवास करीत होता. कांहीं कारणानें दोघाही जवळचे पैसे एकाच वेळीं सरले. दोघांनीं जहाजाच्या अधिकाऱ्याजवळ पैसे उसनवार मागितले. त्यानें इंग्रज गृहस्थास बिनव्याजी कर्ज दिलें आणि फ्रेंच गृहस्थ परत येतांना तिप्पट पैसा देईन असें कबूल करीत असतांही त्यानें त्यांस पैसे दिले नाहींत. शेवटीं या सिव्हीलियनानें त्याच अधिकाऱ्याजवळून अधिक कर्ज घेऊन त्या फ्रेंच गृहस्थास आपण कर्ज दिलें. मार्शलचे Economics of Industry इंग्लिश मजुरांची फार वाखाणणी करते. त्या पुस्तकांत ह्मटलें आहे कीं एका इंग्लिश मजुराबरोबर तीन फ्रेंच मजूर काम करितात. आणि एका फ्रेंच मजूराबरोबर यूरोप खडांतील दुसरे ३ मजूर काम करूं शकतात. इंग्रजी मजुरास केव्हां ही कोठें ही काम मिळण्याची अड-

अडचण पडत नाहीं. या देशांत देखील इंग्लिशमनच्या सत्यप्रियतेचा अनुभव बहुतेक सरकारी नोकरांस आलेला आहे आणि असतो. या देशांत चढून अधिकार संपन्न झालेल्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं काम करण्याचा प्रसंग ईश्वरानें आपणावर आणूं नये अशी करुणा भाकणारे अनपवाद लोक आढळतात. किती ही दुष्ट युरोपीयन अंमलदार असला तरी तो त्याच्या आश्रितवर्गास पुरवतो. हें तत्व कष्टानें कबूल करावें लागते. देशोन्नतीस राष्ट्रीयशील अवश्य आहे. राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याचे ढोबळमानानें चित्र काढूं गेले असतां सारखें उठलें पाहिजे. बारीक खोचा खोचा वेगळ्या पडल्याच पाहिजेत. पण स्थूल स्वरूप एकसारखें असलें पाहिजे. जन्म दैवायत्त आहे. परंतु स्वौज आपल्या आपल्या स्वाधीन आहे. मिथ्याचार दांभीक, ढोंगी वगैरे बहुविध असत्यानुवर्ती लोकांचा समाजानें तिटकारा करूं लागले पाहिजे. त्यांच्या कुटील बुद्धीची होत असणारी तारीफ बंद झाली पाहिजे. सारांश, नष्ट झालेली धर्म बुद्धी पुनः जागृत झाल्याशिवाय सत्यप्रीती येणार नाहीं. सत्यप्रीती हा असा गुण आहे कीं तो जर एकदां लाभला तर इतर गुण आपोआप लाभतात. या साठीं आपल्या लोकांत खरी धर्म जागृती झाली पाहिजे. ती झाल्याशिवाय सत्यप्रीती उत्पन्न होणार नाहीं. आणि हीं दोन्हीं नसतील तर राष्ट्रीयशील बनणार नाहीं. प्रत्येक समाजहितेच्छूनें या दिशेनें प्रयत्न केल्याशिवाय देशकार्य होणें नाहीं.

---

## मोठी उणीव.

या शहराला बऱ्याच उणीवा आहेत. सर्वांत मुख्य एका अधीक हायस्कुलाची अतीशय तीव्रतेनें भासूं लागली आहे. हें स्थल हल्लींच्या सरकारी हायस्कुलांत कय न्यूनें आहेत हें पाहण्याचें अगर दाखविण्याचें नाहीं. युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी प्रवेश परीक्षेत दरसाल शेंकडा पन्नासच्या प्रमाणानें नापास होतात ह्मणजे पहिल्या वर्षाचे विद्यार्थी दुसऱ्या वर्षासाठीं गाळून ५० राहतात. त्यांतील २५ दुसऱ्या वर्षी पसार होऊन तिसऱ्या वर्षासाठीं २५ मुलें राहतात. शाळा खात्याच्या नियमाप्रमाणें अशा मुलांस घेतां येत नाहीं ह्मणजे आज जर मॅट्रिक्युलेशनच्या वर्गांत १०० नव्या मुलांची भरती झाली तर त्यांतील २५ मुलांस शाळेंत २ वर्षे वृथा घालवून कोणत्या ही तादृश लभाशिवाय घरीं बसण्याची सुलभ योजना शाळा खात्यानें पहिल्यापासूनच करून ठेवलेली आहे असें ह्मटलें असतां फारशी हरकत नाहीं.

शाळेच्या सांप्रतच्या निवडणुकीनें मुलें घेण्याच्या पद्धतीमुळें बहुतेक लोकांस कोठेंना कोठें तरी वशीला लावावा लागत असतो. भीड ही कोठें नाहीं? ज्यांच्या हातीं मुलें घेण्याचें असतें त्यांच्या बद्दल लोकांत विनाकारण भलत्याच आफवा उठत असतात. शाळाखात्याइतकें पवित्र अगर सात्विक खातें पोष्ट खात्याशिवाय आमच्या मतें क्वचितच असेल. परंतु हल्लींच्या अनियंत्रित निवडणुकीच्या धोरणानें बऱ्याच मास्तरां विरुद्ध निरनिराळ्या तक्रारी ऐकूं येतात. या चाळणीच्या तत्वामुळें आणि २ वर्षां नंतर अनुत्तीर्ण मुलांस शाळेंत न ठेवण्याबद्दल जे नियम आहेत त्या विरुद्ध जितकें लिहावें तितकें थोडेंच होईल. प्रथमतः मुलांचे त्यांच्या अध्यापकावरचें अवलंबन प्रायः नष्ट होतें. त्यांत शिक्षकांचें तिकडे दुर्लक्ष असेल तर ते जें शिकवितात तर तें दुसऱ्या बाह्य मदतीनें शिकून घ्यावें लागते. अध्यापकाची स्वतःच्या मुलावर असते तशी त्याच्या छात्रवर्गावर प्रीती नसते. विद्यार्थ्यांच्या कालाकडे अगर नैपुण्याकडे शिक्षकाचें दुर्लक्ष होऊं लागतें. व यामुळें विद्यार्थी वर्गाचें नुसतें नुकसानच होत नाहीं तर त्या वर्गामध्यें सर्व अवगुणांतील श्रेष्ठ अवगुण Nil Admirari हा अवगुण जडतो. असत्यप्रियता आणि Nil Admirari हे दोन अवगूण सख्खीं जुळीं भावंडें आहेत. हल्लींच्या विद्यार्थी वर्गात शिक्षकाबद्दल विशेष अनुदारता आढळून येते. शिक्षकाच्या वर्तनाचा विद्यार्थ्यांचे मनावर कांहींच ठसा उमटेनासे झालें आहे. त्यामुळें विद्यार्थ्यांमधील आत्मबोध शक्ती कमी होत जाऊन स्वैर वर्तनाकडे त्यांचा ओढा अधीक होऊं लागला आहे. शाळेंत जाऊन मुलानें पहिली गोष्ट शिकावयाची ह्मणजे आत्मनियंत्रण, सुव्यवस्थितपणा, मर्यादानुसार वर्तन, असत्य द्वेष, स्वाध्याय संप्रयोग आणि मनोरश्मी संयमन हीं होत. शिक्षण अभिष्ट तर खरेंच, पण त्याचा अभिष्टपणा त्याच्या परिणामावर आहे. यासाठीं मुलें घेतांना जर एका कडक नेमानें किंवा तीं घेतल्यानें मुलांस फायदा पोहचेल, अगर पोंचणार नाहीं या दृष्टीनें अगर मुलांचें ठायीं शिक्षकाची जी कळकळ असते, त्या कळकळीच्या दृष्टीनें घेतली जातील तर हल्लींच्या पद्धतीस बरेंच सौम्य स्वरूप प्राप्त होईल, परंतु तसें होत नाहीं हा सर्वदूर अनुभव आहे.

या शहरांत आपल्या विद्वत्तेनें श्रमक्षम्यतेनें, उत्साहानें ही स्थिती दूर करण्यासारखे बरेच लोक आहेत. परंतु अशा कामास अगदीं मूलारंभीं थोड्या स्वार्थत्यागाची, उत्साहाची आणि त्याजबरोबर उदारपणाची जरूरी असते. हल्लींच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या आणि राष्ट्रीय उन्नतीच्या ओघांत पुण्यांतील नूतन मराठी विद्यालयासारख्या संस्था इतरत्र निघत नाहींत, याचें कारण अशा कमफायद्याच्या संस्था काढून लोककार्य साधण्याची लोकांतील वासना कमी होत चालली आहे. या शिवाय दुसरें कारण आह्मांस दिसत नाहीं. अशा शाळा एका व्यक्तीच्या नसून एका लहानशा वर्गाच्या असतात. त्या वर्गाचा परस्पर विश्वास नसेल अगर परस्पर आदर नसेल तर शिक्षण इतकें विस्तृत झालें असूनही आपली संघशक्ती किती लुप्तप्राय होत चालली आहे याचें उदाहरण पाहण्यास दुसरीकडे जाण्याची अवश्यकता नाहीं. उमरावतीस कॉलेज काढण्याचा सरकारचा विचार आहे. तेंच कॉलेज खासगी प्रयत्नानें उमरावतींतील अगर येथील विद्वानांनीं कां काढूं नये हें आह्मास समजत नाहीं. अल्प उद्योग बीजरूप असतो. त्याचा पुढें मोठा फलदायी वृक्ष होतो, परंतु इतकी सहनशीलता अगर तितीक्षा ज्या समाजांत नसतील तो समाज नुसता एखाद्या मनोरंजन संवांत बसून दुसऱ्यावर अहितकर निंदाप्रचुर भाषणें करून कालक्षय करण्यालायक आहे या शिवाय दुसरें अनुमान काढतां येणार नाहीं.

प्रत्येक गोष्टीसाठीं रयतेनें सरकारच्या मुखाकडे पहात असावें हें ही समाजाच्या अपकर्षाचें द्योतक आहे. तरीपण अशी स्थिति असल्यामुळें तिलाच थोडें गिरविणें अनिष्ट होणार नाहीं. ज्यांच्या विद्वत्तेनें आणी करारी स्वभावानें मुलांचे आचरणावर कांहीं तरी ठसा उमटेल असे चार दोन शिक्षक नेमून Municipal A. V. School ची सांप्रतची मर्यादा म्युनिसिपालिटीनें कां वाढवूं नये हें ही आह्मास कळत नाहीं. आह्मास राजकीय हक्क पाहिजेत. परंतु ते आह्मास सुप्तावस्थेंत कोणी दिले पाहिजेत. आह्मास श्रम करावयास नकोत; पण दुसऱ्यास दोष द्यावयास पाहिजे. कांहीं स्वसुखानिरभिलाष परोपकारी महार्घ माननीय गृहस्थांच्या मनांत ही कल्पना उद्भवली आहे; परंतु असे विचार ज्यांच्या हातून हें कार्य पार पडण्यासारखें आहे त्यांनाच सुचलें पाहिजे. आपल्या योजकपणानें त्यांनीं प्रत्युपरोधांचा विचार करून ते दूर करण्यासाठीं सन्माननीय लोकांची मदत मागितली पाहिजे. तसें होत नाहीं तोंपर्यंत म्युनिसिपालिटीनें तरी हा प्रश्न हातीं घ्यावा व यंदाच जमल्यास हा कोंडमारा बंद करावा अशी आमची सूचना आहे.

---

## गेल्या सालांतली सहकारी चळवळ.

नुकत्या प्रसिद्ध झालेल्या सरकारी वार्षिक रिपोर्टावरून दिसतें कीं गेल्यासालीं मध्यप्रांत व वऱ्हाड या दोन प्रांतांत शेतकी विषयक सहकारी पतपेढ्यांनीं चांगलें काम केलें. त्यांची संख्या गतवर्षी २०८३ होती ती वर्ष अखेरीस २१५४ झाली. १२० नव्या पेढ्या स्थापन झाल्या, व जुन्या पेढ्यांपैकीं ५६ बंद झाल्या. मेंबरांची संख्या ३४२४२ होती ती ३६९८१ झाली. ही या पेक्षांही अधिक झाली असती, पण अलीकडे नवीन मेंबर करतांना ज्यास्त चौकसपणा ठेवण्यांत येत असतो, आणि हें कांहीं वाईट नाहीं. मेंबरांच्या ठेवी, रिझर्व फंड, व मध्यवर्ती पेढीचे शेअर घेण्यांत खर्चलेली रकम मिळून एकंदर फंडाची रकम गतवर्षी १९३२२३ रु. होती, ती रिपोर्टाच्या सालीं २८६३४० रु. झाली. ही गोष्ट तर फारच समाधानकारक आहे. इतका पैसा लोकांचा विश्वास या पेढ्यांवर असल्याशिवाय त्यांनीं पेढ्यांचे स्वाधीन खास केला नसता. शेतकी विषयक पण पतीशिवाय अन्य कारणांसाठीं १८ सोसायट्या रजिस्टर करण्याबद्दलचे अर्ज आले, पण अशा सोसायट्यांवर तज्ञ माणसांची देखरेख चांगली लागते व त्यांची व्यवस्था चांगली असण्याची ही अवश्यकता अधिक असते या व दुसऱ्या कांहीं अज्ञात कारणामुळें सरकारी अधिकाऱ्यांनीं हे अर्ज मंजूर केले नाहींत. हीं दुसरीं कारणें अधिकाऱ्यांनीं गुल्दस्तांत ठेविलीं आहेत, तेव्हां तीं तशींच गुप्त स्वरूपाची असलीं पाहिजेत. शेतकीच्या कामाला तज्ञांची मदत आणि सहकारीतत्त्व यापासून किती फायदा होत आहे याचें उत्कृष्ट उदाहरण सिहोरा येथील सेंट्रल ब्यांकेचें देतां येईल. या ब्यांकेनें तज्ञांच्या सल्ल्यानें निवडक बीं २६५६ मण आणिलें होतें. पण त्याला इतकी मागणी आली कीं पुष्कळांना नाहीं ह्मणावें लागलें. ज्यांनीं तें बी पेरलें त्यांचा विलक्षण फायदा झाला हें पाहतांच मागणी वाढली. शेतकऱ्यांना बीं पुरविणाऱ्या युनिअनला जरी विशेष फायदा झाला नाहीं, तरी शेतकऱ्यांना तो बराच झाला. पांच सेंट्रल ब्यांकांनीं शेतकीचीं सुधारलेलीं आउतें ही लोकांच्या उपयोगार्थ आणविलीं. या यंत्रानें पेरणी, कापणी वगैरे कामें झटपट व कमी खर्चानें होतात हें पाहिल्याबरोबर या आउतांना ही तशीच मोठी मागणी आली. सारांश, शेतकरी लोकांना आतां या सहकारी चळवळी पासून होणारा खरा फायदा दिसूं लागला आहे. याबद्दलचें बरेंचसें श्रेय मि. इव्हान्स यांच्या अखंड परिश्रमाला देणें योग्य आहे. हे मध्यप्रांतासंबंधानें झालें. वऱ्हाडांत मि. रिची यांनीं कॉटन-युनिअन नांवाच्या कापसाच्या संबंधाच्या संस्था काढल्या आहेत. अशा ११ संस्था नोंदलेल्या आहेत. बिननोंदलेल्या संस्था बऱ्याच असल्या पाहिजेत. या संस्था ही बीं पुरविण्याचें काम करतात. पण बिननोंदलेल्या संस्थांवर देखरेख असण्याची अवश्यकता दिसते. कारण, त्यांच्या संबंधानें कांहीं तक्रारी आल्या आहेत. नोंदलेल्या युनिअननीं रिपोर्टाच्या सालीं रोसिअम कापसाचें शुद्ध बीं ५७९५०४ पौंड काढलें व त्यापासून २९८०० रुपयांचा फायदा मिळविला. बिननोंदलेल्यापैकीं ज्यांनीं शेतकी खात्याशीं संबंध ठेविला होता अशा युनिअनांना ही २५५६० रुपये नफा झाला. मध्यवर्ती पेढ्यांच्या संबंधांत रजिस्ट्रार साहेबांनीं आपल्या रिपोर्टांत काढलेले उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. ते ह्मणतात 'सहकारी चळवळीचें भवितव्य यापुढें मध्यवर्ती पेढ्यांच्या कामाच्या उत्कृष्टपणावर आहे. त्या जर नुसती सावकारी करून समाधान मानतील आणि स्वस्थ बसतील, तर लवकरच त्यांची गरज उरणार नाहीं. पण सावकारी हें कांहीं आपलें खरें ध्येय नाहीं, मुख्य उद्देश काटकसर शिकविणें, शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढविणें, आणि शेतीची वाढ व उत्कर्ष करणें हा असून सावकारी हें फक्त तो उद्देश सफळ करून घेण्याचें साधन आहे हें जर त्या पेढ्या ध्यानांत धरतील, तरच त्यांना लोकांकडून आश्रय मिळेल., आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो (व सरकारी अधिकाऱ्यांनीं ही या गोष्टीचा रिपोर्टांत उल्लेख केला आहे) कीं आमच्या येथील (आकोल्याच्या) मध्यवर्ती पेढीनें हा उद्देश पूर्णपणें ध्यानांत ठेवून लोकांना केवळ कर्ज देण्यांतच इतिकर्तव्यता न मानतां आईल इंजिनें व कडबी कापण्याच्या यंत्रांचा उपयोग वगैरे गोष्टी लोकांना शिकविण्यासाठीं एका इन्स्पेक्टराची योजना केली आहे. अशा स्तुत्य उद्योगाला डिस्ट्रिक्ट बोर्डानें ही १२०० रुपयांची वार्षिक ग्रांट देऊन मदत केली आहे

वरील हकीकतीवरून हें दिसून येईल कीं सहकारी तत्त्व हें आतां आमच्यांत बद्धमूल होत चाललें आहे, लोकांना त्याचें महत्त्व कळूं लागलें आहे व निरनिराळ्या प्रकारें त्या तत्त्वाचा उपयोग करून शेतकीच्या धंद्याला उर्जितावस्थेला आणण्याचे खरे कळकळीचे व योग्य दिशेनें प्रयत्न सुरू झाले आहेत. या कामीं सरकार जें अमोल साह्य देत आहे त्याबद्दल शेतकरी व एकंदर जनता चिरकाल ऋणी राहील यांत शंका नाहीं.

## स्वदेशी रंग.

संयुक्त प्रांताचें सरकार देशी उद्योगधंदे वाढविण्याचे कामीं बरेंच मन घालीत आहे व त्याबद्दल तें स्तुतीस पात्र आहे. या सरकारच्या व्यापारी खात्याकडून देशी रंगासंबंधाची कांहीं माहिती प्रसिद्ध झाली आहे. तिच्या वरून असें कळतें कीं युद्ध सुरू होतांच जर्मन रंग इकडे येणें बंद होऊन रंगासंबंधानें अडचण पडेल हें धोरण त्या सरकारानें बांधून स्वदेशी वनस्पती वगैरे पासून रंग तयार करतां येतील कीं नाहीं याबद्दल प्रयोग करून पाहण्यास सुरुवात करण्यांत आली होती. आतांपर्यंत अनेक वनस्पति व खनिज पदार्थांवर प्रयोग करण्यांत आले व त्यावरून खात्री झाली कीं रंग काढण्यासारखे पुष्कळच पदार्थ या देशांत आहेत, आणि आमच्या लोकांनीं आजपर्यंत निष्कारण जर्मन रंगांवर सगळी भिस्त ठेवून देशी रंग तयार करण्याची आपली पिढीजाद विद्या हातची घालविली आहे. ही गोष्ट खरी कीं वनस्पति किंवा खनिज पदार्थ रंग काढण्यासाठीं जितके शुद्ध स्वरूपांत मिळावयास पाहिजेत तितके ते मिळत नाहींत. रंगांच्या निरनिराळ्या छटा जशा उत्तम प्रकारच्या याव्या तशा अशुद्ध द्रव्याच्या मिश्रणामुळें येत नाहींत. यासाठीं पाहिली अवश्य गोष्ट म्हणजे ही आहे कीं हीं द्रव्यें शुद्ध करून घेतलीं पाहिजेत, व ज्यांपासून रंग निघतो तीं द्रव्यें कापूस, रेशीम वगैरे तंतुमय पदार्थांवर काय परिणाम करतात, रंग पक्का करणारे हिराकस, तुरटी सारखे पदार्थ त्यांच्यांत मिसळले असतां काय परिणाम घडतो, मिश्र पदार्थांच्या तत्त्वांचें शोधन करणारे पदार्थ ( Re agents) कोणकोणते आहेत, वगैरे गोष्टींचा शोध केला पाहिजे. या प्रमाणें सरकारी प्रयोग शाळेंत पाहण्यांत आलें, आणि त्या वरून हें सिद्ध झालें आहे कीं मंजिष्टाचा कापडावर उत्तम प्रकारचा तुर्की लाल रंग चढवितां येतो. पतंगाच्या लाकडापासून सर्व प्रकारच्या तंतूंना लाल रंगाची छटा देतां येते, व तुरटीच्या साह्यानें ह्या रंगाच्या आणखी ही कित्येक छटा तयार करतां येतात. अळीत्यापासून निघणारा रंग तर प्रसिद्धच आहे. कुसुंब्याचा रंग तर हिंदुस्थानच्या लोकांना फार पसंत आहे. पण हा रंग टिकाऊ नसतो. दक्षिण हिंदुस्थानांत रातांजली नांवाचें एक लाकुड आहे. याच्यापासून ही लाल रंग निघतो. पिंपळामूळ व आसुन्याची साल हीं ही तशींच उपयोगाचीं आहेत. यांच्या पासून भेमळ भुरका लाल रंग काढतां येतो. मिरझापुरास लाखेचे रंग फार चांगले तयार होतात. डाळिंबाची साल जंगली नीळ, वगैरे पदार्थांत पिंवळा रंग देण्याचें सामर्थ्य आहे. असे अनेक पदार्थांपासून अनेक रंग तयार होण्यासारखे आहेत. सरसाच्या अंगीं टॅनीन तत्त्व स्थिर करण्याचें व अशुद्ध तत्त्वें दूर करण्याचा गुण आहे. पिंवळा रंग रसवंती नांवाच्या पदार्थापासून चांगला निघतो. अस्मानी रंग मात्र एकच पदार्थापासून—गुळी पासून-निघूं शकतो. खाकी रंग खैर, बाभूळ, व अक्रोड यांच्यापासून काढतां येतो. वर सांगितलेल्या रंगांच्या कमज्यास्त प्रमाणांच्या मिश्रणानें दुसरे अनेक मिश्ररंग तयार करतां येतात. रंगांसंबंधानें आणखी माहिती कोणास पाहिजे असल्यास ती कानपुर येथील सरकारी उद्योग खात्याचे अधिकारी देण्यास तयार आहेत सरकारी अधिकाऱ्यांवर निष्कारण टीका करण्यांतच इतिकर्तव्य न मानतां स्वतः देशकल्याणाचें कर्तव्य एकनिष्ठपणें करण्यास तयार असलेल्या मंडळीनें आतां पुढें सरसावलें पाहिजे. तोंडपाटिल्की पुरे झाली. प्रत्यक्ष कृति करण्याला आतां लोकांनीं पुढें व्हावयास पाहिजे आहे.

## थोर हिंदी पुरुषांचीं चरित्रें.

इंदूरच्या 'मल्हारि मार्तंड विजय' पत्राच्या ता. २२ जूनच्या अंकांत राजा सर टी• माधवराव व इंदूरचे माजी दिवाण मि० खुमानसिंगनी बक्षी यांच्या मध्यें झालेल्या पत्रव्यवहारासंबंधाचा एक लेख आहे त्यावरून माधवरावाची इंदूरची कारकीर्द फार महत्त्वाची व खऱ्या मुत्सद्दीगिरीची झाली असें स्पष्ट दिसतें. खरें पाहिलें तर राजा सर टी० माधवरावासारख्या थोर पुरुषाबद्दलचा हा पत्रव्यवहार व त्यावरून मिळविलेल्या विश्वसनीय माहितीनें भरलेलें चरित्र या पूर्वींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें. माधवरावांनीं आपल्या चरित्राचीं साधनें ही गोळा करून ठेविलीं होतीं, व राजाचे पुत्र मि. आनंदराव हे स्वतः थोर अधिकारावर व धनसंपन्न असल्यामुळें एखादा योग्य लेखक मिळवून वडिलांचें चरित्र त्यांनीं लिहवून प्रसिद्ध करावयास पाहिजे होतें. पण तसें कांहीं एक अद्याप घडलें नाहीं. आमच्यांतल्या थोर पुरुषांच्या चरित्रांसंबंधानें आमच्या लोकांनीं अशी अनावस्था कां दाखवावी तें कळत नाहीं प वा. तेलंग. रानडे, यांचीं चरित्रें ही अद्याप याच कारणामुळें अज्ञात राहिलीं आहेत. रानड्यांचें चरित्र गोपाळराव गोखल्यांनीं लिहावयास पाहिजे होतें व तें लिहिण्याचा त्यांचा विचार ही होता हें आम्हांस ठाऊक आहे. पण इतर कामांमुळें राहिलें. मग काय आपल्या गुरूचें चरित्र लिहून त्यांचें ऋण फेडणें व भावी पिढी पुढें उत्तम आदर्श मांडणें हें काम महत्त्वाचें नाहीं! सर नारायणराव चंदावरकर हे तेलंगांचें चरित्र लिहिण्याचा बेत करतां करतांच थकलेले दिसतात. त्यांना ईश्वराच्या कृपेनें सर्व गोष्टींची अनुकूलता आहे. त्यांनीं इंदूर संस्थानाकडून मरणपारी मिळालेल्या फुरसतीचा उपयोग तेलंगाचें चरित्र लिहिण्यांत केला तर केवढें देशकार्य व मित्रकार्य केल्यासारखें होईल. टाइम्स ऑफ इंडियांत लेख लिहिण्यापेक्षां किंवा प्रार्थनासमाजाच्या व्यासपीठावरून तरुणांना शुष्क उपदेश करण्यापेक्षां हें कार्य त्यांनीं केल्यास अधिक उपयुक्त व बोधपर खास होईल.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत व्हर्डुनकडचें लोकांचें लक्ष उडून तें सगळें पूर्वेकडील रणक्षेत्रांत राशिया झपाट्यानें मिळवीत असलेल्या जयपरंपरेकडे लागलें होतें. एक महिन्यापासून राशिया विजयश्रीचा प्राणसखा होऊन बसला आहे हें पाहून मित्राष्ट्रांना अत्यानंद वाटणें स्वाभाविक आहे. राशियाचें पारडें डोईजड झालेलें पाहून जर्मनीला धाक पडलेला आहे. राशियाचा पाडाव करण्यासाठीं आकाशपाताळ एक करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांनीं कोव्हेलच्या बाजूला आस्ट्रियाच्या मदतीसाठीं कुमक ही रवाना केली आहे. सध्या रणक्षेत्राचें केंद्र कोव्हेल होऊं पाहात आहे. ही महत्त्वाची कामगिरी जनरल मॅकेनसनकडे सोपविण्यांत आली आहे. गतवर्षी राशियाला आपण जेरीस आणिलें, तसें यंदाही आपणास करतां येईल अशी जर त्या सेनापतीची समजूत झाली असेल तर ती चुकीची आहे हें लवकरच आढळून येईल. कारण, गतवर्षी राशिया दारूगोळ्याचे संबंधांत टंचाईत होता. यंदा त्याच्या उलट स्थिति आहे. जर्मनीकडून कुमक आल्यापासून आस्ट्रियाला नवा हुरूप आला असला पाहिजे. ते ज्यास्त आवेशानें लढूं लागले आहेत. पण त्या आवेशाचा कांहीं परिणाम दिसत नाहीं. राशियानें स्त्रिचा किल्ला सर केला आहे थेट दक्षिणेकडे मित्राष्ट्रांची चळवळ अधिक आहे. त्यांना तिकडे विरोध करणारांचें कांहीं चालत नाहींसें दिसतें. मित्रसैन्यांनीं बुकोव्हिनावर चढाई करून थेट कार्पेथियन पर्यंत मजल मारली आहे. हें इतक्या अल्प अवकाशांत घडून आलें कीं शत्रूचे सेनापति जनरल फियांझर हे आश्चर्यचकित झाले आहेत. व्हाइसराय साहेबांकडे आलेल्या तारेवरून कळतें कीं राशियानें मारलेली लाट अपूर्व आहे. १७२००० कैदी, १९२ तोफा व ६९० यांत्रिक तोफा, येवढा लाट ता. २२ जून रोजीं राशियाचे हातीं लागला. यावरून राशियाच्या विजयश्रीची कांहीं कल्पना करतां येईल. यावरून शत्रूची प्राणहानि किती झाली असली पाहिजे तें ही तर्कानें कळेल. राशियाच्या सामर्थ्याविषयीं शत्रूची कल्पना आतांपर्यंत साफ चुकली होती असें अतां यावरून म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

## पाश्चात्य रणक्षेत्र.

व्हर्डुनचा नाद जर्मनीला अजून ही सोडावासा वाटत नाहीं. कित्येकांचें तर असें म्हणणें आहे कीं प्रस्तुतच्या युद्धाचा शेवट व्हर्डुनच्या भवितव्यतेवर आतां अवलंबून आहे. गेल्या आठवड्यांत कांहीं दिवस या ठिकाणीं जर्मन लोक शांत होते. पण ही त्यांची शांतता जोराचें वादळ होण्यापूर्वीच्या समुद्रांतल्या शांततेसारखें भयसूचक आहे असें पुष्कळांचें म्हणणें आहे. थियूमांट येथें मात्र फ्रेंच सैन्याची फळी फोडण्याचें श्रेय जर्मनीनें मिळविलें आहे. पण फ्ल्यूरीगांव सर करण्याचा त्यांचा प्रयत्न निष्फळ झाला. तथापि धीर खचूं न देतां पुढें पाऊल टाकण्याचे शत्रूचे प्रयत्न चालले आहेत. समुद्राच्या लाटा पुढें सरून पुनः मागें येतात, तसा प्रकार या रणक्षेत्रांतल्या युद्धाबद्दलचा म्हणतां येईल. ब्रिटिश फौजेसंबंधानें विशेष कांहीं चळवळ नोंदण्यासारखी झाली नाहीं. जनरल सर डगलस हेग यांचा खलिता नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्यावरून खंदकांतल्या लढाईंत ही ब्रिटिशांनीं चांगलें शौर्य दाखविलेलें दिसून येतें. तथापि हवेंतल्या युद्धाकडे ब्रिटनला अधिक लक्ष द्यावें लागेल असा सुमार दिसतो. अलीकडे हवेंतल्या चकमकीच ज्यास्त उडत आहेत. एका दिवसांत २७ व दुसरे दिवशीं अशा प्रकारच्या चकमकी झडल्या. ब्रिटिश सैन्य अग्रगामी होऊन हल्याला सुरुवात करील असा अंदाज आहे. इकडे मि लाइड जॉर्ज व मि. हेंडरसन हे दारूगोळा तयार करणाऱ्या लोकांना ज्यास्त माल काढण्यासंबंधानें सारखा तगादा करीत आहेत. एकंदर स्थिति मित्राष्ट्रांना पूर्णपणें अनुकूळ दिसत आहे.

## अरबस्थानांतली गडबड.

अरबस्थानावर तुर्क लोकांचें इतकें दिवस स्वामित्व होतें. पण सध्या तुर्कस्थान पेंचांत सांपडलेलें पाहून तें दास्याचें जूं झुगारून देण्याची अरबांना बुद्धी होऊन त्यांनीं अशा योग्य संधीचा फायदा घेण्यासाठीं चळवळ आरंभिली, आणि मक्केवर हल्ला करून तें स्थान सरही केलें अशी खबर आली आहे. तुर्कस्थान सध्या ज्या पेचांत सांपडलें आहे त्यांतून त्याची मुक्तता होईपर्यंत अरबस्थानांतल्या तुर्की अधिकाऱ्यांना वरिष्ठ सरकाराकडून कुमक जाण्याचा संभव नसल्यामुळें अरबांना विरोध करण्याची निष्फलता तुर्की अधिकाऱ्यांना पूर्णपणें कळून चुकली आहे, आणि म्हणून रक्तपाताशिवाय स्वातंत्र्य मिळविण्याचें काम अरबांना साधतां आलें आहे. ईजिप्त तुर्कस्थानाच्या हातांतून या पूर्वींच निसटला. आतां अरबस्थान ही जाण्याच्या बेतांत बहुतेक गेलेंच आहे. खुद्द तुर्कस्थानांत कान्स्टांटिनोपल येथें जर्मन सासुरवाईचा सासुरवास सुलतानाला व त्याच्या सरदारांना भोगावा लागत आहे. हें पाहून लढाईंत सामिल झाल्यापासून तुर्कस्थानानें काय मिळविलें असा प्रश्न उपस्थित होतो. पण या प्रश्नाचें उत्तर देण्यास तुर्कस्थानचें तोंड कोठें मोकळें आहे?

## आनंदाची बातमी.

ग्वालेरचे श्रीमंत शिंदे महाराज यांना पुत्रसंतति नसल्यामुळें गादीला औरस वारस कोणी नव्हता. सुदैवानें ता. २१ रोजीं त्यांच्या धाकट्या महाराणी साहेब प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झाल्यामुळें ग्वालेर-संस्थानच्या प्रजेकडून आनंदोत्सव होत आहेत. फार आनंदाची गोष्ट !

## सन्माणिमाला.

**(कैलासवासी आगरकर यांची सद्गुण-स्फूर्ती.)**

थोर गृहस्थ मरणानंतर अमर व यशःकाय असतात. तेच राष्ट्राचे विश्वकर्में होत. राष्ट्रशील बनविणाऱ्या अशा रत्नांपैकीं महाराष्ट्रांत आगरकर हें पवित्र उपनांव सर्वश्रुत आहे. वऱ्हाडांत व विशेषतः आकोल्यास त्यांचा सहवास पुष्कळांनीं अनुभवला आहे समुद्राप्रमाणें राष्ट्रालाही ऊर्जितकालाच्या लाटा येतात, तम्रा हा काल आपल्या राष्ट्राच्या सन्माणीमालेविषयीं होय. कालचा दिवस त्यांच्या पुण्यतिथिचा ह्मणून मुंबई पुण्यास पाळण्यांत येत आहे आणि त्यांचेंच अनुकरण आमच्या येथील मंडळीनें चांगल्याप्रकारें केलें. पुण्याच्या कॉलेजच्या व वर्तमान पत्राच्या द्वारानें महाराष्ट्रांत सद्गुणाचा उदय करणाऱ्या या थोर पुरुषाचा पोंवाडा निःसंशय सर्वांस पुनीत करील. 'मनोरंजन कर्त्यांनीं' आगरकरांचा अंक ह्मणून एक सुंदर मासिकच काल रोजीं प्रकाशित केलें आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— हें सप्तक कोरडें गेलें, पण हल्लींचे पश्चिम समुद्राकडील वारे सजल व श्याम मेघांचीं लष्करें जल्दीनें रवाना करीत आहेत. तेव्हां नव्या बीजांकुरास लवकरच अमृतवृष्टी लाभून चांगला जोम येईल. ऋतूच्या क्रांतीचे लहानमोठे आजार सध्यां प्रबल आहेत.

**उत्तीर्ण**— यंदाच्या एल्. एल्. बी. परिक्षेंत येथील आंग्लो-व्हर्नाक्यूलर शाळेचे हेड मास्तर राजश्री अंबादास पंत पांडे यांचे चिरंजीव व राजश्री अनंतराव नरगुंदकर वकील यांचे बंधु असे दोघेही गृहस्थ अनुक्रमें दुसऱ्या व पहिल्या वर्गांत पसार झाले आहेत.

म्याट्रीक्युलेशनचा निकाल हायस्कूल वारीनें पाहतां खालील प्रमाणें:—

| | धाडले. | विद्यार्थी पसार. |
|---|---|---|
| उमरावती हिंदू हायस्कूल | ८६ | ३९ |
| " मुसल्मानी " | १६ | २ |
| यवतमाळ हायस्कूल | २६ | ९ |
| आकोला " | ९३ | १२ |

येथील हायस्कूलचा नमुनेवाईकपणा कोठें गमावला बरें!

रा. रा. ताराचंद खत्री बी. ए. जुनिअर सबजज आकोला यांस चालूं जुलैपासून न्यायखात्यानें अखेरीचा रामराम केला. पेनशन लाभे पर्यंत त्यांच्या त्या थकलेल्या पण चाणाक्ष व धूर्त लेखणीला दिवाणी खटले ह्मणजे खबुतरें होतीं. या पक्ष्यांची हौस व आनंदी लहर पक्षकार व वकील यांस ही आंदोलन देत असत.

ठाकूर रघुवीरसिंग एक्स्ट्रा असि. कामिशनर यांस ६ महिन्यांची रजा देण्यांत आली.

रा. रा. एच. जी. प्रयुअर असि. कमि. यांस वर्धेहून उमरावतीस बदलण्यांत आलें.

रा. रा. अबदूल मुफितखा हैदराबादस्टेट कडील एक्स्ट्रा असि. कमि. यांस ३ महिन्यांची आजारीपणाची रजा मिळाली.

रा. रा. विष्णु कृष्ण देशपांडे मुनसफ यांस आफि. सब जज करून मलकापुरास बदललें.

रा. रा. धुंडीराज विश्वनाथ परांजपे मुनसफ, बुलढाणा यांस खामगांवास बदलून रा. रा. मुकुंद श्रीधर सप्रे यांस नवीन आक्टींग मुनसफ करून बुलढाण्यास नेमिलें.

येथील कांहीं गुलहौसी तरुण मंडळींनीं गेल्या गुरुवारीं ' कांचनगडची मोहना ' या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. करमणूक होऊन चांगल्या एका कलेचा परिचय घडतो.

'आनंद विलास संगीत नाटक' कंपनीनें गेल्या शनिवारीं धनुर्भंग, हा प्रयोग पुनः केला.गाणारीं थोडींच पात्रें पण चांगला रंग आणीतात

---


# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे अंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वी दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्जा ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.)

मी ____________ अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ________ रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ________ / चेकनें रुपये ________ } सादर कारित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ________ काढून घेण्याचा मी अधिकार देत आहे.

________

एकूण रुपये........

(रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास ती किती त्या रकमा त्यांकरितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा.)

(अ) माझी विंनती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ________ पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ________ यांत जमा करावें.

( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधींच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) ________ पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ________ ________ ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

((अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा.)

मी अशी विनांति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ____________

पत्ता ____________

तारीख ____________

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ________ ( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर ________ ( हा नंबर हेड पोस्ट मास्टरानें घालवयाचा )

हेड आफिसचा छाप.


'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

श्रीमत्सद्गुरु श्रीसमर्थ रामदासस्वामिविरचित

# सटीप दासबोध.

**श्रीरामदासस्वामींच्या सुंदर चित्रासहित.**

**पोथी साईज, किंमत रुपये २, टपालखर्च ८ आणे.**

'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो' करण्यास श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या ह्या दासबोध ग्रंथाचें वाचन व मनन हें एक अत्युत्तम साधन आहे. असा हा उत्तमोत्तम प्रासादिक ग्रंथ आम्हीं पोथी-साईजमध्यें ठळक टाईपांत एका रामदासीयाकडून तपासवून व अर्थनिर्णायक टीपा देववून छापून प्रसिद्ध केला आहे.

२३, कोलभाट लेन, कालबादेवी रोड, मुंबई.

तुकाराम जावजी, निर्णयसागर छापखान्याचे मालक.



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भाशयं मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खरुज, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व भडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतांचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची काळा, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आ... यशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक-गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णें, जिल्हा रत्नागिरी.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Wanted.

Representatives in every locality in India, Burma and Ceylon for the sale of our world-renowned "Hairtone" (unique toilet preparaiton) under the system of cash prizes worth Rs. 50,000 among the purchasers of Hairtone. Pay Rs. 50, 40, 30, 25 and 20, besides liberal commission. Cash security required Rs 1000, 700, 500, 400 & 300 respectively. Service at present secured for 6 months. No risk, no trouble. Every honest, energetic man (or woman) may well undertake the work and secure a decent income in leisure hours, without interfering with service or profession if any. Apply for Rules and Regulations to the Hairtone Manufacturing Co, 155, Bowbazar Street Calcatta.


## *NOTICE*

NOTICE UNDER SECTION 11 OF ACT VIII OF 1890,

Mis. Judicial Case No, 34 OF 1916

In the COURT of the District Judge AT AKOLA

In the matter of application of Jairam son of Ramji caste Sutar inhabitant of Chikhli Tahsil Murtizapur District Akola for the (1) appointment of a guardian to the (2) Person and property of (1) Sitaram s/o Vithu caste Sutar a minor aged 14 years Nearly inhabitant of Chikhli tahsil Murtizapur district Akola

To (3)

The petitioner above named having applied to be (4) appointed the guardian of the (2) Person and property of the aforesaid minors the 25 th day of July 1916 has been fixed for the hearing of the application and notice is hereby given that if anybody desires to oppose that application of the petitioner aforesaid he should enter appearance in this Court in person or by a duly authorised pleader of the Court, duly instructed, and able to answer all material questions relating to the application, or who shall be accompanied by some person able to answer all such questions, and he is hereby required to take notice that in default of his appearance on the day mentioned above the application will be heard and determined in his absence.

Given under my hand and the seal of the Court, this 9 th day of May 1916

Seal. V. M. Kelker District Judge Akola W. B. D.


## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

**FUNDS exceed 5 CRORES.**

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

### A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,034 | 31,60,950 |
| 1888 | 8668 | 2 63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63.407 |
| 1915 | 64 738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5.25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.

Forty years continuously increasing prosperity.

Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.

Indian Lives are accepted at the same rates as Europeans.

Loans granted to policyholders at reasonable rates.

Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms, Liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown Manager Bombay. or *A. C. Lal,* Branch Secretary *C. P. Berar & Khandesh* Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला——सोमवार तारीख १० माहे जुलै सन १९१६ इ० [ अंक २७

# हिंदुस्थान सरकार.

—:※:-:※:-:※:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं म्हणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वीं दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस आधिका ऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता. १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

मी —————————————— अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढून घेण्याचा मी अधिकार देत आहे.

(रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास तो किती त्या रकमा त्यांकारितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा.)

एकूण रुपये........

(अ) माझी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें.

( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधींचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

((अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा.)

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ————————————

पत्ता ————————————

तारीख ————————

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ————

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर ————

( हा नंबर हेड पोस्ट मास्टरानें घालवयाचा )

हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.



## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ } S. Clements, एजंट
नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तांबडतोब दूर होतात किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनकी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुगाजोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुद्रा, अग्रफुलें सार्थी व घागऱ्याची वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, वाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## खात्रीचा तयार केलेला. ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता.
रामचंद्र सदाशिव मार्कंडे
उद्धवजी मोहला नागपूर शहर

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वादार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशीक सिटी.
नो. नं. ४

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## Wanted.

Representatives in every locality in India, Burma and Ceylon for the sale of our world-renowned "Hairtone" (unique toilet preparation) under the system of cash prizes worth Rs. 50,000 among the purchasers of Hairtone. Pay Rs. 50, 40, 30, 25 and 20, besides liberal commission. Cash security required Rs 1000, 700, 500, 400 & 300 respectively. Service at present secured for 6 months. No risk, no trouble. Every honest, energetic man (or woman) may well undertake the work and secure a decent income in leisure hours, without interfering with service or profession if any. Apply for Rules and Regulations to the Hairtone Manufacturing Co, 155, Bowbazar Street Calcutta.


## दुरुस्ती

मे. डिस्ट्रिक्ट जज साहेब बहादूर पश्चिम वऱ्हाड, आकोला यांच्या किरकोळ मोकदमा नं. ३४ सन १९१६ संबंधाच्या जाहिरातींत चौकशीची तारीख २९ जूलै सन १९१६ अशी छापली गेली आहे ती चुकीची आहे. तेथें १९ जूलै सन १९१६ अशी पाहिजे. ही दुरुस्ती पूर्णपणें लक्ष्यांत येण्यासाठीं ती जाहिरात या अंकीं पुनः तारखेच्या दुरुस्तीसह प्रसिद्ध केली आहे.

४ जूलै १९१६ आकोला } संपादक, वऱ्हाडसमाचार

## NOTICE

NOTICE UNDER SECTION 11 OF ACT VIII OF 1890.

Mis. Judicial Case No, 34 OF 1916
In the COURT of the District Judge AT AKOLA

In the matter of application of Jairam son of Ramji caste Sutar inhabitant of Chikhli Tahsil Murtizapur District Akola for the (1) appointment of a guardian to the (2) Person and property of Sitaram s/o Vithu caste Sutar a minor aged 14 years Nearly inhabitant of Chikhli tahsil Murtizapur district Akola

To (3)

The petitioner above named having applied to be (4) appointed the guardian of the (2) Person and property of the aforesaid minors, the 15 th day of July 1916 has been fixed for the hearing of the application and notice is hereby given that if anybody desires to oppose that application of the petitioner aforesaid he should enter appearance in this Court in person or by a duly authorised pleader of the Court, duly instructed, and able to answer all material questions relating to the application, or who shall be accompanied by some person able to answer all such questions, and he is hereby required to take notice that in default of his appearance on the day mentioned above the application will be heard and determined in his absence.

Given under my hand and the seal of the Court, this 9th day of May 1916

Seal. V. M. Kelker
District Judge
N. N. 222 Akola W. B. D.


## सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

नामांकित लेखकांचे विचार परिप्लुत निबंध, बोधपर गोष्टी, अनुकरणीय चरित्रें, हृदयंगम कविता, चालू कादंबरी वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६. वार्षिक वर्गणी बाहेरगांवीं ट. ख. सह १॥≈ उमरावतीस रु. १॥ उमरावतीचे एजंट रा. सदाशिवराव देशमुख. जानेवारी १९१६ पासून सुरू झालें आहे. एजंट पाहिजेत.

संपादक— काशीराव बापुजी देशमुख.
अंबागेट उमरावती.
नो. नं. २२३

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंपाचें मोतीं ल्हान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.
नो. नं. २२४

## इंग्रजी शिकण्याची उत्तम सोय.

मौजे शिरसगांवबंड ता. एलिचपूर जि. उमरावती येथें इंग्रजी पहिल्या ४ चार इयत्तांचे वर्ग १९ वर्षांपासून चालू आहेत. गांवाबाहेर खुल्या हवेंत सरकारी पद्धतीची टोलेजंग दोन मजली इमारत बांधली असून बाहेरगांवचे विद्यार्थ्यांकारितां बोर्डिंग ही केलें आहे. बोर्डिंगांत स्वयंपाकी वगैरेची सर्व सोय केली आहे. यंदाचे वर्षी इंग्रजी चवथ्या यत्तेतून हायस्कूलच्या टेस्ट परिक्षेंत १२ पैकीं ९ विद्यार्थी पास झाले. हल्लीं प्रत्येक यत्तेंत ३-४ जागा रिकाम्या आहेत. गरजूं विद्यार्थ्यांनीं ता. २०-७-१६ पर्यंत खालील पत्त्यावर सर्टिफिकेट सह अर्ज करावे किंवा समक्ष भेटावें. जागा भरल्यानंतर आलेले विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्यांत येतील. कळावें. ता. ३-७-१६

गो. ना. दीक्षित.
हेड मास्तर— ए. व्ही. स्कूल.
शिरसगांवबंड
नो. नं. २२६


## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, माझी सावत्र सून कुंगरी मर्द जाणू सोनार रा. आगर ही वाईट लोकांचे नादी

लागलेली आहे. मौजे आगर व पाळोधी या गांवीं ही माझी स्थावर जिंदगी आहे. तिची मी एकटी मालक आहे. तिचा अन्नवस्त्रा शिवाय कोणताही हक्क नाहीं. तिचे पासून कोणी गहाण, खरेदी, बक्षीस, वगैरे घेऊं नये. व तिला कर्ज ही देऊं नये, कोणी तिज बरोबर कांहीं व्यवहार केल्यास मी स्वतः अगर माझी जिंदगी जबाबदार नाहीं क. ता. ४-७-१६

सही
झुमकी मर्द शिवराम सोनार नि॥
बांगडी रा. पाहूदी ता. आकोला
नो० नं० २२६

## नोटिशीचें उत्तर

रा. बाबुजी वा॥ यादोजी व पूर्णाजी वा॥ बाबूजी रा. बेलखेड पोष्ट व ता. मुर्तिजापूर जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येते कीं, तुमची वऱ्हाडसमाचार पत्रांतील नोटिस ता. १६-६-१६ रोजीं मिळाली. श्री हनुमान संस्थान बेलखेड याचे वहिवाटदार पंच असून संस्थानची जनावरें विकून आलेलें उत्पन्न रु० ५०८ तुह्मी उभयतानीं मजजवळ धरवर ठेविलें वगैरे जो मजकूर नोटिशींत तुह्मी लिहिला तो खोटा आहे. तुह्मी उभयतांही संस्थानचे व्यवस्थापक सूर्यभान उदेभानजी यानीं पसंत केलेल्या मंडळींत केव्हां ही नव्हते व नाहीं. तुह्मी ह्मणतां त्याप्रकारची धरवर रकम मजजवळ मुळींच नाहीं. तुह्मी कांहीं तरी खोडसाळपणा करून संस्थानवर आपली वहिवाट शाबीत करण्याच्या उद्देशानें तुह्मी भानगड उपस्थित करीत आहां. व असें करीत असतां माझेबद्दल वाटेल तसा खोटा नाटा व माझी इज्जत लोकांत कमी करण्या सारखा मजकूर तुह्मी आपले नोटिशींत प्रसिद्ध केला आहे. तरी तुह्मास कळवितो कीं ही नोटिस मिळेल तेव्हां पासून १५ दिवसाचे आंत तुह्मी आपले नोटिशींत लिहिलेला मजकूर शाबीत करून द्यावा. नाहींतर तुह्मावर दिवाणी अगर फौजदारी काम चालवून त्याचा होणारा खर्च सर्व तुमच्याकडून घेतला जाईल. ही नोटिस दिली ता. २९-६-१६ द. डी. डी. गुलालकर पिटीशन रायटर डिस्ट्रिक्ट कोर्ट आकोला

सहीची निशाणी
शिवराम हनवतजी पाटील वानखडे
रा. बेलखेड रेघ
नो. नं. २२७

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं साळूंखी मर्द भिकारी बेटोदकर हल्लीं देवधाबे हिचे पासून देवधाबे ता. मलकापूर येथील शेत सर्वे नंबर १०९ हा कोणी गहाण खरेदी बक्षीस अगर कोणत्याही प्रकारानें लिहून घेऊ नये अगर नोंदून घेऊं नये. ती या शेताची मालकिण नसून मी स्वतः पूर्ण मालक आहे. तिचा या शेताशीं कांहीं संबंध नाहीं जर तिचेपावर लिहिले प्रमाणें कोणी व्यवहार केल्यास त्याबद्दल वरील शेत अगर मी स्वतः मुळीच जबाबदार राहणार नाहीं. व झाल्यास सर्व व्यवहार रद्द होतील कळावे ता· १-७-१६ इसवी.

दस्तुर रामचंद्र रमाकांत इंगळे अर्जनवीस
सही
विठोबा वा॥ गणू सगरे रा. देवधाबे
दस्तुर खुद्द मुक्काम मलकापूर
नो. नं. २२८

## नोटीस

शेट नाना वामन रा. देवधाबे तालुका मलकापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी साळूंखी मर्द भिकारी बेटोदकर इचे जवळून देवधाबे ता. मलकापूर येथील शेत सर्वे नंबर १०९ चे गहाणखत करून घेतलें आहे. परंतु सदर्हू शेताची मालकीण ती स्वतःनसून मी स्वतः आहे व माझाच ताबा आहे. साळूंखीचा या शेताशीं कांहीं संबंध नाहीं. व तिला गहाण करून देण्याचा अधिकार मुळींच नाहीं. करितां या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं, तुमचे रकमेस वरील शेत मुळींच जबाबदार नाहीं. या संबंधीं तुह्मी पुढें दावा वगैरे आणल्यास तो रद्द असे कळावें ता. १-७-१६ इ. द. रामचंद्र रमाकांत इंगळे अर्जनवीस

सही
विठोबा वा॥ गणु सगरे रा. देवधाबे द. खुद मुक्काम मलकापूर
नो० नं० २२९

## नोटीस

ईष्णाजी वा॥ कृष्णाजी कुणबी रा. मौजे आगर ता. व जि आकोला

यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी ता १०-६-१६ इ. रोजीं माझी सावत्र सून कुंगरी मर्द जाणू हिजला फंद फितूर देऊन कांहीं योग्य कारण नसतांना २०० रुपयाचे तिचे पासून पोकळ ताबे गहाणखत करून घेतलें आहे. व माझे त्या घरास कुलुप असतांना तें कुलुप तिचेकडून तोडून घेऊन घराचा ताबा घेतला. कुंगरी हिची त्या घरावर कायद्याप्रमाणें मालकी नाहीं, खरी मालक मी आहे. या करितां तुह्मास नोटिस देते कीं, तुह्मी ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत माझेघर माझे ताब्यांत द्यावे. तसें न केल्यास तुमचे पासून दरमहा २ रुपये प्रमाणें भाडें घेतले जाईल. व ताबे गहाणखत रद्द होण्याकरितां व घराचा ताबा मिळणें करितां कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें. ता. ४-७-१६

सही
झुमकी मर्द शिवराम सोनार नि॥
हातची बांगडी
नो० नं० २३०

## जाहिर नोटीस

मुक्ताई मर्द कडताजी नठाले कुणबी रा. दोनवाड तालुका आकोला जि. आकोला पोष्ट दहिहांडा

इसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं मौजे कासली खुर्द ता० जि० आकोला येथील.

| शे. स. नं. | ए. गुं | आ. रु. | हिस्सा |
| --- | --- | --- | --- |
| १० | ३१८२० | ६३ | एक नऊमांश |

समाईक हा वडीलांनीं आपले पैशानीं तुमचा नवरा कडताजी (आमचा चुलत चुलता) हा वेगळे राहण्याचे वेळीं घर आणि शेत घर राहण्यास व शेत वाहुन उपभोग घेण्यास दिलें होते .त्या घरांत ते राहुन शेत वाहून त्यांनीं आपले अंतकाल पावेतों उपभोग घेतला. पुढें त्यांचे मरणा नंतर आह्मी वारस त्या जिनगीचें असल्यामुळें ती इस्टेट आह्मी आमचे ताब्यांत घ्यावी. तंर त्याचें मागे तुह्मी त्याची विधवा हयात असल्यामुळें तुमचे मरणापावेतों तुमचे अन्नवस्त्रासाठीं तुमचे जवळ ठेविली. असें असतां आह्मास अशी बातमी लागली कीं तुह्मी राहते घर तुह्मांस पैशाची कांहीं एक जरूर नसून विनाकारण आह्मास बुडविण्याचे हेतुनें लबाडीचे खरीदिखत लिहून दिलें आणि आतां ही लबाडीनें तुह्मास पैशाची कांहीं जरूर नसून केवळ आह्मास बुडविण्याचे इरायानें शेत गहाण, खरेदी, पट्ट्यानें करून देण्याचे इरायांत आहा. तर तुह्मी जर कोणास हें शेत गहाण अगर खरेदी अगर पट्टा करून दिल्यास त्या दस्तऐवजाचा बोजा ते पोकळ असल्यामुळें राहणार नाहीं. आतां तुह्मी घराचे खरेदीखत करून दिले त्याजबद्दल दिवाणींत दावा तुर्त तुह्मी हयात आहा तो पावेतों कायद्यानें करतां येत नाहीं. तुमचे मरणानंतर आह्मी ती खरेदी रद्द होण्यासाठीं दावा करू. तुह्मी वरील शेत खुशाल तुमचे हयातीपावेतों वाहून उपभोग घ्यावा. त्याचे उत्पन्नावर तुमचा उत्तम रितीनें निर्वाह चालतो. यदाकदाचित तुह्मास पैशाची जरुर लागल्यास आह्मांस मागावे. योग्य कारण आहे असें आह्मास वाटल्यास आह्मी देऊं ही नोटीस दिली. मुक्काम आकोला ता० ३०।६।१६ इ.

सही
नरहरी वा॥ टलुजी झटाले रा० दोनवाड पो० दहिहांडा द. खु.
नो० नं० २३१

## जाहिर नोटीस

नोटिस बेशमी मारुती वा॥ कोंडाजी भुसारी पाटील राहणार भोरसा प्रगणे अमडापूर तालुके चिखली जिल्हा बुलडाणा

यांसः—

नोटिस देणार कान्हुबा वा॥ कोंडाजी भुसारी पाटील राहणार भोरसा तालुके चिखली जिल्हा बुलठाणा नोटिस देतो कीं, तुमचा व माझा बाप नामे कोंडजी बापुजी भुसारी यांचे हातची संपादन केलेली स्थावर जंगम मिळकत आहे ती येणे प्रमाणें:—

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| १ | भोरसा येथील सालीम शेतें नं० | | ११ |
| २ | भोरसा | ” ” | ६ |
| ३ | पाटोदे | ” ” | १ |
| ४ | सावंगी गोळी | ” | ३ |
| ५ | देवदरीचे | ” | ४ |
| ६ | मोहोखेडचे | ” | ४ |
| | | | २९ |

येणे प्रमाणें २९ सालीम नंबराची जमीन त्यांचा शेत सारा अजमास ५६७ रुपये आहे. या शिवाय राहता वाडा बैठकीची दुकान, गाईचा वाडा बैलाचा वाडा, टीनाचा वाडा, धाबे १४ खांडाचे या शिवाय पडीत जागा ५।६ आहेत. या शिवाय जंगम माल जनावरें, बैल, गाई. ह्मशी, घोडी, गाड्या, गाडे, दमण्या, चांदी, सोने, तांब्याची भांडीं, जवारी, गहूं, हरबऱ्याचेपोते १२५ शिवाय कणगे, लादण्या, अंबर या शिवाय लोकांकडून येणे अजमास ५०००० पंन्नास हजार रुपये या शिवाय घरांतील बाहेरील सर्व मिळकत तुमचा व आमचा बाप नामे कोंडु बापुजी नीं मिळविली आहे. कोंडुजी मयत होऊन ४ वर्षें अजमास झालीं आहेत. तेव्हां पासून तुह्मी व मी एकत्रच राहात आहों. मी अज्ञान होतो ह्मणून एकत्र राहिलो, आतां मी हल्लीं सज्ञान झालों आहे, तुह्मी मोठे ह्मणून मी अज्ञान असतांना सर्व कारभार करीत होता. अलीकडे तुह्मी दारू फार पिऊं लागला आहा, व मला हिशोब तर मुळींच दाखवित नाहीं, व कांहीं निराळी जिनगी करूं लागला आहा, व माझ्याशीं हमेशा तंटा करितां ह्मणून तुमचे व आमचे आतां एकत्र बनत नाहीं. तुह्माला पांच सात वेळां मी सांगितले कीं, माझी निंमे हिश्याची मिळकत वाटून द्या. तर तुह्मी जिनगी वाटून देत नाहीं. व जिनगीची तुह्मी गुप्त रितीनें व्यवस्था करूं लागले आहा ह्मणून तुह्माला ही नोटिस देण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून आपल्या बापाच्या हातची व तो मेल्यानंतर आपण कमावलेली जी आपणा दोघांच्या ताब्यांत आहे. ती सर्व स्थावर जंगम मिळकत नोटिस मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत वाटून द्यावी. व आसाम्या ही वाटून द्याव्या, तसें करण्यास चुकल्यास मग मी रितीप्रमाणें दिवाणी अगर मुल्की फौजदारींत काम चालवून न्याय मिळवीन व मग सालीम खर्च तुमचे पासून घेईन. देवघेव माझे विचारल्या शिवाय मुळींच करू नये, व सर्व आसामीनीं ही एकट्या मारुतीलाच रुपये वसुलांत देऊ नये, त्यांस एकट्यास वसूल दिल्यास मी रकम भरून घेईन, ही नोटिस मी दिली, तारीख २६-३-१६ इ० द० भिकमसिंग अर्जनवीस बुलठाणा नोटिशीचें उत्तर लवकर द्यावें,

सही
कान्होबा वा॥ कोंडजी पा० द० खुद
नो० नं० २३२

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ शुद्ध १० शके १८३८

## युद्धाचें एक चित्र.

कराचीचे ना. मि. वेब हे प्रस्तुतच्या युद्धासंबंधानें जितके उत्साही आहेत, तितकें ते मतांच्या संबंधानें दुराग्रही नसते तर त्यांच्या उत्साहाचा ब्रिटिश राष्ट्राला खरोखर कांहीं उपयोग झाला असता. त्यांच्या डोक्यांत कांहीं दुराग्रह शिरले आहेत, आणि त्यांनीं ते इतके अंध झाले आहेत कीं दुसरी बाजू त्यांना दिसतच नाहीं. सगळें ब्रिटिश राज्य सध्यां ब्रिटिश राष्ट्राला मदत करण्यासाठीं आत्मसमर्पण करीत असतां हिंदुस्थान मात्र त्या संबंधांत विशेष कांहीं न करतां उदासीन राहिलें आहे असा त्यांचा ग्रह झालेला आहे आणि हा त्यांचा ग्रह लॉर्ड हार्डिंज सारख्या सरकारी अधिकाऱ्यांनीं कौंसिलांत वेळोवेळीं केलेल्या भाषणांनीं ही दूर झाला नाहीं, तेव्हां देशी वर्तमानपत्रांतल्या मुद्देसूद लेखांनीं तो दूर होईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. हिंदुस्थानांत पुरून ठेवलेलें द्रव्य पुष्कळ असतां अशा वेळीं हिंदुस्थान तें सरकारास देत नाहीं हें त्यांचें पहिलें खूळ आहे. दुसरें खूळ म्हणजे हिंदुस्थाननें यावेळीं दुसऱ्या तिसऱ्या प्रश्नांचा अगदीं विचार करूं नये, आपलें तन, मन, धन, सगळें युद्धाला लावावें. त्यांच्या समजुतीप्रमाणें हिंदुस्थानची ही उदासीनता घालवून त्याला हालवून जागृत करण्यासाठीं त्यांची सारखी अव्याहत खटपट चाललेली आहे. पण त्यांच्या विचारांचा मूळ पायाच चुकलेला असल्यामुळें त्यांच्या खटपटीला विशेषसें यश प्राप्त होण्याचा संभव दिसत नाहीं. त्यांनीं सध्याचें युद्ध व हिंदुस्थानांत न्याय्य हक्कांच्या प्राप्तीसाठीं चाललेली चळवळ यांचें काढलेलें एक चित्र मजेदार आहे. ते म्हणतात—

'समजा, तुम्ही संध्याकाळच्या शांत वेळीं शांतमनानें घरीं जाण्यास निघालां असतां मागून कोणी बदमाष आला व तुम्हांला लुबाडण्यासाठीं तुमचा गळा दाबूं लागला. आपण आतां मरणार अशी तुम्हांला भीती वाटली. अशा वेळीं तुमचा मुलगा धडधडीत तुमचा हा सगळा प्रकार उघड्या डोळ्यांनीं पाहत असतां तुमच्या मदतीला धावून न येतां दुसऱ्या कोणाबरोबर कांहीं घरगुती गोष्टीबद्दल वाद करण्यांत आपला उत्साह खर्च करीत आहे असें तुम्हांला दिसलें तर तुम्हांला काय वाटेल? त्यानें वाद घालण्यांत वेळ न दवडतां तुमच्या मदतीला प्रथम धावून यावें अशी अपेक्षा तुम्ही करणार नाहीं काय?

चित्र मजेदार खरेंच, पण आम्ही तें काढणारे ना. मि. वेब यांना असें विचारतों कीं या ठिकाणीं त्यांनीं वादाविवाद घालणाऱ्या मुलाची उपमा हिंदुस्थानाला दिली आहे ती कितपत यथार्थ आहे? मुलगा खरा, पण तो किती वयाचा आहे व त्याचें सामर्थ्य किती आहे त्या मानानेंच त्याच्याकडून होणाऱ्या मदतीची अपेक्षा केली पाहिजे. चार वर्षांच्या मुलानें त्या बदमाषाच्या अंगावर धावून जाऊन त्याला चित केलें तर मात्र तो मुलगा आपल्या बापाविषयींचें कर्तव्य करणारा, आणि तसें करण्यास तो असमर्थ असला तर तो मुलगा कसचा? अशा प्रकारची ना. मि. वेब यांची ही विचारसरणी आहे ती घातुक आहे. ते त्या बरीब बिचाऱ्या अर्भकाला कृतघ्न म्हणून त्याची सर्वत्र निंदा करणार काय? मुलानें मनापासून बापाला संकटाचे वेळीं मदत करण्यास धावून येणें किंवा न येणें हें बऱ्याच अंशीं त्या बापाचें मुलाशीं ज्या प्रकारचें वर्तन असेल त्यावरही अवलंबून राहील, हें ही मनुष्य स्वभावाला सोडून नाहीं. बाप जर मुलाशीं कृत्रिमपणाचें वर्तन करीत वागत आला असेल तर त्या मुलाला ही अशा बापाविषयींची आस्था तितपतच राहील. हा कृत्रिमपण नाहींसा करून उभयतांमध्यें प्रेमबंधन दृढ व्हावें या साठीं तर राष्ट्रीय सभा आज ३० वर्षें झटत आहे. गोऱ्यांतले कृत्रिम भेद, व हिंदी लोकांविषयींचा संशयखोरपणा, वगैरे गोष्टी नाहींशा झाल्याखेरीज हिंदुस्थानाला ब्रिटिश साम्राज्याविषयीं पूर्णपणें आपलेपणा कसा वाटेल? अशी वस्तुस्थिति असून ही हिंदुस्थान सध्यां तिकडे दुर्लक्ष करून जें उत्कृष्ट साह्य करीत आहे त्याचें महत्त्व ना. मि. वेब सारख्यांना वाटलें नाहीं तरी सरकारी अधिकारी व इतर निःपक्षपाती इंग्रज यांना वाटत आहे व ते मोकळ्या मनानें आपले विचार बोलून दाखवीत आहेत ही भाग्याचीच गोष्ट म्हटली पाहिजे. नाहीं तर शेळी जाते जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातड या म्हणी सारखी हिंदुस्थानची स्थिति झाली असती. हिंदुस्थाननें आपल्या शक्तीच्या मानानें पुष्कळच साह्य केलें आहे याला साक्ष हिंदुस्थानचे फडणीस सर वि. मेयर हे खुद्द देत आहेत. बिनसरकारी इंग्रजाची साक्ष पाहिजे असेल तर फॉर्ट नाइटली रिव्ह्यूंतील लेखक प्रो. एच. जे. जेनकिन्स यांचा लेख पहा. त्यांत ते म्हणतात—हिंदुस्थानचा इंग्लंडशीं जडलेल्या संबंधानंतर गेलेला काळ, त्या देशाची निर्धनता, त्यावरचें करांचें जबरदस्त ओझें या सगळ्या गोष्टींचा विचार करून पहा आणि मग हिंदुस्थानानें आपल्यावरची जबाबदारी पुरी पुरी बजाविली आहे कीं नाहीं याचा विचार करा. हिंदुस्थानावर कराचा आणखी बोजा लादण्याविषयीं शिफारस करणारा सहानुभूतिशून्य असा एक इंग्रजांचा वर्ग आहे. हिंदुस्थानच्या ज्या त्या गोष्टीला नाकें मुरडणें हा त्यांचा जणूं काय धर्मच होऊन बसला आहे. हिंदुस्थानच्या प्रजेचीं मनें (ती युद्धांत अंग चोरून साह्य करते अशीं विधानें करून) दुखविणें हें आपलें कर्तव्य आहे असें तो समजतो. हिंदुस्थान दारिद्री आहे हा त्याचा एकट्याचा दोष नाहीं. तेथील लोक आळशी, अज्ञानी, निरुत्साही, असतील. पण त्यांना तशा स्थितींत ठेविलें आहे हा दोष कोणाचा? सांपत्तिक दृष्टीनें हिंदुस्थान अगदीं लंगडा आहे पण तशाही स्थितींत शक्य तेवढी मदत त्यानें केली आहे हें काय थोडें आहे!

## महायुद्धाची प्रगती.

गेल्या आठवड्यांत अतिशय मोठी गोष्ट म्हणजे इंग्रजांकडून पश्चिम रणक्षेत्रांत चढाईला झालेली सुरवात ही होय. ही चढाई अकस्मात घडलेली नाहीं. तशी ती असती तर कदाचित् आजच्याहून ही ती अधिक यशस्वी झाली असती. पूर्वेकडे रशियानें विलक्षण आवेश दाखवून शत्रूला सळो कीं पळो करून सोडलें, आणि जर्मन सैन्याचा कांहीं अंश पश्चिम क्षेत्राकडून मदतीला नेल्याखेरीज कांहीं गत्यंतर नाहीं असा रंग दिसूं लागला, तेव्हांच ही संधी साधून इंग्रज चढाई सुरू करतील असा अंदाज कोणाही चाणाक्ष माणसाला करतां आला असता. मग जर्मनसारख्या बातमी काढण्यांत पटाईत शत्रूला तो करतां आला असेल यांत आश्चर्य नाहीं. अलिकडे एक महिनाभर पश्चिम क्षेत्रांत इंग्रजांचा तोफखाना विशेष कामगिरी करीत होता. त्याचा नेम अमक्याच एका ठाण्यावर होता असें नाहीं. सुमारें ९० मैलांच्या सर्व रांगभर त्याचा कामगिरी दिसत होती. त्यांचे गोळे विशेष नाशकारक आहेत व शत्रूचा ते धुव्वा उडवीत आहेत असें जखमी होऊन हातीं लागलेल्या शत्रूकडील शिपायांच्या तोंडून निघालें होतें. शिवाय अलीकडे इंग्रजांनीं 'शठे शाठ्यंसमाचरेत्' या न्यायानें विषारी वायूचा ही उपयोग केल्याची ही खबर आली होती. हीं सगळीं नुकत्या सुरू झालेल्या इंग्रजांच्या चढाईचीं पूर्व चिन्हें होतीं. हीं चिन्हें दिसत असतां जर्मन शत्रू स्वतःच्या बचावाचा कांहीं बंदोबस्त केल्याशिवाय राहिले असतील असें समजणें हा मूर्खपणा आहे. त्यांनीं बचावाचे उपाय तर जरूर केलेच असले पाहिजेत. पण इंग्रजांच्या चढाईचा आवेशच असा जबरदस्त आहे कीं त्या पुढें शत्रूचें कांहीं चालत नाहीं. सोम आणि अंकर या दोन नद्यांमध्यें आणि त्याच प्रमाणें अंकरच्या उत्तरेस थेट गामकोर्ट पर्यंत फार निकराच्या लढाया चालल्या होत्या. इतक्यांत दुसऱ्या बाजूनें फ्रेंचांनीं ही शत्रूला निकड लाविली. अशा पेचांत सापडलेल्या शत्रूची हानि मोठीच झाली असली पाहिजे. ती किती झाली आहे याचा अंदाज अद्याप कळला नाहीं, पण तो लवकरच कळेल. व्हर्डुनपाशीं जर्मन हल्ले अजून चालले आहेत, आणि ते जोरानें मागें हटविण्याचा क्रम ही सुरू आहे. तेथें आवेश दाखविला नाहीं तर जर्मनींतले लोक हताश होऊन आतांपर्यंत निष्कारण करून घेतलेल्या प्राणहानी बद्दल केसरला जबाबदार धरतील ही जबरदस्त भीती त्याला वाटत असली पाहिजे.

### प्राच्य रणक्षेत्र

पश्चिमेकडे अशी धामधूम चालली असतां पूर्वेकडे स्वस्थता आहे असें मात्र नाहीं. तिकडे रशियाची चळवळ सारखी सुरूच आहे. तिकडे शत्रूला कुमकेची फार जरूर आहे आणि पश्चिमेकडून ती येण्याचा आतां संभव नाहीं. तिकडे आस्ट्रियाला एकट्यालाच रशियाला तोंड देणें भाग आहे. आणि रशियाच्या लोंढ्यापुढें आस्ट्रिया किती कम जोर आहे तें सांगावयास नकोच. रशियानें कोलोमिया हें रेल्वेचें केंद्र काबीज केलें आहे. रशियानें दाखविलेला पराक्रम, एका मागून एक संपादिलेले जय, आणि हस्तगत केलेली कैद्यांची मोठी संख्या हीं पाहून बुडापेस्थ येथील लोकांच्या तोंडचें पाणी पळाल्याची जी खबर तारेनें आली आहे तींत अतिशयोक्ति असण्याचा संभव दिसत नाहीं.

### इटलीकडील स्थिति.

ही कांहीं कमी समाधानकारक नाहीं. मध्यंतरीं कांहीं दिवस आस्ट्रियानें टुरटुर करून इटालियन लोकांना जर्जर करून मागें हटवीत नेलें होतें, पण त्यानें नाउमेद न होतां इटालियन लोक आतां दुप्पट जोरानें शत्रूचे हल्ले परतवीत आहेत. आस्ट्रियन सैन्याला जर्मनांची मदत आहे इतकेंच नसून जर्मन तोफा, व दारूगोळा आणि जर्मन लष्करी अधिकारी त्याच्या सेवेंत आहेत—किंबहुना आस्ट्रिया त्याच्या सेवेंत आहे असें म्हटलें असतां अधिक सयुक्तिक होईल. आस्ट्रियन फौजेच्या चळवळींचे सगळे नकाशे बर्लिनमध्यें तयार होत असतात ही गोष्ट आतां लपलेली नाहीं. म्हणजे सर्वप्रकारें इटलीला जर्मनीशींच दोन हात करावे लागत आहेत. असें असून इटलीनें त्यांना दे माय धरणी ठाय करून सोडलें आहे ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. आस्ट्रियन कम्पांडर आपल्या शिपायांना लुटीची लालूच दाखवून त्यांच्यांत आवेश आणण्याचा प्रयत्न करीत आहे अशी ही बातमी आहे. ती जर खरी असेल तर तिच्यावरून आस्ट्रियाच्या हताश स्थितीची योग्य कल्पना करतां येईल.

### आफ्रिकेंत.

तिकडे इंग्रज सैन्यावरचे सेनापति जनरल स्मट्स् हे आहेत. त्यांना बेलज्यन व पोर्तुगीज लोकांकडून चांगलें साह्य मिळत आहे. जनरल स्मट्स् यांनीं शत्रूला त्रासवून सोडलें आहे. गेल्या सोमवारीं हांडेनीच्या दक्षिणेस एका मजबूत ठाण्यापाशीं त्यांनीं शत्रूला खूप चोप दिला. जनरल व्हान डेवेंटर यांनीं ही दुसरे एके ठिकाणीं असाच विजय मिळविला. जनरल नार्थे यांनीं ऱ्होडेशियाकडून येऊन उबेना नांवाच्या एका मजबूत केंद्रस्थानापासून जर्मन शत्रूला हुसकावून दिलें. चौथ्या एका ठिकाणीं बेलज्यन लोकांनीं शत्रूला पळ काढण्यास लाविलें व पाठलाग केला. अशा सर्वत्र विजयाच्या आनंदजनक वार्तांनीं आफ्रिकेंत वातावरण भरून गेलें आहे.

या व इतर रणक्षेत्रांकडील उल्हासकारक बातम्यांचा समुच्चयानें विचार केला तर

मित्रराष्ट्रांना सध्या ग्रहांची उत्तम अनुकूलता असून सध्याचा काळ हा कदाचित् प्रस्तुत युद्धाच्या इतिहासांतल्या शेवटल्याच्या अलीकडलें प्रकरण असूं शकतें असें ह्मणतां येईल.

## कै. गोपाळराव आगरकर.

### (मुंबईच्या सभेचा अहवाल.)

२१ वर्षानंतर यांची पुण्यतिथी पाळण्याचा समारंभ मुंबईस करण्यांत आला त्यावेळीं नामदार प्रि. परांजपे, सर नारायण चंदावरकर, रा. कामत व श्री. वेणुबाई नामजोशी यांचीं भाषणें झालीं. तीं मनन करण्याजोगीं आहेत. नामदार परांजपे ह्मणाले कीं आगरकरांचा अप्रतिम गुण हा होता कीं लोकनिंदेची परवा न करितां त्यांनीं समाजांतील व्यंगें व न्यूनें यांचें उद्घाटन करून तीं काढून टाकण्यास व पाश्चात्य राष्ट्रांत जशी सामाजिक सुधारणा व्यक्तिस्वातंत्र्यावर रचली आहे तशी रचण्यांत यावी असें प्रतिपादन केलें. त्यांच्यावेळीं प्रेस आक्ट नसतांना सरकारच्या कृत्यांवर टीका करणें आतांपेक्षां सोपें होतें. आणि त्यांनीं इतर पत्रकाराप्रमाणें सरकारच्या चुकांवर आक्षेप घेतले यांत कांहीं विशेष नाहीं. परंतु घरींदारीं मित्रमंडळींत गेले असतांना ज्या सुधारणा सुचविल्यानें आपण उपहासास पात्र होऊं त्या सुधारणा करण्याचें सूचविलें. हें मनोधैर्य अपूर्व होय. त्यांनीं ज्या सुधारणा सूचाविल्या त्या थोड्या बहुत या २१ वर्षांत अंमलांत आल्याच आहेत व पूर्णपणें त्या अंमलांत येतील अशी आमची खात्री आहे. रा. जयकरांनीं आपल्या भाषणांत ह्मटलें कीं आगरकर यांनीं विचारस्वातंत्र्यावर जोर दिला. सर्व संस्थांस व आचारांस विचाराची कसोटी लावावी व विचारांत जें योग्य असेल तेंच ठेवावें. पूर्वींच्या ऋषींच्या वचनांचा आधार घेण्यांत बिल्कूल हांशील नाहीं. हल्लींची परिस्थिती पाहून तिच्या प्रमाणें आपले विचार बदलले पाहिजेत व विचाराप्रमाणें आचाराला जितकें वळण देतां येईल तितकें वळवावें असें आगरकर नेहमीं प्रतिपादित असत. अर्थात् आचारस्वातंत्र्यापेक्षां विचार स्वातंत्र्यावर त्यांचा कटाक्ष विशेष होता. कारण आचार ह्मटला ह्मणजे इतरांचा संबंध यावयाचा आणि ज्या आचारानें आपणाहून अन्य अशा स्त्रीपुरुषांचे हितास बाध येईल ते आचार अंमलांत आणणें हें धोक्याचें आहे हें ते पूर्णपणें समजत. ह्मणून त्यांचे अक्षयीं असें ह्मणणें असें कीं युक्त असेल तें बोलावें व शक्य असेल तें करावें. आगरकर एकदां बोलतां बोलतांना असें ह्मणाले कीं माणसें येतील जातील पण संस्थां कायम राहिल्या पाहिजेत हे त्यांचे उद्गार नामदार परांजप्यांनीं आपल्या भाषणांत प्रगट केले होते त्यावर न्यायमूर्ती चंदावरकर आक्षेप घेऊन ह्मणाले कीं संस्था काय मनुष्यावाचून चालतात. तेव्हां आह्माला उदार मनाचीं कर्तृत्ववान, दक्ष, शाहणीं अशीं माणसेंच पाहिजे आहेत. हें त्यांचें ह्मणणें अगदीं खरें आहे आणि हें आह्मी पुष्कळदां विसरतो. श्री रामदास स्वामींनीं थोडे कां मठ स्थापित केले होते? प्रत्येक मठ केंद्रभूत होऊन आसंमतांतील भागांत प्रबोधक व चालक व्हावा अशी त्यांची थोर कल्पना होती. संस्था उत्तम पण त्या चालविणारे लोक नसल्यामुळें त्या संस्था नामशेष किंवा जीवंत असून मेलेल्या सारख्याच आहेत असला इतिहास आपल्या बहुतेक संस्थांचा आहे पाहिला चालक गेला ह्मणजे त्या मेल्या सारख्या होतात. ह्मणून आपली अशी खटपट असावी कीं कोणताही कर्तासवरता माणूस गेला ह्मणजे त्याची जागा रिकामी पडतां कामा नये. नांवाला भरून काढावयाची नाहीं तर गेलेल्या माणसाच्या योग्यतेचाच माणूस पुढें आला पाहिजे. हें अक्षयीं साध्य नसतें, पण हें ध्येय डोळ्यापुढें ठेविलें पाहिजे. श्री. वेणुबाई नामजोशी ही आगरकरांच्या स्त्री शिक्षणाच्या उत्कट आस्थेची मूर्तीमती पुतळी होय व तीच्या भाषणाचें महत्व यांतच आहे कीं आगरकरांनीं आपल्यावर प्रसंग आल्यावर हातीं धरलें व चांगल्या मार्गाला कसें लाविलें हें न बोलतांना त्यांनीं सांगितलें. प्रो. कर्व्यांच्या 'महिलाश्रमा'ला जबरदस्त मदत देण्याचें श्रेय आगरकरांसच आहे. ही गोष्ट पुष्कळजण विसरले असतील ह्मणून ती आह्मी नमूद करून ठेवितो. या प्रसंगीं एक विशेष गोष्ट ती ही कीं सभेला दाटी फार झाल्याकारणानें सभेचा कांहीं भाग आवारांत करविणें भाग पडलें. या सभेच्या भागांत रा दळवी हे अध्यक्ष होते व त्यांत रा टिळक यांचें भाषण इंग्रजींत झालें. या सभेला माझी सहानुभूती आहे व सभा भरविणारांचें मी अभिनंदन करितों असें प्रथम सांगून रा. टिळकांनीं आपण व आगरकर या मध्यें काय तो विरोध सामाजिक विषया संबंधानें मात्र होता एवढें सांगितलें. आगरकरांचीं राजकीय मतें, हिंदुस्थानच्या दारिद्र्यासंबंधीं मतें व सांपत्तिक स्थिती कशी सुधारावी या संबंधाचीं मतें एकच होतीं असें ते ह्मणाले. तात्पर्य आगरकर हे स्वराज्यवादीच होते असा त्यांच्या भाषणाचा मथितार्थ आहे. विरोध हा कीं सामाजिक विषयांत केवळ तर्कबुद्धीच चालवावी असा आगरकरांचा हट्ट पूर्वपरंपरा किंवा अधिकारी पुरुषांचीं वचनें यांचें त्यांना मुळींच महत्व वाटत नसे. टिळकांच्या ठायीं पूर्वेतिहास व पूर्वपरंपरा व अधिकारी पुरुष यांच्या विषयीं श्रद्धा व अभिमान वसत होता ह्मणून विरोध झाला. हा विरोध दैविक नव्हता, तात्विक होता. कारण आगरकरांच्या कर्तृत्वा संबंधानें, त्यांच्या निश्चयाच्या बळासंबंधानें, दारिद्र्याशी धिम्मेपणानें झुंज लाविलें, व झुंज चालत असतांना धन व मान यावर लाथ मारली याबद्दल त्यांच्या विषयीं आदर रा. टिळकांनीं व्यक्त केला. या भाषणावर टीका करितांना 'इंदुप्रकाश' कर्त्यांनीं असा एक प्रश्न केला आहे कीं आगरकरांचीं मतें व टिळकांची मतें इतर सर्व विषयांत एकच होतीं व ते स्वराज्यवादी होते तर विष्णुकृष्ण चिपळूणकरांप्रमाणें त्यांचा उत्सव पुण्यांत कां होऊं नये. कदाचित् 'केसरीकार' ह्मणतील कीं हा उत्सव 'चित्रशाळे'चा आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं आगरकराचा 'सुधारक' एकांगी नव्हता. फक्त सामाजिक विषयासंबंधानें त्यांत चर्चा होत असे असा पुष्कळांचा समज आहे तो चुकीचा आहे. सुधारकाची सुधारणा ह्मणजे राष्ट्राची सर्व बाजूंनीं सुधारणा. व्यापक दृष्टीनें ती सामाजिक सुधारणा होती.

## येत्या कांग्रेसचे अध्यक्ष.

राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा मान ह्मणजे राष्ट्रपित्याच्या पदवीचा मान आहे. त्या मानाला कोण पात्र किंवा अपात्र आहे या विषयींची चर्चा वर्तमानपत्रांतून होणें व तिला खाजगी व्यक्तिविषयक गुण दोष मीमांसेचें स्वरूप प्राप्त होणें हें कोणत्याही प्रकारें इष्ट नाहीं. त्याच्या योगानें त्या थोर पदवीची योग्यता आपण कमी लेखतो असें होतें. कांग्रेसच्या अध्यक्षाची निवड ही निरनिराळ्या प्रांताच्या पुढाऱ्यांच्या संमतीनें पण जाहिर चर्चा न करतांच होणें इष्ट आहे असें आह्मांस वाटतें, आणि ह्मणून यंदाच्या कांग्रेसचे अध्यक्षपद कोणास द्यावें याबद्दल वर्तमानपत्रांतून जो वाद चालला आहे तो आमच्या मतें अगदीं गैर आहे. कारण त्यामुळें त्या निवडणुकींतला एक प्रकारचा पावित्रपणा नष्ट होतो. यंदाच्या कांग्रेसच्या अध्यक्षत्वासाठीं जीं नांवें सुचविण्यांत येत आहेत त्यांत सर अली इमाम यांचें एक नांव आहे. हिंदु व मुसलमान यांच्यांत गतवर्षी मुंबईच्या कांग्रेसच्या वेळीं जें सख्य व जी सहानुभूति दिसून आली ती वृद्धिंगत ठेवणें असल्यामुळें यंदा हा मान सर अली इमामसारख्या थोर मुसल्मान बंधूस देऊन तें सख्यत्वाचें बंधन दृढ करावें असा त्यांत एक हेतु आहे आणि तो सर्वोत्कृष्ट आहे यां विषयीं वाद नाहीं. वादाचा मुद्दा हा आहे कीं सर इमाम हे आजपर्यंत कधीं कांग्रेसला आलेले नाहींत. तेव्हां अशा 'उपरी' पुरुषाला एकदम सर्वोच्च स्थानीं नेऊन बसवूं नये असें कित्येकाचें ह्मणणें आहे. या ह्मणण्याला युक्ति किंवा पूर्वेतिहास यांचा कांहींच आधार दिसत नाहीं. सर इमाम यांची तितकी योग्यता नाहीं असा मुद्दा कोणी पुढें आणिला असता तर गोष्ट निराळी होती. पण कांग्रेसला ते अद्याप कधीं आलेले नाहींत येवढ्याच मुद्यावर हरकत घेणें ह्मणजे कांग्रेसच्या कॉलेजांत त्यांनीं योग्य टर्म भरली नाहीं, सबब ते परिक्षेस बसण्यास अपात्र असें ठरविण्या सारखें आहे. जास्तींत जास्ती कांग्रेसला हजर असणें ही कांहीं त्या पदाच्या लायकीची खरी परिक्षा नव्हे. सर हेनरी कॉटन, डा. रासबिहारी घोष, सर एस. पी. सिंह, किंवा सर वि. वेडरबर्न हे कांग्रेसचे अध्यक्ष होण्यापूर्वीं कितीकदा कांग्रेसला हजर होते? सर अली इमाम यांच्या सारख्यांची सहानुभूति कांग्रेसला मिळणें हीच मोठी गोष्ट आहे. ते एक्झिक्युटिव्ह कौंसिलचे मेंबर होते यावरून सरकारांत त्यांची मान्यता किती आहे तें ही व्यक्त होतें. सरकारपाशीं ज्याची मान्यता तो कांग्रेसचा अध्यक्ष होण्यास अपात्र असें ह्मणण्याचा अंतःस्थ हेतु असला तर गोष्ट निराळी; पण तसें स्पष्ट बोललेलें बरें नाहीं काय?

## असा भेद कां?

कलकत्त्याच्या 'बंगाली' पत्रांत एक विचित्र हकीकत प्रसिद्ध झालेली आहे. तें पत्र ह्मणतें कीं बंगाल सरकारच्या सेक्रेटरीएट मधून बंगालच्या कायदेकौंसिलाच्या सर्व बिनसरकारी सभासदांना एक पत्र गेलें आहे. या पत्रांत या सभासदांनीं कौंसिलच्या बैठकींचे वेळीं कसें वागावें याबद्दल सरकारानें केलेले कांहीं नवे नियम दिले आहेत. त्यांतला एक नियम असा आहे कीं या सभासदांनीं कौंसिलला येतांना आपली निमंत्रणपत्रिका बरोबर आणावी. विशेष गंभीर स्वरुपाच्या सर्व सभांमध्यें हा नियम असतो. पण तो कधीच पाळला जात नाहीं हें सर्वांना ठाऊकच आहे. कारण प्रतिष्ठित मनुष्य सभास्थानीं आल्यावर द्वारपालानें त्याला 'तुमची निमंत्रणपत्रिका दाखवा, नाहीं तर मी तुह्मांस मज्जाव करीन' असें ह्मणणें हें त्या गृहस्थाच्या प्रतिष्ठेला बाधक आहे. कौंसिलचा सभासद ह्मणून भलताच कोणी मनुष्य आंत जाईल असाही संभव नाहीं. असें असतां हा नियम आणि तो ही बिनसरकारी सभासदांसाठींच काय ह्मणून करण्यांत यावा तें कळत नाहीं. सभासदांकडून अंगठ्याचे छाप घेण्याचें सरकारनें ठरविलें नाहीं हें भाग्यच ह्मटलें पाहिजे अशी त्यावर बंगाली पत्राची टीका आहे आणि ती अगदीं रास्त आहे. दुसरा एक नियम असा आहे की सभासदांनीं आपल्या बरोबरच्या नोकराला कांहीं विशिष्ट मर्यादेच्या आंत आणूं नये. हा नियम आंत विशेष गर्दी होऊं नये ह्मणून केला असेल तर तो बिनसरकारी सभासदांबरोबर सरकारी सभासदांना ही लावावयास पाहिजे होता. अशाच तऱ्हेचे आणखी कांहीं नियम आहेत. सरकारी सभासद व बिनसरकारी सभासद यांच्यांत असा भेद खुद्द सरकारनें आणि तो ही कायदेकौंसिलांत ठेविल्यावर कलेक्टर कमिशनर सारखे खालचे अधिकारी म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांच्या सभेंत ही वरिष्ठ अंमलदाराचें अनुकरण करूं लागतील व याचा परिणाम बिनसरकारी सभासदांना म्युनिसिपालिट्यांच्या सभेला जाण्यांत प्रतिष्ठा न वाटतां उलट मानहानि वाटेल, याचा विचार सरकारनें अवश्य करावयास पाहिजे होता.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— गर्द अभ्रच्छायेनें नव्या नव्या बाल अंकुरांची चांगली जोपासना केली आणि गेल्या गुरुवारीं व शुक्रवारीं चांगल्या जोराच्या पर्ज्यन्यानें थोडा काल आपली अमृतमय संजीवनी सर्वत्र प्रसृत केली. अर्थात् रोगराई बरीच हटेल व लोक ही आपल्या भावी शरीर संपदा नव्यानें बनवूं लागतील.

इजारा टेन्सी बिलासंबंधानें नामदार चीफ कामिशनर साहेबांचेकडे रिप्रेझेंटेशन दाखल करण्यास रा. ब. मुंडले व रा. सा. लांडगे यांचें डेप्युटेशन ता. २-७-१६ ला खांडव्यास गेलें होतें. ना. साहेब बहादुरांनीं डेप्युटेशनचा आनंदानें स्वीकार करून या प्रकरणाचा आपण सहानूभूतीनें विचार

करणार आहोंत असें आश्वासन दिलें. दुरुस्त केलेला कायद्याचा मसुदा बाहेर पडल्यावर पुनः एकदा तुमचे रेप्रेझेंटेशन येऊं द्या असें साहेब बहादुरांनीं सांगितलें.

नामदार रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी ॲडव्होकेट उमरावती हे इतकीं वर्षें उमरावतीस वकीलीचें काम करीत असत पण त्यांनीं यापुढें खुद्द नागपूर शहरीं वकिली निमित्त राहण्याला सुरवात केली आहे. वऱ्हाडच्या आगिलाच्या कामासंबंधानें वऱ्हाडचे उत्कृष्ट वकील नागपुरास गेले आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट होय. नामदार जोशी हे राजकीय व सामाजिक बाबतींत अग्रणी व पुरस्कर्ते आहेत. व कौंसिलच्या कामालाही त्यांची नागपूरची योजना विशेष सोईची होईल; इतकेंच नव्हे तर लोकांच्या सोईच्या दृष्टीनें व सरकार दरबारच्या मुख्य राजधानीच्या दृष्टीनें त्यांचा नागपूरचा मुक्काम विशेष लाभकारक होईल. आमच्या दृष्टीनें तर वऱ्हाडचे आणखी कांहीं लोक नागपुरास अधिक पाहिजे आहेत.

**स्वराज्यसंघः—** महाराष्ट्रांत स्थापन झालेल्या स्वराज्यसंघाचे सभासद होण्याच्या सोईकरितां येथें ही नमुने बोलावून घेतले आहेत. तर प्रवेश फी दोन रुपये व वार्षिक वर्गणी १ रु. देऊन आपल्या या राष्ट्रकार्याला हातभार लावू इच्छिणाऱ्या लोकांनीं राष्ट्रदेवीचे राऊत होण्याची त्वरा करावी.

**धर्मादायः—** धी यंगमेन्स जॉली क्लबनें आपल्या 'कांचनगडच्या मोहने'च्या उत्पन्नापैकीं २० रुपये बांकुरा रिलीफफंडाकडे नामदार रा. रा. दाजी आबाजी खरे यांच्या पाशीं गेल्या शनिवारीं आकोला येथें दिले.

**कौटुंबिक पुण्यतिथी—** कैलासवासी आगरकरांच्या संबंधानें येथें जी जाहिरसभा भरली होती, तिच्यामध्यें त्यांचे शिष्य रा. रा. हरीभाऊ परचुरे, गुरु रावबहादुर महाजनी, मातुल रा. रा. अनंतराव भागवत तसेच रा. रा. नानासाहेब दाते यांनीं आपापल्या परीनें त्या थोर गृहस्थाचा चारित्र्य प्रभाव संकलित केला. राजश्री भागवत यांच्या भाषणाच्या वेळीं श्रोतृजन आनंदाच्या वेगानें अश्रु गाळीत होते. आणि त्या सभेच्या लय लागलेल्या वृत्तीवरून आह्मी तिला कौटुंबिक सभा ह्मटलें आहे.

**दोन पायावर दोनमुलींचे सांगाडे—**

धनज ता. मुर्तिजापूर येथील सनदी पाटलाचा मुलगा रा. रघोजी पाटील यांस गेल्या २ रे तारखेला भाम गांवीं एक कन्या झाली. तिचा देह फार विलक्षण असून ती जिवंत आहे. बेंबीखालचा भाग सामान्य मुलीसारखा असून वरचा एकत्र भाग एका मध्यरेषेनें दुभंग झालेला दिसतो; आणि त्या प्रत्येक बाजूच्या भागांत एका मुलीचे सर्व वरचे अवयव ह्मणजे, पोट, छाती, हात, तोंड, डोळे, कान, नाक, डोकें इत्यादि पूर्ण विकासित झालेले असे आहेत; आणि याच्या दुसऱ्या डाव्या ह्मणा किंवा उजव्या ह्मणा बाजूला तितकेच अवयव दुसऱ्या मुलीचे संपूर्णतेनें आहेत. ह्मणजे या रितीनें दोन पायावर असलेला नाभीवरचा शरीराचा सांपळा एका मुलीचा असण्या ऐवजीं दोन मुलांच्या शरीरांच्या अवयवांनीं बनलेला आहे. हा अद्भुत चमत्कार पाहण्यासाठीं लोकांच्या झुंडी जमत असतात. या मुलीला जन्म देणाऱ्या नवरा बायकोच्या विचारांच्या विचित्र लीलेचें हें दृश्य चित्र होय ! रावणाची कल्पना या मूर्तीवरून अर्वाचीची होण्यासारखी आहे. ता. ६।७।१९१६

## जाहीर नोटीस

१ दवलत व २ दिगंबर वल्लद गणपतराव अ० पा० क० आजी कोंडाई मर्द नारायणजी रा० भेर हल्लीं राहणार मालेगांव जाहगीर ता० वाशीम यांजकडून कळविले जाते कीं आमचा भाऊ संपत वल्लद गणपतराव यांस वाईट व्यसन लागल्यामुळें हा इस्टेटीची अफरातफर करून राहिला आहे. सबब सर्वांस जाहीर करण्यांत येते कीं आमची पालन करणार आजी कोंडाई मर्द नारायणजी ही असून आह्मी पूर्वी पासूनच इच्या जवळ राहातो. तरी मौजे भेर प्र० सिरपूर ता० वाशीम येथील शेत सर्वे नंबर ६ व बैल वगैरे जंगम माल संपत वल्लद गणपतराव यांजपासून कोणीं गहाण खरेदी वगैरे कोणत्याही प्रकारें लिहून घेऊ नये. घेतल्यास त्याबद्दल ही इस्टेट अगर आह्मी जबाबदार धरले जाणार नाहीं. कारण कीं ही मिळकत आमचे आजीनीं आमचेच नांवानीं बक्षीसपत्रावर लिहून दिली आहे कळावें ता० २९-६-१६ इ०

द० शेख इस्माईल अर्जनवीस वाशीम

सही

१ दवलत व दिगंबर वल्लद गणपत
राव अ० पा० क० आजी
नो० नं० २४१ कोंडाई इची नि० बांगडी

## नोटीस

श्री. रा. नारायण बाबूराव देशमुख मराठे रा. हैसांग यांसः—

खालीं सही करणार यशवदा मर्द अभिमान तराळे जात कुणबी रा. रामगांव ता. आकोला इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे कडून मौजे रामगांव ता। आकोला येथील शेत सर्वे नंबर २१ पोट हीस्सा नंबर १ एकर ६ ८३ गुंठे आकार रुपये १४ सालीम हिस्सा व मौजे मलकापूर प्र॥ व ता। आकोला येथील शेत सर्वे नंबर ३७ पो. नं. २ एकर ७ ८११ गुंठे आकार रुपये १६८८८६ सालीम व मौजे रामगांव येथील एक घर येणें प्रमाणें स्थावर मालाचे माझे कडून ता ३-२-१६ रोजीं खरेदीखत करून घेऊन व रुपये मागून देऊं ह्मणून सांगितले व तुमच्या शद्बावर भरोसा ठेऊन व तुह्मी बडेलोक ह्मणून मी ही पण पैसे न घेतां खरेदीखत करून दिले. आज त्या गोष्टीस सुमारें ९ महिने झाले. या वेळांत मी तुमचेकडे अनेक वेळां रुपयाबद्दल मागणी केली, परंतु तुह्मी आतांपर्यंत मला खरेदीच्या रकमेपैकीं एक पैसाही दिला नाहीं सबब तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत खरेदीची सर्व रक्कम रुपये १९०० मला द्यावी. असें न केल्यास खरेदीखत पोकळ असल्याकारणानें सदर्हु मालावर तुमची कोणतेही प्रकारची रकम येई पर्यंत मालकी नसल्यामुळें सर्व मालाचा मला ताबा घेऊन तुमच्यावर कायदेशीर इलाज करावा लागेल. ता. २७-६-१६ सही

यशवदा मर्द अभिमान तराळे रा०
रामगांव ता० आकोला इची नि॥
नो० नं० २४२ हातची बांगडी असे


श्रीमत्सद्गुरु श्रीसमर्थ रामदासस्वामिविरचित

# सटीप दासबोध.

श्रीरामदासस्वामींच्या सुंदर चित्रासहित.
पोथी साईज, किंमत रुपये २, टपालखर्च ८ आणे.

'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो' करण्यास श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या ह्या दासबोध ग्रंथाचें वाचन व मनन हें एक अत्युत्तम साधन आहे. असा हा उत्तमोत्तम प्रासादिक ग्रंथ आह्मीं पोथीसाईजमध्यें ठळक टाईपांत एका रामदासीयाकडून तपासवून व अर्थनिर्णायक टीपा देववून छापून प्रसिद्ध केला आहे.

२३, कोलभाट लेन, कालबादेवी रोड, मुंबई.
तुकाराम जावजी, निर्णयसागर छापखान्याचे मालक.

# कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छाजु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यात कोणते विषय आहेत याचा विस्तार कळाविणें फार कठिण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण-मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

अपूर्व ग्रंथ ? **मराठी भाषेंत** अपूर्व ग्रंथ

आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध न झालेला अपूर्व ग्रंथ.

# वशीकरण विद्या.

अर्थात दत्तात्रय तंत्र हा ग्रंथ दत्तात्रय व शंकर यांचा संवादरूपी असून दत्तात्रयांनीं प्रश्न केल्यावरून शंकरानीं कलीयुगांत त्वरीत सिद्धी देणारे प्रयोग सांगितले आहेत. ते मारण, मोहन, स्तंभन, विद्वेशण, वशीकरण, स्त्रीवशीकरण, आकर्षण इंद्रजाल, यक्षिणीसाधन, रसायन विद्या, कालज्ञान, अनाहार, आहार, निधी दर्शन, वंध्यापुत्रवती करण, वाजी करण, भूतग्रहानिवारण, सिंह व्याघ्र निवारण इत्यादी अनेक प्रयोग सांगितले आहेत. किं. ८८ आणे ट. ख. ३ पुस्तकें मागविण्याचा पत्ता.

ब्रँच आफीस उंबरगांव जि. ठाणें
पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी. हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

## नोटीस

कुंगरी मर्द जाणू सोनार रा. मौजे आगर हल्लीं वस्ती वडसिंगी ता. जळगांव

ईसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी सावत्र सून आहेस. तुझा फक्त अन्नवस्त्राचा हक्क आहे. आजपर्यंत तुला मी अन्नवस्त्र पुरविले आहे. असें असतां तूं लबाड लोकांचे नादी लागून माझे घरांतील जंगम जिंदगीची अफरातफर केली. व मला बुडवावे व खर्चांत पाडावे या हेतूनें मौजे आगर येथील माझे मालकीचे घर कांहीं योग्य कारण नसतांना ता. १० ६-१६ इ. रोजीं ईष्णाजी कृष्णाजी कुणबी रा. आगर यांस २०० रुपयाचे पोकळ ताबेगहाणखत करून दिलें आहे व माझे घरास मी लावलेले कुलुप माझे पश्चांत तोडून त्यास ताबा दिला याप्रमाणें बेकायदेशिर वर्तन केलें आहेस. खरोखर तुला कायद्याप्रमाणें कोणताही व्यवहार माझे संमति शिवाय करितां येत नाहीं. तूं कोणताही व्यवहार माझे जिनगीविरुद्ध केल्यास मी किंवा माझी जिंदगी जबाबदार नाहीं कळावें. ता. ४-७-१६

सही

१ झुमकी मर्द शिवराम सोनार नि॥ हातची बांगडी रा. पाहूदी ता. आकोला

नो० नं० २३३

## नोटीस

भुलाई मर्द नटवा व साळु मर्द नटवा जात धोबी रा. राजंदा पोष्ट राजंदा ता. आकोला

ह्यांसः—

नोटिस देण्यांत येते कीं, तुमचा नवरा व माझा वडील भाऊ नटवाजी हा व मी सखे भाऊ असून आमची सर्व जिनगी देवघेव वगैरे समाईक होती. सदर्हु नटवा मयत झाल्यामुळें येकत्र कुटुंबाचे सालीम स्थावर जंगम जिनगीचा मी मालक झालों असून अन्नवस्त्रा पुरता तुमचा हक्क आमचे समाईक जिनगीवर आहे. समाईक जिनगीपैकीं खालील जिनगी तुम्हापैकीं भुलाई इचे ताब्यांत आहे :—

२०० सोन्याचे कडें १ अंदाज वजन तोळे १२

६२॥ मुद्या २ सोन्याच्या अंदाज वजन तोळे २॥

५० सोन्याच्या बाळ्या ४ मुडक्या ४ अं. वजन तोळे २

४३॥। सोन्याच्या नथा २ अं. तोळे १॥।

३० चांदीच्या दंडवाळ्याचा जोड१ अं वजन तोळे ४०

११। चांदीची सरी १ अं. वजन तोळे १५

९ चांदीची कंठी पोवळ्यांची अं. तोळे १२

१५० रोख नगदी

४३॥। सोन्याच्या पुतळ्या ६ व पदक १ अं. वजन तोळे १॥।

३० चांदीच्या गुंडवाळ्या २ अं. वजन तोळे ४०

१८॥। चांदीचे कडे २ पाटल्या १ अंदाज वजन तोळे २५

९ चांदीचा गोफ १ अं वजन तोळे १२

एकूण रुपये ७५८

तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, सदर्हू जिनगी आमचे स्वाधीन ताबडतोब करून आमची पावती घ्यावी. तुमचे अन्नवस्त्राची योग्य ती व्यवस्था करण्यास आम्ही तयार आहों. तसेच सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, सदर्हु भुलाई व साळू यांचे पासून कोणीही कोणत्याही स्थावर अगर जंगम जिनगी संबंधानें ह्मणजे नटवा व माझे समाईक जिनगीचे भागा संबंधानें व्यवहार करू नये. तसें केल्यास तो व्यवहार रद्द समजला जाईल. मुक्काम आकोला ता० ५-७-१६

सही

परशराम बापू धोबी नि॥ हातची रेघ असे दस्तुर सदाशिव चंद्रभान

नो० नं० २३४

## नोटिशीचें उत्तर

रा. बाबूजी वा॥ यादोजी वानखडे व रा. पूर्णाजी वा॥ बाबूजी राहणार बेलखेड ता. मुर्तिजापूर जि आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीसीचें उत्तर देण्यांत येते कीं; तुमची ता. २४-५-१६ ची ता. ५-६-१६ च्या वऱ्हाडसमाचार पत्रांतील नोटीस मला ता. १६-६-१६ रोजीं मिळाली. त्यांत श्री हनुमान संस्थान बेलखेड याचे तुह्मी वहिवाटदार पंच असल्याबद्दल व संस्थानची जनावरें विकून आलेलें उत्पन्न रु. १४१ तुह्मी उभयतांनीं मजजवळ धरवर ठेवल्या बद्दल जो मजकूर लिहिला तो सर्वस्वी खोटा आहे. इतकेंच नव्हे तर जनावरें विकण्याचा, धरवर ठेवण्याचा अगर संस्थान संबंधी कोणताही हिशेब अगर धरवर रकम (कोणी दुसऱ्यानें ठेविलेली) मागण्याचा तुह्मास काडी इतका ही हक्क नाहीं. तुह्मी ह्मणता त्या प्रमाणें तुह्मी उभयतांही या संस्थानचे पंच केव्हांही नव्हता व नाहीं. या संस्थानचे वहिवाटीचें व व्यवस्थापकाचे काम कित्येक वर्षांपासून माझा बाप सूर्यभान उदेभानजी वानखडे पाटील रा. बेलखेड हाच अव्याहत करीत आला आहे व हल्लीं ही करीत आहे. हें काम तो वेळोवेळीं आपले मतानें योग्य दिसतील ते गांवचे स्थाईक व संभावित अशा ५।६ मंडळीच्या साह्यानें करीत असतो. मंदीर बांधण्याचें काम पूर्वी जेव्हां सदर्हू सूर्यभानजी यानें केलें. तेव्हां त्या कामावर देखरेख करण्या करितां तुह्मी (बाबूजी वा॥ यादोजी) त्यांचे स्वतःचे तर्फे नौकर ही होतां. त्या बद्दल तुमचा तनखा सदर्हू सूर्यभानजी यानींच दिला होता. या सर्व गोष्टी तुह्मास पूर्णपणें माहीत असून हल्लीं तुह्मी कांहीं उपद्व्यापी लोकांच्या साह्यानें पिढ्यान पिढ्या सुर्यभानजी कडे चालत आलेले संस्थानचे वहिवाटीचे व व्यवस्थापकाचें काम आपले कडे यावे या उद्देशानें भलतीच खोडसाळपणाची भानगड उपस्थित करणें सुरू केलें आहे. गणपत हिराजी याजकडे संस्थानचे येणें असलेलें कर्ज रु. १८ तुह्मी सुमारें २—२॥ वर्षांपूर्वी तुह्मी (बाबूजी वा॥ यादोजी यानीं) सूर्यभानजी यांचे संमती शिवाय वसूल करून आपल्या जवळ ठेऊन घेतले त्या बद्दल पंचासमक्ष पंचाईत झाली होती त्या वेळीं सदर्हू रुपये १८ चा तुह्मी हवाला घेतला होता. सदर्हु हवाल्याच्या रकमे बद्दल तुह्माला निकडीची मागणी केली व मुदतीचा काळ भरत आल्यामुळें आपल्यावर फिर्याद होईल या धास्तीनें तुह्मी अशी खोटीच भानगड उकरून काढली. परंतु अशानें हे रुपये देणें चुकतील असें समजू नका. ही नोटिसच आहे असें समजून हवाल्याचे रुपये १८ व त्याचे २॥ वर्षांचे दर २ रु. माहिन्याप्रमाणें व्याज आणून देऊन संस्थानचे व्यवस्थापक सूर्यभानजी यांची अगर त्यांचेतर्फे मुखत्यार या नात्यानें माझी योग्य रितीनें पावती घेऊन जावी. नाहींतर १५ दिवस वाट पाहून तुमच्यावर दिवाणींत फिर्याद आणून कोर्टखर्चासुद्धां रकम वसूल केली जाईल. शिवाय तुह्मी आपल्या नोटिशींत आमच्या नांवाची बदनामी करण्यासारखा भलताच खोटा मजकूर प्रसिद्ध करून लोकांत माझी बेअब्रू केली. तरी तुह्मास कळवितो कीं, ही नोटिस मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आंत तुह्मी नोटिशींत लिहिलेला मजकूर शाबीत करून दाखवावा. तसें न केल्यास तुमच्या विरुद्ध दिवाणी अगर फौजदारींत योग्य रितीनें कायदेशीर फिर्याद केली जाईल. व त्या संबंधीं होणारा सर्व खर्च तुमचेकडून घेतला जाईल. ही नोटिस दिली. ता १९-७-१६ द. डी. डी. गुलालकर पिटीशन रायटर डिस्ट्रिक्ट कोर्ट आकोला

सहीची निशानी

केशव सूर्यभानजी पाटील वानखडे रा. बेलखेड याचे खुद हातची रेघ असे

नो० नं० २३५

## नोटीस

पांडु वा गणु रा. टाकळी ता. बाळापूर

यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे पक्षकार पांडु वा जगदेव व आनंदा वा जगदेव रा० आडसूल याजपासून थाप देऊन कांहीं कागदपत्रावर सह्या करून घेतल्या. आह्मास असें समजलें कीं तुह्मी कुलमुकत्यारपत्र लिहून त्याजवर त्याच्या सह्या घेतल्या तर तुह्माला या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी तुमचे जवळ असलेल्या आमच्या पक्षकाराच्या इस्टेटीसंबधानें कांहीं व्यवहार करूं नये. केल्यास त्यानें आमचे पक्षकार बांधले जाणार नाहींत व तुह्माला जबाबदार धरले जाईल. आकोला तारीख ३०-६-१६ सही

A. G. Nargundker
Pleader

नो. नं. २३६

## नोटीस

**नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

दिवाणी मुकद्दमा नंबर ९२ सन १९१६ इ. विद्यमान डि० जज्ज साहेब बहादुर यांचें कोर्ट मुक्काम आकोला

नांव विठोबा

बापाचें नांव मुकूंदा

जात सोनार राहणार अंजनी बुजरुक तहसील मेहकर जिल्हा बुल्हाणा

च्या अल्पवयी हरणी वामन सोनार

उमर वर्षे २

राहणार अंजनी बुजरुक ता मेहकर तहासिलीचे शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमले जाण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २६ माहे आगष्ट सन १९१६ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ३ माहे जुलै सन १९१६ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

V. M. Kelker

नो. नं. २३७ डि० जज्ज आकोला पाश्चिम वऱ्हाड

## नोटीस

बिजान मर्द शेख सुपडू राहणार धामणगांव बढे ता० मलकापूर जि० बुलठाणा हल्लीं राहणार लोणवाडी ता० भुसावळ जि० पूर्वखानदेश

ईसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तुमचा खाविंद नामे शेख सुपडू वा शेख कालू हा सुमारे चार महिने झाले मरण पावला. त्याचे मागें त्याचे इस्टेटीचे वारस त्याच्या दोघी बायका (१) बिजन (२) रेशम व त्याचा पुतण्या मी असे आपण तिघे आहों. असें असतां तूं एकटीनेंच एक घर शेख वजीर यांस भाडेपट्यानें दिले असे कळते. असें करण्यास तुला एकटीला कांहींच अधिकार नाहीं. करितां तुला अशी नोटीस देतो कीं तूं आमचे सल्लयाशिवाय इस्टेटीची गहाण खरेदी भाडेपट्यानें देणें वगैरे कोणत्याही रितीनें विल्हेवाट करूं नये. व ह्याच नोटिशीनें इतर सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं बिजान मर्द सुपडू इजकडून कोणी गहाण खरेदी वगैरे कांहीं घेऊं नये. घेतल्यास तिचे व्यवहारानें आह्मी किंवा आमची जिंदगी बांधली जाणार नाहीं कळावे ता. ४।७।१६ सही

शेख वजीर वा॥ शेख जमाल नि. हातची रेघ राहणार धामणगांव (बढे) ता. मलकापूर

नो. नं. २३८

## अस्सल अंगुरी.

# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**


## नोटीस

स. स. नं. १२ सन १९१६
चौकशीची ता० १९-८-१६
वि. सीनीयर सबजज्य साहेब बहादर
आकोला यांचे कोर्टांत
अर्जदार
लक्ष्मी जवजे नारायण महाजन रा० पातुर सेखबाबु ता० बाळापूर जि० आकोला.

या नोटीशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें मयत नारायण सदाशिव महाजन राहणार पातुर शेखबाबु ता० बाळापूर यांचे ओरीएंटल लाईफ अशुरन्स कंपनी लि. मुंबई यांचे कडील पालिसी नं, ४७५७५ वरुन रुपये १००० एक हजार घेणें असलेल्या रकमेचा वसूल करण्यासाठीं सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल कि. अर्ज नंबर १२ सन १९१६ चा कोर्टांत २४-६-१६ इ. रोजीं दाखल केला आहे. या अर्जाची सुनावणीची ता० १९-८-१६ ची नेमली आहे. तरी या संबधानें कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्यानें स्वतः अगर वकीला मार्फत आपला लेखी जबाब वरील तारखेस या कोर्टांत दाखल करावा. याप्रमाणें न केल्यास अर्जदारास वरील तारखेला सर्टिफिकेट दिलें जाईल. व मग पुढें या संबंधानें कोणाची कांहीं तक्रार ऐकली जाणार नाहीं.

Sd/ D. K. Kolatkar.
सीनीयर सबजज्ज सा. कोर्ट आकोला

नो० नं० २३९

## जाहीर नोटीस

सेवंती मर्द सदाशिव रा. झोडग प्रगणें आनसिंग ता. वाशीम हिजकडून सदाशीव वा॥ लक्ष्मण मऱ्हाटे राहणार पहेनी तालुका इंगोली जिल्हा परभणी इलाखा मोगलाई यांस नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास सुमारें १२ बारा वर्षें झालीं असून अद्याप पावतो तुह्मी मजला नांदविण्यास नेले नाहीं व मजला पोसण्यास आई बाप नसले कारणानी अन्नवस्त्राबद्दल मजवर एकंदर ३०० रुपये कर्ज झाले आहे व आतां कोणी कर्ज ही देत नाहींत. सबब उपाशी मरण्याची वेळ आली असून तुह्मी जिवंत आहात किंवा मरण पावले आहां हें ही माहित झालें नाहीं. सबब त्रासून आतां ह्या नोटीशीनें तुह्मास कळविले जाते कीं जर तुह्मी जिवंत असाल तर ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत तुह्मी येऊन मजवरील कर्ज देऊन पावती घ्यावी व मजला नांदविण्यास घेऊन जावें. या प्रमाणें तुमचे कडून न झाल्यास तुह्मी मरण पावला आहा अगर तुह्मी मजला नांदविण्यास राजी नसून मजला दुसरा गंधर्व करण्यास तुमची संमती आहे असें समजून मी दुसरा नवरा करीन व कर्जाची फेड करीन मग तुमची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता. दस्तुर शेख इस्माईल अर्जनवीस वाशीम.

सही

सही सेवंती मर्द सदाशीव
हिचे हातचा निशानी आंगठा
द॥ गोवरधन बदरी

नो० नं० २४०


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भसंबंधि मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व बदाम भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वराल विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य. सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची कळा, सर्काच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें व याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुंगधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० डा० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. | Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1879 | 1,034 | 31,00,950 | 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 | 1888 | 11,48,6 | 36,38,694 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 | 1897 | 28,85,9 | 1,3390.729 |
| 1906 | 48,147 | 9,45,63.407 | 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 64 738 | 12,23,63.755 | 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

## *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager
Bombay.

or

*A. C. Lal,*
Branch Secratary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला---सोमवार तारीख १७ माहे जुलै सन १९१६ इ० [ अंक २८

# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे अांत करण्यांत येईल.

व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनी ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.

शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वी दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.

अर्ज यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शेभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता. १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

### हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

मी ———————————— अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राऑर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

एकूण रुपये.......

(रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास तो किती त्या रकमा त्यांकरितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा.)

(अ) माझी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें पुरूं असलेल्या सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधींचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

((अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा.)

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६–१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला यावें.

नांव ————————————

पत्ता ————————————

तारीख ————————

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ———————— ( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर ———————— ( हा नंबर हेड पोस्ट मास्तरानें घालावयाचा ).

नो. नं. २४१ हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

## ब्राम्हण लोकांकरितां

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्ट्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावींत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांनां लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालूं असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( अविस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु. ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते. या शिवाय दर वर्षी कपड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बन्नु येथें आहे.

नो नं २४२

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं १ } S. Clements, एजंट

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई याजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखी व घागऱ्याची वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर व्हाईट निवण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुट्टन अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता.
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं. ६

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## Wanted.

Representatives in every locality in India, Burma and Ceylon for the sale of our world-renowned "Hairtone" unique toilet preparation) under the system of cash prizes worth Rs. 50,000 among the purchasers of Hairtone. Pay Rs. 50, 40, 30, 25 and 20, besides iberal commission. Cash security required Rs 1000, 700, 500, 400 & 300 respectively. Service at present secured for 6 months. No risk, no trouble. Every honest, energetic man (or woman) may well undertake the work and secure a decent income in leisure hours, without interfering with service or profession if any. Apply for Rules and Regulations to the Hairtone Manufacturing Co, 155, Bowbazar Street Calcutta.

## सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

नामांकित लेखकांचे विचार परिप्लुत निबंध, बोधपर गोष्टी, अनुकरणीय चरित्रें, हृदयंगम कविता, चालू कादंबरी वगैरेंनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६. वार्षिक वर्गणी बाहेरगांवीं ट. ख. सह १॥≈ उमरावतीस रु. १॥ उमरावतीचे एजंट रा. सदाशिवराव देशमुख. जानेवारी १९१६ पासून सुरू झालें आहे. एजंट पाहिजेत.

संपादक— काशीराव बापुजी देशमुख.
अंबागेट उमरावती.
नो. नं. २२३

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.

नो. नं. २२४

## इंग्रजी शिकण्याची उत्तम सोय.

मौजे शिरसगांवबंड ता. एलिचपूर जि. उमरावती येथें इंग्रजी पहिल्या ४ चार इयत्तांचे वर्ग २५ वर्षांपासून चालू आहेत. गांवाबाहेर खुल्या हवेंत सरकारी पद्धतीची टोलेजंग दोन मजली इमारत बांधली असून बाहेरगांवचे विद्यार्थ्यांकारितां बोर्डिंग ही केलें आहे. बोर्डिंगांत स्वयंपाकी वगैरेची सर्व सोय केली आहे. यंदाचे वर्षी इंग्रजी चवथ्या यत्तेतून हायस्कूलच्या टेस्ट परिक्षेंत १२ पैकीं ९ विद्यार्थी पास झाले. हल्लीं प्रत्येक यत्तेंत ३-४ जागा रिकाम्या आहेत. गरजूं विद्यार्थ्यांनीं ता. २०-७-१६ पर्यंत खालील पत्यावर सर्टिफिकिटासह अर्ज करावे किंवा समक्ष भेटावें. जागा भरल्यानंतर आलेले विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्यांत येतील. कळावें. ता. ३-७-१६

गो. ना. दीक्षित.
हेड मास्तर— ए. व्ही. स्कूल.
शिरसगांवबंड

नो. नं. २२५

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मी मर्द फत्तु कुणबी राहणार शेगांव ता० खामगांव .

इसमा:—

झाबु वा उदेभान कुणबी रा० शेगांव ता० खामगांव यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची वडीलोपार्जीतची मिळकती पैकीं शेगांव येथील स्थावर मिळकत (एक नंबर सालीम व दुसरे नंबरातील हिस्सा) आमचा चुलता फत्तु यांचेकडे गेल्यानें तो मयत झाल्यापासून आज १५-१६ वर्षांपासून मी जमीन वाहत असून तुजला खाण्याकरितां १७५ रुपये दरसाल देत आलो आहे. असें असतां हल्लीं दुसरे लोकांचे नादानें लागून तीच जमीन १०० रुपयांस इतर इसमास लावून दिली आहे. यावरून असें दिसतें कीं त्या मिळकतीवर विनाकारण कर्जाचा बोजा करून तिची विल्हेवाट लावावी. वरून तुजला ही नोटीस देण्यांत येतें कीं सदहू मिळकत कोणाकडे गहाण खरेदी बक्षीस वगैरे करण्याचा अधीकार नाहीं. तसें केल्यास तो व्यवहार कायद्यानें रद्द होईल. तुझे हयातीपर्यंत ती जमीन मी वाहून अन्नवस्त्राचा खर्च देण्यास कबूल आहे ही नोटीस लिहिली ता. १०-७-१६

सही

झ्यावु उदेभान कुणबी द० खु०

नो. नं. ४४३

## नोटीस

नोटीस बेशमी शिवराम सुलताना जोशी धनगर राहणार वडगांव (रासाईचें) ता० शिरोळ जिल्हा पुणें

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं माझ्याशीं मोहतीर होऊन एक मुलगीही झाली. तुह्मी आज तीन वर्षे परागंदा झाला आहां. पत्रें पुष्कळ लिहिलीं पण उत्तर नाहीं व तुमचा बरोबर पत्ताही लागत नाहीं. तुह्मी माझ्या व मुलीच्या पालनपोषणाची कांहींच तजवीज करीत नाहीं. ह्मणून ही जाहिर नोटीस देत आहे कीं तुह्मी येथें यावें व सावकाराचें अन्नवस्त्राबद्दलचें कर्ज देऊन टाकावें आणि जनरितीप्रमाणें संसार करावा. ही सर्व व्यवस्था करण्यासाठीं तुह्माला १ महिन्याची मुदत दिली आहे. ही मुदत संपल्यानंतर तुह्मी आपला नवरेपणाचा हक्क सोडला असें समजून मी जातीगंगेपुढें हा प्रश्न मांडीन आणि त्यांच्या परवानगीनें दुसरा घरठाव करीन. मग तुमची कांहीं तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळवें ता० ७ जूलै १९१६ इसवी.

सही

रंगु मर्द शिवराम धनगर राहणार बेलखेड ता० मुर्तिजापूर निशाणी बांगडी

नो० नं० २४४

## नोटिशीचें उत्तर

शेट हाजी अली अबदुला कछी दुकान शेगांव ता० खामगांव. हल्लीं वस्ती वायापूर नि० धोराजी मुलुख काठीयावाड

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीसीचें उत्तर देण्यांत येते कीं मी तुमचे दुकानीं गव्हाचे पोते ११ अकरा व गुळाची खांडे ३० तीस व मिरचीचे पोते २६ सवीस याचा सवदा केला त्या पैकीं मी मिरचीचे पोते २६ सवीस व गुळाची खांडे १४ चवदा त्याचे माप घेऊन तो माल मी आपले ताब्यांत घेतला व तो नेला. गव्हाचे पोते ११ अकरा व गुळाचीं खांडें १६ याचे माप मी घेतलें नाहीं, कारण त्या दिवशीं माझे जवळ गाड्या नव्हत्या व तो माल मी मोजून ही घेतला नव्हता सबब त्या माला बद्दल मी जबाबदार नाहीं, मी तो माल तुह्मास काढण्यास सांगितला नव्हता, त्याचा फक्त सवदा केला होता. तरी या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी दिलेली नोटीस खोटी असून ती मजला कबूल नाहीं. कारण तुमचे हयगईनें व आळसानें तो माल भिजला आहे त्याचें नुकसान देण्यास मी जबाबदार नाहीं, व तो माल मी नेणार नाहीं. कळवें ता.

सही

चौथमल नरसींगदास दस्तुर खुद

नो० नं० २४५

## नोटीस

नोटीस बेशमी भगवानदीन वा तुळसीराम हलवाई रा० हराळ

यांस:—

खालील इसमाकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची बायको असून आज १५-१६ वर्षे आपण एका ठिकाणीं सुखानें राहीलो व तुमचे पासून मला संततीही झाली. अलिकडे ३-४ महिन्यापासून तुमचे आमचे बनत नाहीं व तुह्मी लोकांच्या नादी लागुन वेग वेगळ्या व्यसनाधीन होऊन स्थावर जंगम मालाची अफरातफर मांडली आहे. मिळकत थोडीसी वाडिलार्जीत आहे व बाकीची बहुतेक माझे माहेराकडील आणलेले दागीने मोडून घेतलेली आहे व तुमचा त्या इस्टेटीवर फारसा हक्क नाहीं. मुद्दाम आह्मास व पोरास बाहेर काढून स्वतः स्वैर वर्तन करण्याकरितां पाहिजे त्याप्रमाणें कुभांडें रचून माझी अब्रु हानी करून कसेही करून घरांतून काढून टाकण्याचा तुमचा इरादा आहे. पण तुह्मास या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुमचे सर्व कृत्य गैर कायदा त्यामुळें व तुमचे अफरातफरीमुळें मुलांचा व माझा इस्टेटीवरील हक्क जात नाहीं, व तुह्मी निशेध केलेले व्यवहार रद्द आहेत, सबब या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं याउपर कोणतेही इस्टेटीची वगैरे अफरातफर करू नये कळावें ता० ७-७-१६

सही

सुंदराबाई मर्द भगवानदीन हलवाई रा. हराळ द. खु.

नो. नं. २४६

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं लक्ष्मी मर्द फत्तु कुणबी रा. शेगांव ता. खामगांव इचे नवऱ्याची शेगांव येथील स्थावर मिळकत दोन नंबर पैकीं एक नंबर सालीम व दुसरे नंबरांतील हिस्सा आहेत. मैताचा मी पुतण्या असून मिळकत वडिलोपार्जीतची आहे. वरून त्या इस्टेटीचा मी मालक आहे. तिजला फक्त अन्नवस्त्राचा अखत्यार आहे. तिजकडून सदहू मिळकत कोणी खरेदी, गहाण, बक्षीस, वगैरे कोणत्याही प्रकारें लिहून घेऊं नये. अगर नोंदून घेऊं नये. तसा व्यवहार केल्यास त्याबद्दल इस्टेट व मी स्वतः जबाबदार राहणार नाहीं. झाल्यास तो सर्व व्यवहार रद्द होईल कळवें. ता १०-७-१९१६

सही

झ्याबू उदेभान कुणबी द. खुद

नो० नं० २४७

## नोटीस

नोटिस बेशमी सिता मर्द राघो रा० बोरगांवखुर्द पोष्ट कुरणखेड ता० आकोला

ईसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझी तूं साक्षात चुलती आहेस. व तूं माझे दिवाणी मचला निकाल झाल्या शिवाय इष्टेट अफरातफर करूं नये. कारण मी अज्ञान असतां माझी दोन खंडी बकरी किंमत रुपये (२००) व एक जोडी (१५०) ही माझी असतां माझा चुलता नामें राघो भिवजी यांनीं विकली. व तो मयत झाला, त्याची वारस तूं झाली आहेस. तर माझा अज्ञानाचा दाव्याचा निकाल झाल्यावांचून कांहींच खरेदी, गहाण, विक्री करूं नये. नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आपसांत निकाल करावा, नाहींतर कोर्टखर्च तुझ्यावर बसेल. कळवें ता. ७-६-१६ इसवी द. रतन गणपतराव सुभेदार

सही

जाणू वा॥ गणू धनगर नि॥ खुद

नो० नं० २४८

## नोटीस

रा. रा. बापूराव पतकी

यांसः—

मी खालीं सही करणार नोटिस देतो कीं, तुह्मी माझी जागा ह्मणजे जी चाळ दावकी रस्त्यावर आहे त्यापैकी ५ खोल्या त्याचे भाडें दरमहा दर खोली मागें रु. २ दोन प्रमाणें ५ खोल्याचे भाडे रुपये १० प्रमाणें कबुल करून घेतले. ती जागा ता. ८-१-१६ पासून घेतली असून तिचे भाडें मुळींच दिलें नाहीं. सबब तुह्मास जागा खालीं करून मागितली असतां देत नाहीं. व माझे घराचें नुकसान ही केले आहे. सबब नोटिस पावल्यापासून माझे मकान १ महिन्याचे आंत खालीं करून द्यावे. नाहीं पेक्षां यापुढें तुह्मी माझे मकानांत राहिले असतां तुमचे पासून खोली मागें रुपये चार ४ प्रमाणें दरमहा रुपये २० वासे प्रमाणें भाडे घेण्यांत येईल. यांत अंतर होणार नाहीं. व मागील राहिलेले भाडें ही वरील दिलेले मुदतींत देऊन पावती घ्यावी. असें करण्यांत चुकाल तर सर्व खर्चासुद्धां भाडे वसूल करण्यास आह्मास कायदेशीर इलाज करावा लागेल. रितीप्र॥ कोणतेही प्रकारची सबब न ऐकतां आह्मास जागा खाली करून द्यावी लागेल. आह्मी तुह्मास तोंडी १ एक महिन्यापासून सांगत असतां थापा देऊन टाळाटाळी करितां. आमचे इमारतीचे सामान ह्मणजे लाकूड जळाले व अफरातफर झाली सबब नोटिस पावल्यापासून वरील मुदतीचे आंत जागा खाली करून द्यावी. व झालेलें नुकसान तुह्मास भरून देणें भाग पडेल. यांत कोणतेही गोष्टीची सबब ऐकली जाणार नाहीं कळवें. ता. १ माहे जुलै सन १९१६ इ॥

सही

गणेश बळंवत दिगंबर द. खु.

नो० नं० २४९

## नोटीस

नोटिस बेशमी खंडू रावजी शेटफळे रा. अवदवाडा पो. कुऱ्हा ता. चांदूर जि. उमरावती

यांसः—

खालीं निशानी करणार नोटिस देते कीं, तूं माझा गंधर्वाचा नवरा असून त्वां मला ३ वर्षापासून माहेरी मनुष्य देऊन आणून घातलेस व स्वतः जुगार खेळून वाटेल तसा कालक्षेप करितोस. मी पुष्कळ निरोप पाठविले परंतु तूं मला घेऊन जात नाहीं. यावरून तुझे मनांत मला वागविण्याचे दिसत नाहीं. तूं पहिल्या बायकोचीही अशीच व्यवस्था केली होती. तरी आतां या नोटिशीनें कळविते कीं तुझ्या मनांत मला वागविणें असेल तर ही नोटिस पावतांच १५ दिवसांत येऊन घेऊन जावें. मी नांदण्यास तयार आहे. तसें मुदतींत न केल्यास हीच नोटिस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुझा माझेवर अगर मर्जी गंधर्व लावणारावर कोणताच दावा चालणार नाहीं. क. ता० ८-७-१६

सहीची निशानी आंगठा

भागी मर्द खंडू शेटफळे रा० टिटवें ता. आकोला पो. महान हिचा खुद

नो० नं० २५०

## नोटीस

ति. रा. रा. अण्णाजी त्रिंबक वैद्य रा. मलकापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, तुमचे ताब्यांत असलेली खालील जिंदगी— कसबे मलकापूर येथील

शेत सर्वे नंबर १३४ पैकीं १ एकर ६ गुंठे ३६ आकार रुपये १३। व बर राहते वडसिंगकरवाले ज्यांत हल्लीं तुह्मी राहत आहां ते, व मौजे शिरसाळे येथील शेत सर्वे नंबर १०२ इनाम याचा वहितदार कुंदलमल हंसराज मारवाडी शिरसाळेकर रा० मल्कापूर हा आहे, व साकीन इच्छापूर तहसील बऱ्हाणपूर जिल्हा नेमाड येथील इनाम याचा वहितदार तोताराम बारी हा आहे तो येणें प्रमाणें स्थावर माल व शिवाय इतर सालीम जंगम माल सोनें, चांदी, तांबें पितळेची भांडीं वगैरे माल तुमचे ताब्यांत असलेला येणें प्रमाणें स्थावर जंगम माल हा वडिलोपार्जीत आहे, तो तुह्मी कांहीं एक कारण नसतां अफरातफर करीत आहा, तरी तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, सदर्हू स्थावर जंगम मालावर माझाही हक्क आहे, करितां तुह्मी तो कोणास गहाण, खरेदी, देऊं नये. किंवा बक्षीस देऊं नये, दिल्यास तो व्यवहार रद्द होईल. करितां नोटिशीनें कळविले आहे. तसेंच सर्वत्रांस ही **जाहिरात** देतो कीं, वरील वर्णन केलेल्या जिंदगी पैकीं आमचे वडिलाकडून व आमचा बंधू नामें मल्हार अण्णाजी याजपासून कोणताही स्थावर व जंगम माल गहाण, खरेदी, बक्षीस, वगैरे घेऊं नये. घेतल्यास तो रद्द आहे असें समजले जाईल. कळावें, ता, ८-७-१६

सही

बळवंत अण्णाजी वैद्य दस्तुर खुद

नो० नं० २९१

## जाहिरात

सर्वत्र लोकांस असें जाहिर करण्यांत येते कीं रोखे पंचांनीं माझे चुलते रा० संपत रावोजी यांचे जवळ ठेवून पैसा वसूल झाल्याबरोबर दोघांना वाटून देण्याचे ठरविले आहे. तरी कोणीं आसांमीनें अगर ज्या सावकाराजवळ आमचे बापाचे नांवाचे खाते असेल त्यांनीं आमची सावत्र आई शेवंती इचेशीं परभारें व्यवहार करूं नये केल्यास त्याची जबाबदारी करणारावर राहील कळावे.

सही

गणपत जेमाजी माळी

नो. नं. २९२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस खालीं सही करणार हिजकडून कळविण्यांत येते कीं, माझा नवरा भगवानदीन वा॥ तुळशीराम हलवाई राहणार हराळ तालुका वाशिम हा वृद्ध झाला असून लोकांच्या संगतीनें बिघडला असून बरोबर शुद्धीवर नसतो. त्याजपासून कोणी स्थावर. जंगम, इष्टेट, विकत घेऊं नये. घेतल्यास त्यामुळें त्याचीं मुलें व मी याचे हक्कास कांहीं बाध येणार नाहीं. त्याजबद्दल भानगड उपस्थित होऊं नये ह्मणून या नोटिशीनें जाहीर केलें आहे. कळावें ता. ७-७-१६ हराळ

सही

सुंदराबाई मर्द भगवानदीन हलवाई

नो० नं० २९३

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य ३ शके १८३८

## हिंदुस्थानची शेतकी.

बनारस येथें गेल्या एप्रिल मध्यें लार्ड हार्डिंज यांच्या हातून हिंदु युनिव्हर्सिटीच्या इमारतीची कोनशिला बसविण्याचा समारंभ झाला, त्यावेळीं अनेक विद्वानांचीं भिन्न भिन्न विषयांवर उत्तम उत्तम भाषणें झालीं. त्यांपैकीं कांहीं इतकीं महत्त्वाचीं होतीं कीं तीं स्वतंत्र पुस्तकरूपानें निघून सर्वांच्या वाचनांत येणें अवश्य आहे. अशा महत्त्वाच्या भाषणांपैकीं 'हिंदुस्थानची शेतकी' या विषयावर रे. मि. सॅम हिगिनबॉटम यांचें झालेलें भाषण हें एक होतें. पण दुर्दैवाची गोष्ट आहे कीं या भाषणाचा फारच थोडा भाग आणि तोही कांहीं वाचकांच्या कांहीं मर्यादित संख्येलाच वाचण्यास मिळाला. व्याख्यात्यांचें लक्ष या विषयाकडे कसें लागलें त्याचा इतिहास ही गमतीचा आहे. ते प्रथम तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर ह्मणून इकडे आले. पुढें अडचणीमुळें त्यांना अर्थशास्त्राच्या प्रोफेसराचें काम करावें लागलें. तें करीत असतां सुट्टीच्या दिवशीं सहल करण्याकारितां ते सहज खेड्यापाड्यांतून हिंडत असतां हिंदी शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिति त्यांचे नजरेस पडली. त्यावरून त्यांच्या दारिद्र्याच्या कारणांचा शोध त्यांनीं चालविला व या शोधाअंतीं त्यांचे जे विचार निश्चित झाले ते त्यांनीं हिंदु युनिव्हर्सिटीपुढें मांडले. या विचारांचें सार हें आहे कीं हिंदी शेतकरी दिवसेंदिवस दारिद्र्यपंकांत अधिकाधिक बुडत चालला आहे यांत शंका नाहीं, पण त्याचें कारण केवळ अज्ञान हें आहे. शेतकीच्या धंद्याला उत्कर्षाला आणण्यासाठीं पाश्चात्य देशांतून कसकसे प्रयत्न चालले आहेत याची त्याला गंधवार्ता ही नाहीं; इतकेंच नाहींतर शास्त्रीय ज्ञानाच्या अभावामुळें त्याचे स्वतःच्या हातून इतक्या भयंकर चुका घडत आहेत कीं त्याच्या पायींच त्याला दारिद्र्यासारखें खडतर प्रायश्चित भोगावें लागत आहे. उदाहरणार्थ, तींच तीं पिकें दरसाल जमिनींतून काढल्यामुळें जमीन निकस होत चालली आहे. पण जमिनींतल्या ज्या द्रव्याचा साठा आपण खर्चून टाकीत आहों त्यांत पुनः कशी भर टाकतां येईल हें त्याला कळत नाहीं. चुना, पोट्याश, व फास्फरस यांचा खतांमध्यें कसा उपयोग करून घ्यावा याचें त्याला ज्ञान नसल्यामुळें हीं द्रव्यें ज्यांत आहेत असे पदार्थ तो निरुपयोगी ह्मणून फेकून देत असतो, किंवा निष्कारण भलत्या कामीं त्यांचा उपयोग करीत असतो. उदाहरणार्थ, गुरांचीं हाडें रानोमाळ पसरलेली दिसतात; पण त्यांचा उपयोग करून जमीनीला फॉस्फरसाचा पुरवठा करण्याचें ज्ञान शेतकऱ्याला नसल्यामुळें परदेशच्या व्यापाऱ्यांचे एजंट तीं गोळा करून विलायतेस पाठवितात गळिताच्या धान्यापासून तेल काढल्यानंतर राहणारी पेंड हें उत्तम खत आहे. कांहींची पेंड गुरें खातात. पण हीं धान्यें परदेशीं गेल्यामुळें आमच्या इकडच्या पेंडीनें परदेशच्या जमिनी सुपीक होत आहेत! शेतकऱ्याला आपला धंदा संभाळून रिकाम्या वेळांत दुभतीं जनावरें पाळण्याचा किफायतशीर धंदा सहज करतां येण्यासारखा आहे. या दुधाच्या धंद्यांत पडलेल्या माणसानें महिन्याचे काठीं ४००० शेर दूध देणाऱ्या गाई पाळल्या व त्यांची नीट व्यवस्था ठेविली तर त्याला दरमहा २०० रुपयांची अविच्छिन्न प्राप्ति झालीच पाहिजे असें मि. हिगिन बॉटम यांनीं आंकड्यांच्या साह्यानें सिद्ध करून दाखविलें आहे. उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र गव्हाचा पेरा करतात. हाच गव्हाचा पेरा शास्त्रीय पद्धतीनें केला असतां कसा फायदेशीर होण्यासारखा आहे तें त्यांनीं येणें प्रमाणें आंकडे मोडून दाखविलें आहे—

| | | |
|---|---|---|
| दर एकरीं सारा, लागवडीचा खर्च, राखणावळ वगैरे मिळून कमींत कमी खर्च | रु० | ४० |
| दोन गाईपासून मिळणारें खत | " | १२ |
| इरिगेशन खर्च | " | १० |
| सुधारलेलीं आउतें व बीं यांचा खर्च | " | १० |
| फॉस्फरस, पोट्याश व नायट्रोजन यांचा खर्च | " | १० |
| उन्हाळ्यांत नांगरण्याचा खर्च | " | ३ |
| एकूण खर्च | रु. | ८५ |

आतां उत्पन्नाचे आंकडे घ्या—

| | | |
|---|---|---|
| दर एकरीं पिकाचें उत्पन्न ८ मण, भाव दरमणास ४ रु. प्रमाणें | रु. | ३२ |
| भुसा दर एकरीं मण १६ भाव मणास १ रु. प्रमाणें | रु. | १६ |
| एकूण | रु. | ४८ |

या शिवाय इतर उत्पन्नांचे आंकडे त्यांनीं दाखविले आहेत ते घेतले तर सर्व मिळून होणारें उत्पन्न खर्चापेक्षां इतकें ज्यास्त होतें कीं शेतकऱ्याला एकरामागें कमींत कमी ८ रुपये नफा राहिलाच पाहिजे. पण शेतकीसारखा उत्पन्नाचा धंदा अशिक्षित वर्गाच्या हातीं देऊन सुशिक्षित लोक वेदांत, राजकारण, साहित्य वगैरे अनुत्पादक गोष्टींच्या चर्चेंतच आपलें डोकें खर्च करीत असल्यामुळें परिणाम हा झाला आहे कीं शेतकीचा धंदा करणें ह्मणजे आपली किंमत कमी करून घेणें आहे अशी लोकांची चुकीची समजूत होऊन बसली आहे. वेदांताचा काथ्याकूट लोकांना आवडतो याचें कारण उद्योगाचा महिमा शिकलेल्यांच्या ही मनावर चांगला बिंबलेला नाहीं हें आहे. हातांत नांगर धरणें हें मध्यम वर्गाच्या लोकांना हलक्या प्रतीचें वाटतें. यामुळें त्या वर्गांतले शेतकरी मजुरांकडून कामें करवून घेतात. पण ज्याला स्वतःला नांगर धरतां येत नाहीं किंवा तसें करण्याची लाज वाटते तो मजुरांना मार्गदर्शक कसा होणार? आमच्या लोकांना अंग मोडून काम न करतां सुखानें, आळसानें चैनींत दिवस घालवण्याची जी चटक लागली आहे ती आमच्या देशाच्या हानीच्या मुळाशीं आहे. हे लोक आपला दोष दुसऱ्यावर घालवयास पाहतात आणि सरकार शेतकऱ्यांना पिळून काढीत आहे वगैरे विधानें करतात. पण खरी गोम त्यांच्याच ठायीं आहे. आमचा सुशिक्षित वर्ग पूर्णपणें परावलंबी झाला आहे. स्वावलंबन त्याच्यां गांवीं ही नसते. त्याच्या घरांत कामें करण्याला नोकर लागतात. बाजारांतून भाजी आणावयाची झाली तरी ती स्वतः आणण्याची त्याला लाज वाटते. त्याला सगळें आयतें पाहिजे. पांच पंचवीस रुपड्यांसाठीं सरकारी अधिकाऱ्यांच्या लाथा खाणें त्याला आवडतें. कारण त्या त्याला खुर्चीवर बसल्या बसल्या मिळतात पण शेतांत हातांत नांगर किंवा खुरपें घेऊन स्वतंत्रपणें काम करणें त्याला आवडत नाहीं. सारांश काय, तर आमचा सुशिक्षित वर्गच मुळीं वाईट उदाहरण घालून देत आहे. त्याला प्रथम उद्योगाचा महिमा शिकवावयास पाहिजे. तर हिंदुस्थानची ग्रहदशा पालटेल. त्यानें उद्योगाचा धडा दुसऱ्यास शिकवावयाचा, पण जो स्वतःच ऐदी तो दुसऱ्याला काय शिकविणार? यामुळें जवळ खायाला भरपूर असून आमचा देश उपाशीं मरत आहे. या बद्दलची सगळी जबाबदारी अर्थात सुशिक्षितावर आहे. त्यांना ती समजत असेल तर त्यांनीं प्रथम शेतकरी बनले पाहिजे.

## गांवपंचायती.

अलीकडे जातिभेदाचें निर्मूलन करण्याच्या उद्देशानें काम करणाऱ्या कित्येक मंडळीच्या हातून जातिद्वेष वाढविण्याचें काम मात्र उत्कृष्ट प्रकारें होत असतें. आमच्यांत जातिभेद आज शेकडों वर्षें आहे. पण तो अतिशय कडकडीत स्वरूपांत होता त्यावेळीं सुद्धां जातिद्वेषाचा लवलेश ही त्यांत नसे हें गांवपंचायतीचा जो इतिहास मि. मथई यांनीं अलीकडे इंग्रजींत लिहून प्रसिद्ध केला आहे त्यावरून दिसतें. गांवपंचायतींत सर्व जातींचे लोक असत व त्यांचे हक्क सारखे मानिले जात असत हें उठल्या सुटल्या 'बामणा' ना शिव्या देत सुटणाऱ्या लठ्ठ प्रभृति विद्वान् ब्राह्मणेतरांना ठाऊक नसलें तरी इतिहासांत नमूद आहे. तेव्हां आमच्यांतले जातिभेद नष्ट झाल्याखेरीज आमची राजकीय उन्नति होऊं शकणार नाहीं हें तत्व उराशीं बाळगून सहभोजनें घडविण्यांतच कृतकृत्यता मानणाऱ्या भारतसेवक नामधारी मंडळीनें नीट डोळे उघडून इतिहास पहावा, आणि भलत्या कामीं आपला उत्साह खर्च न करतां जातिद्वेष नाहींसा करण्याच्या उद्योगाला लागावें असें जें आह्मी आतांपर्यंत ह्मणत आलों आहों त्याला इतिहासाच्या आधाराची ही पुष्टि मिळालेली पाहून आह्मांस आनंद वाटतो. गांव पंचायतींचें पुनरुज्जीवन ह्मैसूर व बडोदें यांच्या सारखीं देशी संस्थानें करूं लागलीं आहेत. इतर संस्थानिकांनीं ही तें कां करूं नये?

## महायुद्धाची प्रगति.

इंग्रज, फ्रेंच व रशियन या तिघांच्या संयुक्त शक्तीचा जोर आतां जर्मनीला चांगलाच कळूं लागला असला पाहिजे. युद्धाच्या प्रारंभीं इंग्रजांची लढण्याची तयारी नव्हती,

व रशीयाजवळ माणसें होतीं, पण दारूगोळा वगैरे युद्ध सामुग्री नव्हती, यामुळें जर्मनीला यथेच्छ धुडगुस घालतां आला, व त्या धुडगुसांत बिचारी बेल्ज्यम व सर्विया हीं दोन छोटीं राज्यें तुडविलीं गेलीं. पण आतां संयुक्त राष्ट्रांनीं आक्रमणाला सुरुवात केल्यापासून जर्मनीला त्राहि भगवन् करून सोडलें आहे. इंग्लंडांतल्या निराशावाद्यांना सुद्धां आतां आपलीं मतें पालटावीं लागत आहेत. जटलांडपाशीं झालेल्या आरमारी युद्धांत जर्मन आरमाराला इतका मार खावा लागला कीं त्याला तोंड लपवून बसावें लागलें आहे तरी त्या युद्धांत आमचाच जय झाला असें जर्मन लोक ह्मणत आहेत. धडधडीत इतकें खोटें लिहिणाऱ्या पत्रांनीं जर्मनीचे आरंभीं आरंभीं जे जय झाले त्यांचीं वर्णनें किती तिखटमीठ लावून रसभरित केलीं असतील याची बरोबर कल्पना आतां करतां येईल. व्हर्डुनपाशीं फ्रेंचांनीं अतुल पराक्रम करून जर्मनांच्या रक्तांच्या नद्या वाहिल्या तरी तेथें ही आमच्यापेक्षां फ्रेंचच अधिक प्राणास मुकले असें निधड्या छातीनें जर्मन सांगत आहेत! पण जर्मन पत्रांनीं किती ही खोटीं विधानें केलीं तरी त्यांनीं फार झालें तर लोक फसतील, पण सत्याचें स्वरूप पालटणार नाहीं. मेलेले लोक जिवंत व्हावयाचे नाहींत किंवा मित्रराष्ट्रांनीं काबीज केलेले खंदक जर्मनांना परत मिळणार नाहींत. व्हर्डुनपाशीं फ्रेंच तोफखान्याच्या भडिमाराच्या जोरांत रतिमात्र अंतर पडलेलें दिसत नाहीं.

## पाश्चिम रणक्षेत्र.

युद्धाच्या प्रथम चरणांत या रणक्षेत्रांत जागोजाग जर्मन लोकांनीं तारांचें जें जाळें पसरलें आहे त्याचा नाश ब्रिटिश तोफांना करतां येईना. पण आतां ती अडचण दूर झाली आहे. इतके दिवस जर्मनीची यंत्रशक्ति व मनुष्यबळ हीं दोन्ही ब्रिटिशांपेक्षां वरचढ होतीं. आतां ब्रिटिशांची तयारी प्रसंगानुरूप हवी तशी झाली आहे, हें जर्मन सैन्यांतलें सर्वोत्कृष्ट रत्न ह्मणजे प्राशियन गार्डस् त्याच्या पराभवावरून स्पष्ट झालें आहे. इंग्रजांनीं मामेत्झ हें ठाणें घेण्यांत जें शौर्य व लढण्याचें कसब दाखविलें तें पाहून आतां त्यांना अशक्य असें कांहीं नाहीं असे उद्गार युद्धकलाभिज्ञांना काढावे लागले आहेत. गेल्या पंधरा वीस दिवसांत मित्र राष्ट्रांची आक्रमणशक्ति इतकी वाढलेली दिसून आली कीं युद्धाचा अंतकाल केव्हां येतो हें पाहण्यासाठीं ज्योतिषी बोटें घालूं लागले आहेत. सॉमच्या उत्तरेस फारच निकराची लढाई झाली. जर्मनीच्या दुसऱ्या लायनीला ढकलीत ढकलीत पुढें सरकत जाण्याची आतां इंग्रजांना पूर्ण उमेद वाटूं लागली आहे. म्यूजनदीच्या दोन्ही तीरांवर तोफांचा भडिमार जोरानें सुरू आहे. बेल्ज्यन क्षेत्रांत ही जर्मन तोफखान्याला इंग्रजांनीं स्तब्ध केलें आहे. फ्रेंच लोक एका मागून एक खंदक घेत आहेत. हातीं लाग[illegible] कैदी शेंकड्यांनीं नव्हे तर हजारो[illegible]वे लागत आहेत.

## रशियन चळवळ.

पश्चिम रणक्षेत्रांत या प्रमाणें जिकडे तिकडे इंग्रज व फ्रेंच हे विजयी होत आहेत, अशा वेळीं रशियन लोकांनीं ही पूर्व रणक्षेत्रांत चळवळ सुरू ठेवल्यामुळें शत्रूची घाबरगुंडी उडाली आहे. जनरल ब्रुसिलॉफ आस्ट्रियन शत्रूंना रेटीत चालले आहेत व आस्ट्रियन अंगांतलें सर्व बळ एकवटून त्यांना अडवूं पाहत आहेत. पण राशीयन रूळ सारखा चेपीतच चालला आहे, हा रूळ डेलाटिनपर्यंत जाऊन पोंचला आहे, व हंगेरीच्या बाजूला कोरोसमेझोकडे जाणारी रेल्वे त्यानें तोडली आहे. आस्ट्रियन सेनापति बोथमर यांच्या सैन्याला रसद पोंचविणारी ही रेल्वे नष्ट झाली, तेव्हां त्या सैन्याची उपासमार होण्याची व कार्पेथियन कडून कुमक पाठविणें बंद पडण्याची भीती आस्ट्रियाला साहजिकच वाटूं लागली आहे. राशीयन लोक बॅरोनोव्हीचीवर तिन्ही बाजूंनीं भडिमार करीत आहेत. हें ठाणें तेथील रेल्वेमुळें जर्मन लोकांना फार महत्त्वाचें होतें. ह्मणून त्याचा नाश करणें अवश्य दिसलें. सध्याच्या रंगावरून हें ठाणें राशीयनांच्या हातांत खास जाणार असें दिसतें या भागांत तूर्त लढाई रंगांत आहे. गेल्या महिन्यांत पांच लक्षाहून अधिक आस्ट्रियन या भागांत मारले गेले असा राशीयन लष्करी अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. स्टीर व स्टोचोड येथें ही तीन दिवसांच्या लढाईंत १२००० शत्रु व ४१ तोफा मित्रराष्ट्रांच्या हातीं लागल्या. रिगापासून थेट कार्पेथिअनपर्यंत राशीयन आक्रमण करीत आहेत यावरून त्यांचा जोर किती असला पाहिजे याची कल्पना करतां येईल. तिकडे अर्जरूमच्या पाश्चिमेस तुर्कांचा एके ठिकाणीं मोठाच पराभव झाल्याची खबर आली आहे. तेथें बरेच लोक, तोफा, व रसद राशीयाचे हातीं लागली आहे.

## इटालियन रणक्षेत्र.

यांतल्या गडबडीची खबर अलीकडे फारशी आलेली नाहीं, तथापि जी आली आहे तिजवरून इटालियन लोक आस्ट्रियनांचे कांहीं चालूं न देतां आपली जागा संभाळून आहेत येवढें खास दिसतें. आडिज व ब्रेंटा यांच्यामध्यें त्यांचें आक्रमण सुरू आहे, व आस्टिको नदीकडे त्यांनीं कित्येक जय ही मिळविले आहेत. सालोनिका कडची मात्र कांहीं खबर नाहीं.

## बिझांट बाईला बंदी.

अलीकडे बिझांट बाई राजकारणांत जोरानें पडल्यापासून सरकारची त्यांच्यावर वक्रदृष्टि आहे व ही वक्रता दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे. सरकारच्या दृष्टीनें येवढें घोर पाप तरी त्यांनीं कोणतें केलें आहे तें कळत नाहीं. त्यांच्या न्यू इंडिया छापखान्यापासून मद्रास सरकारनें जामीनकी घेतली. आतां मुंबई सरकार त्यांच्या पाठीस लागलें आहे. मद्रास सरकारला त्यांच्या लेखांतच तेवढें संकट दिसलें. मुंबई सरकारला तर त्या बाईचें मुंबई इलाख्यांत नुसतें जाणें येणें सुद्धां भयावह वाटून त्यांनीं एक मनाई हुकुम बाईवर बजाविला आहे! प्लेगची साथ जशी भयंकर ह्मणून क्वारंटाईन ठेवतात, तसें या बाईच्या संसर्गापासून मुंबई इलाख्याला अलिप्त ठेवण्याची खबरदारी मुंबईसरकारनें घेतली आहे, आणि त्यांना साऱ्या हिंदुस्थानांत कोठें ही राहूं देऊं नये अशा सूचना आंग्लोइंडियन पत्रांतून होऊं लागल्या आहेत! हिंदुस्थानसरकार खरोखरच या सूचना अमलांत आणण्याइतका म्याडपणा किंवा अविचारीपणा दाखवील असें आह्मांस वाटत नाहीं. मिसेस बिझांटबाईनीं आजपर्यंत राजनिष्ठा विषयक जीं भाषणें केलीं, लेख लिहिले, सेंट्रल हिंदु कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या मनावर राजनिष्ठेचा उपदेश बिंबविण्याचे परिश्रम केले ते सारे व्यर्थ गेले काय? बिझांट बाईविषयीं भलतीच शंका घेतांना त्यांचा विचार करावयास नको काय? इतकें घाबरण्यासारखें त्या बाई काय करीत आहेत तें सरकार एकदा जाहीर करील तर लोकांना सावध तरी राहतां येईल. नुसतें संशयावरून साप साप ह्मणून दोरीला बडविण्यांत काय अर्थ आहे?

## बडोद्यांतील शिक्षण.

शिक्षणाचे बाबतींत बडोदे संस्थानानें सगळ्या हिंदुस्थानांत अग्रस्थान पटकावलेलें असल्यामुळें त्या संस्थानच्या शिक्षणाचा वार्षिक रिपोर्ट साहजिकच सर्वांचें चित्त वेधतो. १९१४–१५ सालच्या रिपोर्टावरून असें दिसतें कीं त्या संस्थानांत सरासरीनें प्रत्येक गांवाला एकेक शाळा आहे. शिकण्याच्या वयाचे सगळे मुलगे आणि शें. ८० मुली शिकत आहेत. संस्थानच्या उत्पन्नाचा एक अष्टमांश निवळ शिक्षणाकडे खर्च होत आहे. संस्थानांत १ आर्टसकॉलेज, मुलांची चार हायस्कुलें, एक मुलींचें हायस्कूल, व २६ आंग्लोव्हर्नाक्युलर शाळा असून या शिवाय सरकारी मदत घेणारीं हायस्कुलें व ए. व्ही. स्कुलें मिळून सत्तावीस आहेत. सरकारी मदत नाहीं अशा ६ इंग्रजी शाळा आहेत. या सगळ्या इंग्रजी शाळा मिळून ९००० विद्यार्थी आहेत. इतक्या सोई आहेत. यामुळें इंग्रजी शिक्षणाविषयींची लोकांची इच्छा वाढत्या प्रमाणावर आहे. इंग्रजी शिकणाऱ्या मुलींची ही संख्या वाढत आहे. मुलींसाठीं स्वतंत्र ए. व्ही. स्कुलें नाहींत. खेड्यापाड्यांतल्या लोकांना सुद्धां आपल्या मुलांनीं इंग्रजी शिकावें अशी फार इच्छा दिसते. पण प्रत्येक गांवांत ए. व्ही. स्कूल ठेवण्याची सोय नसल्यानें लोकांची इच्छा अतृप्त राहूं नये ह्मणून एक तोड काढण्यांत आली आहे. ती ही कीं अशा गांवीं एकेक अंडर-ग्राज्येट शिक्षक ठेवावयाचा व त्याचा पगार अर्धा सरकारनें व अर्धा गांवकऱ्यांनीं द्यावयाचा. ही व्यवस्था २८ गांवांनीं कबूल केली आहे. बडोदें संस्थानच्या व्यवस्थेंतली दुसरी एक गोष्ट इतर संस्थानांनीं घेण्यासारखी आहे. ती ही कीं सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याच्या भंगा पासून होणारें दंडाचें उत्पन्न इतर कामांत खर्च न करतां प्राथमिक शाळांच्या सुधारणेकडे लावायाचे. रिपोर्टांतली एक गोष्ट प्रथम दर्शनीं जरा चमत्कारिक दिसते, ती ही कीं तिसऱ्या यत्तेपर्यंत शिकविणाऱ्या शाळांतल्या विद्यार्थ्यांची संख्या वरच्या ह्मणजे पांचव्या यत्तेपर्यंत शिकविणाऱ्या शाळांतल्या संख्येपेक्षां गतवर्षीं अधिक होती, पण यंदा तो प्रकार उलट झालेला दिसतो, ह्मणजे वरच्या वर्गांतल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली दिसते. याचे कारण डायरेक्टर साहेबांच्या मतें असें आहे कीं खालून वरच्या वर्गांत जितकीं मुलें गेलीं तितकी खालच्या वर्गांत नवी भरती झाली नाहीं, आणि ही भरती न होण्याचें कारण त्या गांवांत शिकण्याच्या वयाचीं मुलें भरती होण्याला नाहींतच, शिक्षकांचे पगार कमी आहेत ही ओरड विलायतेंत सुद्धां आहे, तेव्हां बडोद्यासारख्या संस्थानांत ती असल्याचें नवल नाहीं. खुद्द डायरेक्टर साहेबांनीं ही ही गोष्ट कबूल केली आहे, पगार कमी असले ह्मणजे शिक्षकांचें मन आपल्या कामाकडे न लागणें स्वाभाविक आहे. अर्थात त्याचा पगार वाढविल्याशिवाय शिक्षणाची स्थिति सुधारणें शक्य नाहीं. पण शिक्षणाचे पायीं सरकारनें खर्च तरी किती करावयाचा? त्याला ही कांहीं मर्यादा आहे आणि बडोदें संस्थानानें ही मर्यादा अगोदरच गाठलेली असल्यामुळें त्याच्यावर अधिक ओझें घालण्याचा आग्रह धरणें वाजवी नाहीं. अशा वेळीं गांवकऱ्यांनीं फंड करून ही उणीव भरून काढण्यास सरकारला मदत केली पाहिजे असें आह्मांस वाटतें. मुलांना व मुलींना एकत्र शिक्षण द्यावें असें ह्मणणारांना बडोदें संस्थानचा पुढील अनुभव गमतीचा वाटेल. जेथें जेथें अशी व्यवस्था आहे तेथें मुलींच्या शिक्षणाची हेळसांड होते, मुलींच्या शाळेंत त्यांच्या शिक्षणाकडे जसें लक्ष दिलें जातें तसें मुलांच्या शाळेंत दिलें जात नाहीं असें मे. डायरेक्टरसाहेब रिपोर्टांत लिहितात. दहा वर्षांच्या वरच्या मुलींना मुलांचे शाळेंत पाठविण्यास लोक नाखुष असतात, आणि तें वाजवी आहे. पाश्चात्य समाजाची पारिस्थिति आपल्याहून भिन्न आहे तोंपर्यंत प्रौढवयाच्या मुलींना मुलींच्याच शाळेंत घालणें अवश्य आहे. पण लहान वयाच्या मुली मुलांच्या शाळेंत जात असल्यातर तेथें त्यांच्या शिक्षणाची हेळसांड होते याचें कारण काय त्याचा तपास अवश्य केला पाहिजे. सगळ्याच मुलींसाठीं स्वतंत्र शाळा असलेल्या चांगल्या. पण शिक्षकिणींच्या दुर्मिळतेमुळें मिश्र शाळा ठेवणें भाग पडतें. शिक्षकिणी तयार करण्याचा बडोदें संस्थानचा यत्न सुरू आहे. त्या पुरेशा मिळूं लागेपर्यंत मिश्र शाळां ठेवल्यावांचून गत्यंतर नाहीं. मुलींच्या शाळांसाठीं चार इन्स्पेक्ट्रेसेस आहेत असें रिपोर्टांत ह्मटलें आहे. या चारांत कोणी विदेशी इन्स्पेक्ट्रेस आहे काय, व या इन्स्पेक्ट्रेसेसना शिकविण्याचा अनुभव व शिक्षणपद्धतीचा परिचय कितपत आहे वगैरे माहिती रिपोर्टांत दिली असती तर त्यांच्या हातून शाळांवर देखरेख करण्याचें काम कितपत होण्यासारखें आहे याचा अंदाज करतां आला असता. कारण, युरोपियन बाया किती ही हुशार असल्या तरी भिन्नपरिस्थितिमुळें त्यांच्या हुशारीचा फायदा आमच्या मुलींना हाऊं शकत नाहीं, आणि नुसत्या युनिव्हर्सिटीच्या पदवीधर स्त्रिया ही शिकविण्याचा प्रत्यक्ष अनुभव असल्या

शिवाय या कामीं तितक्याच निरुपयोगी ठरण्याचा संभव असतो. म्हणून स्त्रियांना इन्स्पेक्ट्रेस नेमतांना या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्याची अवश्यकता आहे.

---

## हिंदुस्थानातल्या चलनी नोटा.

गेल्या एप्रिल अखेर विलायतेंत हिंदुस्थानच्या खात्याला असलेल्या चांदींत १ कोट ४२ लक्ष रु. ची तूट पडल्यामुळें हिंदुस्थानांत पाऊण कोट रु. चे चांदीचें नाणें पाडण्याची घाई सरकारानें केली. त्यामुळें चांदीचा भाव वाढला, उलट अनामत सोन्याबद्दलची विलायतची जामीनगिरी २ कोटी ३१ लक्षांनीं वाढल्यामुळें या परिस्थितीला तोंड म्हणून हिंदुस्थानांत चलनी नोटांचा प्रचार वाढविण्याचें अगत्य वाटूं लागलें आहे. एप्रिल अखेर ६९, ४७ लक्ष किंमतीच्या नोटा चालू होत्या. जून मध्यें ६८, २२ लक्ष रुपयांच्या होत्या, दोन महिन्यांत ही वाढ विशेषच म्हणावयाची.

---

## हुंड्याच्या प्रश्नाचें निराकरण.

बंगाली लोकांचा समाज हुंड्याच्या प्रश्नासंबंधानें मोठ्या चिंतेंत पडणें अगदीं स्वाभाविक आहे, कारण, तेथें हुंड्याचें खूळ इतकें माजलें आहे कीं ज्यांना पांच चार मुली असून लक्ष्मीच्या वडील बहिणीची ज्यांच्यावर पूर्ण कृपा आहे अशा लोकांना आपल्या मुलींचें काय करावें ही चिंता अहोरात्र जाळीत असते. आपल्या इकडे प्रभु ज्ञातींत जवळ जवळ अशीच स्थिति येऊन पोचली आहे व इतर हिंदूंतही कमी जास्त मानानें काळजी उत्पन्न करण्यासारखी स्थिति येऊं पाहत आहे, अशा वेळीं या प्रश्नाचा कांहीं तरी कायमचा निकाल लागणें जरूर आहे. पण तो लागावयाचा कसा व कोणी लावावयाचा ? सामाजिक परिषद हा प्रश्न हातीं घेण्यास उत्सुक दिसत नाहीं, आणि तिनें घेतला तरी तिच्या हातून कांहीं कार्यभाग होणें नाहीं. कारण, तिचे घटक म्हणजे बोलघेवडे सुधारक, आणि ते तर हुंडा मागण्यांत सर्वांवर कडी करणारे. अशा बाबतींत जुनी मंडळीच ज्यास्त विवेक आणि कारारीपणा दाखविणारी असते असा अनुभव आहे. कलकत्त्याच्या 'बंगाली' पत्रानें जो उपाय सुचविला आहे तो विचार करण्यासारखा आहे. मुलींचीं लग्नें त्या प्रौढवयाच्या होईपर्यंत करूच नयेत, असें त्याचें म्हणणें आहे, रजोदर्शनाचा काळ अतिक्रमिला जाऊं नये या भीतीनेंच मुलींचीं लग्नें घाईघाईनें उरकून घ्यावीं लागतात व हुंड्याच्या मागणीला त्यामुळें जोर येतो, पण ती भीती दूर होऊन रजोदर्शनानंतर विवाह करण्याची चाल रूढ झाल्यावर हुंड्याच्या मागणीला आळा बसलाच पाहिजे. हा उपाय अंमलांत येण्यास मोठी अडचण बापकांकडून येणारी आहे. रजोदर्शनानंतर मुलींनीं अविवाहित राहणें म्हणजे भ्रूणहत्येचें पातक माथीं घेणें आहे, ही त्यांची समजूत पालटणें फार मुष्किलीचें आहे. दुसरा एक उपाय असा सुचविण्यांत येतो कीं तरुणांनीं हुंडा घेऊन विवाह करण्यास संमति देऊं नये. अलीकडे तरुणांच्या मनाची प्रवृत्ति या सुधारणेकडे होत चालली आहे. तथापि येथें ही त्यांचें मन द्विधा होण्यासारखा प्रसंग येतो. आईबापांची आज्ञा—मग ती कितीही अविचारमूलक व नीतिविरुद्ध असो—पाळावी कीं आपल्या मनोदेवतेच्या शिकवणीला मान देऊन समर्थ रामदास स्वामीप्रमाणें 'सावधान' व्हावें असा प्रश्न ज्यावेळीं तरुणांच्या पुढें उभा राहील, तेव्हां त्यांच्या नीति धैर्याच्या परीक्षेची खरी वेळ येईल. या परीक्षेच्या वेळीं कसोटीला उतरणारे तरुणांची संख्या सध्याच कांहीं लहान नाहीं; आणि खटपट करून त्यांच्या मनावर ही गोष्ट ठसविण्याचे प्रयत्न झाल्यास त्यांना यश येण्याचा दिवसें दिवस ज्यास्त संभव आहे असें आम्हांस वाटतें.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— १२ इंचा इतका पुनर्वसूच्या मध्यांशापर्यंत यथाकाल पाऊस व नव्या बालांकुरांना जोमांत आणणारा सूर्यप्रकाश यांच्यामुळें पिकाची भावी आबादानी मनाला आल्हाद देते. हा वर्षाऋतु बीजशक्तींना जसा परिस्फूट करितो तसा मनुष्यांच्या जीवनकलेंत ही मोठी क्रांति घडवून आणतो. पण अशा समयीं गांवोगांव उद्भवणाऱ्या कॉलऱ्यासारख्या रोगापुढें जोर मारण्याइतकी आपापली दिनचर्या शुद्ध, पवित्र व उत्तेजक ठेवण्याला प्रत्येकानें शिकलें पाहिजे.

रा. रा. आर. ए. उइलसन डिपटी कमिशनर बुलडाणा हे रजेवरून आज दाखल झाल्यानंतर रा. रा. रौटन हे पूर्ववत खामगांव सब डिव्हीजनवर येतील

**स्तुत्य औदार्य**— आलिशान नामदार चीफकमिशनर यांनीं येथील लेडी हार्डिंज दवाखान्याला

| | वर्गणीची रकम |
|---|---|
| रा. रा. भिवराज रामसुख रा. आकोट | १००० |
| कै. हारकचंद गुलाबचंद ( प्रस्तुतचे वारस रा. मणिलाल ) तेल्हारा | ५००० |
| रा. रा. देवीदास गंगासा चवरे कारंजा | २००० |
| मेसर्स रामजी कान्नव पेढी कारंजा वहिवाटदार रा. रा. लक्ष्मण रामचंद्र दहिहांडेकर | १००० |

दिल्याबद्दल या चार गृहस्थांचा प्रशंसापर नामनिर्देश सरकारी गॅझेटाच्या रकान्यांत मुद्दाम केलेला आहे, त्याची पुनरावृत्ती आम्ही इतर धनीक लोकांच्या अनुकरणबुद्धीला जागृती आणण्यासाठीं मुद्दाम करीत आहों.

आमचे मित्र रा. रा. गोपाळ हरि सावरकर पेन्शनर लोकलफंड ओव्हरसिअर यांनीं गेल्या शनिवारीं रात्रीं ईहलोकचा मुक्काम खतम केला, आणि ते स्वर्गाच्या यात्रेला लागले आहेत. वयाच्या ६९ व्या सुमारापर्यंत आपले घराणें उर्जीत दशेला आणून सार्वजनीक कार्यांत यथाशक्ती पुढाकार घेण्याचा क्रम अखेरपर्यंत चालू ठेविला, ही त्यांच्या स्मरण वहींतली आनंदाची गोष्ट होय. गृहस्थ मन मिळाऊ, सरळ मार्गी असत, तेव्हां त्यांच्या आप्तमित्रांनीं त्यांच्या सद्गुणाच्या प्रकाशांत आपल्या दुनियेच्या रहाटाला हात लाऊन तो फिरता ठेवलाच पाहिजे. राजश्री गोपाळराव हे प्रकृतीनें सदृढ व निरोगी असून एका पक्षमाताच्या कफक्षयानें त्यांचे शरीर अग्निसात् करण्याची पाळी आणली.

---

## नोटीस

बेशमी बनाई मर्द चिनाजी जात धनगर राहणार कजबे बडनेरगंगाई तालुके दर्यापूर जिल्हा उमरावती

इजलाः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी साक्षात चुलती आहेस, तुझा नवरा म्हणजे माझा चुलता नामें चिनाजी यजला मरण्यास सरासरी एक वर्ष दहा महिने झाले. त्याचे मरणानंतर त्याची स्थावर इस्टेट कसबे मजकूर येथील शेत सर्वे नंबर एकर गुंठे आकार रुपये ५७४ १३-३६ ३२ चे व वर कवेलुचे आडे ४ चे व शिवाय जंगम इस्टेटीची वारस तूं असून तुझेच ताब्यांत आहे. तुजला पुत्र संतती वगैरे कांहीं एक नहीं. तूं जिवंत आहेस तोंपर्यंत सदर्हू इस्टेटीचा उपभोग घ्यावा. परंतु तूं आमचे सल्याखेरीज कोणाचें कर्ज अगर कोठें गहाण, खरेदी वगैरे देऊं नयेस. तसेच कोणाचा दत्तकही घेऊं नयेस. कारण कीं, तुझे मरणानंतर सदर्हू इस्टेटीचे वारस मी, व माझे चुलते नामे २ सखाराम व ३ सिताराम वा अनाजी असें आहो. सदर्हू इस्टेट आमचे वडिलोपार्जीतची आहे करितां या नोटिशीद्वारे कळविण्यांत येते कीं, तूं कोणी दत्तक अगर कोणाचे कर्ज वगैरे आमचे सल्याखेरीज करूं नयेस. तसें तुजकडून झाल्यास आम्ही तुझे कोणत्याच प्रकारचे जबाबदार राहणार नाहीं. करितां ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत नोटीशीचा जबाब द्यावा. ता. ४।७।१६ इ.

सही

१ बळीराम धनाजी धनगर रा. वडनेर गंगाई द. खुद

१ सखाराम वा। अनजी धनगर नी. अंगठा असे

नो. नं २९४

---

## नोटीस

नोटिस बेशमी शेवंती मर्द नेमाजी माळी सांगोकार राहणार शेगांव जिल्हा बुल्ढाणा

इजलाः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी सावत्र आई आहेस, माझा बाप तुकताच वारल्यामुळें तुझा मुलगा व माझा सावत्र भाऊ अज्ञान मोतीराम याचे व माझे हिश्यासंबंधीं पंचांनीं घरांत सांपडलेला पैसा, दस्तैवज, व तुझे अंगावरील व माझी मोठी सावत्रआई मुलाबाई इचे अंगावरील दागिन्यांचा निकाल केला तो येणें प्रमाणें:—

मोतीरामला व मला प्रत्येकी २७९ रु० रोख मिळाले, व तुझे अंगावरील व मुलाबाईचे अंगावरील दागिने पंचानीं टिपून घेतले, व तुम्ही दोघी तरुण असल्यामुळें दुसरा घरठाव करणारच करितां तुमचे अंगावरील डागीने दुसरा घरठाव करी पर्यंत अंगावर ठेवण्याचे ठरवून दुसरा घरठाव केला, म्हणजे दोघींचे अंगावरील डागीने आम्ही दोघा भावानी वाटून घ्यावे असें ठरविले, तुमचे अंगावरील डागीने खालील प्रमाणें:—

तुझे अंगावरील डागीने

| डागीन्याचें नांव | (वजन) तोळे मासे |
|---|---|
| सोनें | |
| पुतळ्या ८ पदक व जवमणी | ४—० |
| वज्रटीक | |
| बाळ्या ४ व मुडक्या ४ | २—० |
| चांदी | |
| गुंडवाळ्याचा जोड १ | ८०—० |
| हतांतील कडी ४ भरीव | ८०—० |
| निवळ चांदीची कंठी | ४०—० |
| पोवळ्याची कंठी | ३०—० |
| गोफ | २५—० |

मुलाबाईचे अंगावरील.

| डागीन्याचें नांव | (वजन) तोळे. मासे |
|---|---|
| सोनें | |
| बाळ्या २ | ०—६ |
| नथ १ | ०—९ |
| चांदी | |
| गुंडवाळ्यांचा जोड १ | ५०—० |
| हसई १ | २५—० |
| कोपरवाळ्यांचा जोड | ४०—० |
| साखळी १ | २०—० |
| हातांतील कडी | २०—० |

या शिवाय तूं छपवून ठेवलेली दागिने पुढील प्रमाणे

| सोनें | वजन तोळे. मासे |
|---|---|
| माझे बापाचे हातांतील कडे एक | १२—० |
| ,, ,, मुदी १ | २—० |
| तुझी नथ १ | ०—९ |
| अर्जुन काठोळे यांच्या गहाण नथा २ | १—६ |
| तुझे पायांतील चांदीची जोडवी | १७—० |

तूं छपवून ठेवलेले डागीने ही नोटीस पावतांच पंचा समक्ष मला दाखवावे व त्याचा वाटा द्यावा. तुला वाईट लोकांची सल्ला असल्या वरून तुझे ताब्यांतील डागीन्यांची तूं अफरातफर करशील असा संशय आल्यावरून तुला या नोटीशीनें कळवितो कीं तूं तसे केल्यास कायद्याप्रमाणें तूं गुन्हगार होऊन, त्याबद्दल योग्य कोर्टांत दाद मागीतल्या वांचून मी राहणार नाहीं. सबब तूं आपले नांवाची व उभय कुलांची खामी करून घेऊं नये अशी तुला माझी नम्र विनंति आहे.

सही

गणपत नेमाजी माळी सांगोकार राहणार शेगांव जि० बुलडाणा

नो नं २९९

---

हें पत्र आकोला ये [illegible] खंडेराव बाळाजी फडके य [illegible] माचार छापखान्यांत न [illegible] फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छ [illegible]

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख २४ माहे जुलै सन १९१६ इ० [ अंक २९

# हिंदुस्थान सरकार.

—:※:-:※:-:※:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वी दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिका-ऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्जा ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

मी ———————————— अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

————

एकूण रुपये.......

[ रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास तो किती त्या रकमा त्यांकरितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा. ]

(अ) माझी विंनती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधींचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

[ (अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा. ]

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ————————

पत्ता ————————

तारीख ————

पोस्ट आफिसांत दाखल ‍ ‍ ‍ ‍ रजिस्टर नंबर ————

केल्याची तारीख ————

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची ) ‍ ‍ ( हा नंबर हेड पोस्ट मास्टरानें घालावयाचा )

नो. नं. २४१ ‍ ‍ ‍ ‍ हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### नोटीस

रा. रा. बळीराम पांडोबा नाईक जोध व नारायण देविदास खापर्डे मुक्काम कारंजा-बीबी तालुके मुर्तिजापूर जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुह्मास मुखत्यार नेमिले होते. व मुखत्यारपत्र मे. सबरजिष्ट्रर साहेब कोर्ट कारंजा तालुके मुर्तिजापूर जिल्हा आकोला यांचे कचेरींत ता. ३०-१११ रोजीं नोंदले. त्याचा बुक नं. ४ अ. नं २ इ. सन १९११ पान ३२ भाग १२ इसवीस नोंदले. हल्लीं माझीं सर्व कामें आटोपलीं आतां मला मुखत्याराची जरूरी नाहीं. करितां तुह्मी माझीं कोणतींही कामें करूं नये. तुह्मास या नोटिशीनें कळवितो कीं, आज तारखेपासून तुमचे वरील मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. याबद्दल पूर्वींच तुह्मास समक्ष सांगितले, व हल्लीं नोटिशीनें कळविलें आतां या पुढें माझे नांवाचा खाजगी अगर सरकारी व्यवहार मुळींच करूं नये. केल्यास रद्द समजला जाईल. ता. १३-७-१६ दस्तुर अजाबराव गणपतराव पावडे रा. बाहादरपूर

सही

महादेव धोंडबा किडे द. खुद

नो० नं० २९६

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं एसूबाई मर्द यादव लगदिवे रंगारी रा. दिग्रस ता. दारव्हा जि. एवतमाळ ही माझी साक्षांत चुलती आहे. इनें कांहीं इष्टेट भाचाचे घरीं नेली, व कांहीं इष्टेट चिमाबाई लगदिन इचे घरीं ठेविली आहे. व तेथेंच राहत असतें, व तिचेजवळ दागिनें व पैसे असून ही कर्ज काढणें इच्छित आहे. त्याकरितां इचेजवळून कोणी गहाण, खरेदी, व बक्षीस, घेऊं नये. घेतल्यास रद्द होईल, व कोणते ही प्रकारें कर्ज किंवा देव घेव करूं नये. केल्यास कोण्याच इस्टेटींतून मिळूं शकणार नाहीं. तिचे अंगावर देणे व या पूर्वीं कोणी जवळ गहाण असल्यास पंधरा दिवसाचे आंत नोटिशीनें कळविणें ता. ८-७-१६ इ० द० खुद

सही

दिगांबर वा॥ माधव लगादिवे राहणार दिग्रस द. खुद

नो० नं० २९७

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ नं १ } S. Clements, एजंट

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखळ्या व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचें जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६

### खात्रीचा तयार केलेला.

ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुट्टन अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता

रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

### Wanted.

Representatives in every locality in India, Burma and Ceylon for the sale of our world-renowned "Hairtone" unique toilet preparation) under the system of cash prizes worth Rs. 50,000 among the purchasers of Hairtone. Pay Rs. 50, 40, 30, 25 and 20, besides iberal commission. Cash security required Rs 1000, 700, 500, 400 & 300 respectively. Service at present secured for 6 months. No risk, no trouble. Every honest, energetic man (or woman) may well undertake the work and secure a decent income in leisure hours, without interfering with service or profession if any. Apply for Rules and Regulations to the Hairtone Manufacturing Co, 155, Bowbazar Street Calcutta.

## सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

नामांकित लेखकांचे विचार परिप्लुत निबंध, बोधपर गोष्टी, अनुकरणीय चरित्रें, हृदयंगम कविता, चालू कादंबरी वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६. वार्षिक वर्गणी बाहेरगांवीं ट. ख सह १॥≈ उमरावतीस रु. १॥ उमरावतीचे एजंट रा. सदाशिवराव देशमुख. जानेवारी १९१६ पासून सुरूं झालें आहे. एजंट पाहिजेत

**संपादक**— काशीराव बापुजी देशमुख.
अंबागेट उमरावती.

नो. नं. २२३

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने,

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥.

कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः– **मगनलाल के. आणि कंपनी,**
गिरगांव मुंबई.

नो. नं. २२४

### इंग्रजी शिकण्याची उत्तम सोय.

मौजे शिरसगांवबंड ता. एलिचपूर जि उमरावती येथें इंग्रजी पहिल्या ४ चार इयत्तांचे वर्ग २५ वर्षांपासून चालू आहेत. गांवाबाहेर खुल्या हवेंत सरकारी पद्धतीची टोलेजंग दोन मजली इमारत बांधली असून बाहेरगांवचे विद्यार्थ्यांकरितां बोर्डिंग ही केलें आहे. बोर्डिंगांत स्वयंपाकी वगैरेची सर्व सोय केली आहे यंदाचे वर्षीं इंग्रजी चवथ्या इयत्तेतून हायस्कूलच्या टेस्ट परिक्षेंत १२ पैकीं ९ विद्यार्थी पास झाले. हल्लीं प्रत्येक यत्तेंत ३-४ जागा रिकाम्या आहेत. गरजूं विद्यार्थ्यांनीं ता. २०-७-१६ पर्यंत खालील पत्त्यावर सर्टिफिकिटासह अर्ज करावे किंवा समक्ष भेटावें जागा भरल्यानंतर आलेले विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्यांत येतील. कळावें. ता. ३-७-१६

गो. ना दीक्षित.
हेड मास्तर– ए. व्ही. स्कूल.
शिरसगांवबंड

नो. नं. २२५

## नोटीस

नोटिस बेशमी महादु सोनाजी माळी रा. कान्हेरी ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचा दस्तैवज रक्कम रुपये १०० चा धनको नामा वा॥ जयवंता मयत असून याचा वारस गोविंदा वा रावजी असुन त्यानें ता. २० माहे सप्टेंबर सन १९१४ रोजीं नोटिस दिली होती. त्यांत तुह्मी तो दस्तैवज तुकाराम उदेभान यांस बेचीनखत करून दिले. व तुकाराम उदेभान यानें मजवर स्मा. मु. नं. २९८० सन १९१५ चा दावा करून त्याची चौ. ता. २४-१०-१६ नेमली. मी ज्या दिवशीं आपल्याला दस्तैवज परत मागण्यास रुपये घेऊन आलो असतां तुह्मी तुकारामचे सहीची पावती दिली नाहीं व रुपये घेतले नाहींत. त्या दिवसापासून व्याजाची रक्कम व कोर्टाचा खर्च वगैरे सर्व रकम तुह्मी कोर्टांत भरून टाकून दोन्ही नोटिशीच्या खर्चासमेत पावती घ्यावी. त्याप्रमाणें तुह्मी न केल्यास तुमचेवर दावा करून नुकसानी भरून घेतली जाईल मग या पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. ही नोटिस दिली. ता. १९-७-१६ इ. द० देविदास जैराम पी० रा० आकोला

सही

विठोबा वा॥ देवाजी द० खु० रा० कान्हेरी

नो० नं० २९८

## नोटीस

नोटिस बेशमी उम्या वा॥ गण्या महार राहणार मोरगांव ता. खामगांव

यांसः—

खालीं सही करणारीणकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे मोहतराचे नवरे असून मोहतूर झाल्यापासून २-३ वर्षेपर्यंत चांगल्या रितीनें वागविले. आतां सरासरी ५ वर्षांपासून तुह्मी मला मारहाण करून घराचे बाहेर हाकून दिले. वरून माझे बापानें पंच बरोबर घेऊन तुमचे येथें पुनः आणून घातले असतां तुह्मी साफ जबाब दिला कीं, मी वागवीत नाहीं. तेव्हां पासून मी माझे बापाचे घरीं राहत असून माझे खाण्यापिण्याचा खर्च दरसाल ५० रुपये प्रमाणें पांचवर्षांचे रुपये २५० झाले आहेत. तरी तुह्माला ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझा पांच वर्षांचा खाण्याचा खर्च रुपये २५० देऊन मला घेऊन जावे. अगर फारकत देऊन मला दुसरा घरठाव करण्यास मोकळे करावे. ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत दोहोंपैकीं कोणती ही गोष्ट कबूल न केल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा नवरेपणाचा मुळींच हक्क राहणार नाहीं. व खाण्यापिण्याचे खर्चाबद्दल मला योग्य वाटेल ती तजवीज करीन. व या नोटिशीचे खर्चासहित खर्च भरून घेण्यांत येऊ. ही नोटिस दिली असे. सही तारीख १६-७-१६ दस्तुर संभु अनसू खंडारे पी. रा. आकोला

सही

सहीची नि॥ सजी मर्द उम्या महार नि॥ आंगठा रा. मडाखेडबु॥

नो० नं० २९९

## नोटीस

रा. रा. मल्हारी वा सखाराम राऊत मु. कारखेड ता. चिखली

यांसः—

खालीं सही करणार आपरू मर्द मल्हारी मु॥ मंगरूळ पोष्ट शेलगांव इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुह्मास पोष्टानें र. नं. ९६१ ता. २६-४-१६ व ९२ ता. १४-५-१६ अशा दोन नोटीसा दिल्या. त्या तुह्मी न घेतां वापस केल्या, ह्मणून आतां वर्तमानपत्रांतून जाहीर नोटिस देते कीं, मी तुमचे नांवावर आजपर्यंत राहिले. मला संसारसुख तुमचेकडून मुळींच मिळत नाहीं. शिवाय माझा बाप आजपर्यंत मला खाऊ घालीत होता. तो आतां माझा सांभाळ करीत नाहीं. तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत येऊन मला रितीप्रमाणें फारकत देऊन संसारास लावावें. जर आठ दिवसाचे आंत येऊन मला फारकत न दिल्यास मी दुसरा घरठाव करीन. मग तुमची कांहीं एक तक्रार चालणार नाहीं. ही नोटिस पावल्यावर रितीप्रमाणें व्यवस्था न केल्यास मी हीच फारकती समजेन. आणि घरठाव करीन, करितां मला उत्तरानें कळवावें कळावें.

सही

आपरू मर्द मल्हारी नि॥ हातचा आंगठा व बांगडी

नो० नं० २९०

वऱ्हाडसमाचार

मित्ति आषाढ वद्य १० शके १८३८

## मिसेस बिझांट बाईस अटक.

मुंबई सरकारानें हिंदुस्थानच्या संरक्षणासाठीं १९१५ सालीं केलेल्या कायद्याच्या दुसऱ्या कलमाअन्वयें मुंबई इलाख्याच्या हद्दींत येण्याची व राहण्याची अटक केली आहे हें आतां सर्वांना विदितच आहे. मिसेस बिझांटबाईनें लोकांच्या सुरक्षितपणाला बाध येईल असें वर्तन केलें आहे व करण्याच्या बेतांत आहेत ह्मणून ही अटक आहे असे शब्द त्यांच्यावर बजावलेल्या सरकारच्या नोटिशींत आहेत. नोटिशीवर तारिख २९ जून ही आहे; पण ती ता० १० जुलै रोजीं त्यांच्यावर बजाविली गेली. मध्यंतरीं ११ दिवस कां गेले तें कळत नाहीं. पण त्याच्याशीं आपणाला कर्तव्य नाहीं. सरकारच्या नोटिशींत मिसेस बिझांटबाईच्या वर्तनावर जो संदिग्ध आरोप आहे तो त्यांच्या स्वराज्यविषयक चळवळीबद्दल असला पाहिजे असा लोकांचा तर्क आहे. पण हा तर्क जर खरा असेल तर गतवर्षी मुंबईस स्वराज्य विषयावर त्यांनीं प्रथम व्याख्यान देऊन गडबड उडवून दिली, तेव्हांच मुंबई सरकारनें सावध व्हावयास पाहिजे होते. या संबंधांत मुंबईच्या 'गुजराथी' पत्रानें एक गप्प प्रसिद्ध केली आहे ती गमतीची आहे. तें पत्र ह्मणतें कीं बाईच्या संबंधांत मुंबई सरकार असा कांहीं तरी प्रकार गतवर्षींच करणार होतें. त्यावेळीं बाईला मुंबईहून संयुक्त प्रांतांत जाऊं देऊ नये असा विचार सरकारी अधिकाऱ्यांमध्यें चालला आहे अशा बातम्या ही त्या वेळीं उठल्या होत्या. पण लॉर्ड हार्डिंज साहेब त्या वेळीं व्हाइसराय होते व त्यांना ही गोष्ट पसंत न पडल्यामुळ तो विचार जागच्या जागीं राहिला. या गप्पेंत किती तथ्य आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं. मुंबई सरकारच्या नोटिशींत एक गोष्ट मात्र फार बारकाईनें विचार करण्यासारखी आहे. डिफेन्स ऑफ इंडिया आक्टांत या कलमाखालीं येणाऱ्या माणसाच्या भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही काळांतल्या वर्तनाचा उल्लेख स्पष्ट आहे. पण मुंबई सरकारच्या नोटिशींत भूत व भविष्य या दोन काळांचाच उल्लेख आहे. मिसेस बिझांट बाईचें वर्तन लोकांच्या संरक्षणास बाध करण्यासारखें घडलें व पुढें घडण्याचा संभव आहे असें नोटिशींत आहे, पण हल्लीं तसें तें घडत आहे कीं काय याविषयीं अवाक्षर नाहीं. यावरून हल्लींची नोटीस त्यांच्या सध्याच्या चळवळीवरून नाहीं, तर गतवर्षींच्या खटपटीची वरून पण उशीरा निघाली असेल असा लोक तर्क करीत आहेत, व या तर्काला वर दिलेल्या गप्पेनें पुष्टीकरण मिळतें.

मिसेस बिझांट बाईच्या थिओसफी शिक्षण प्रसार व समाजसुधारणा, वगैरे कित्येक उद्योगांच्या संबंधांत त्यांच्या विषयीं आह्मांला अत्यंत पूज्यबुद्धि आहे. पण राजकीय बाबतींत त्यांच्यांत आमच्यांत पुष्कळच मतभेद आहे व तो आह्मीं अनेकवेळां स्पष्टपणें प्रकट केला ही आहे. तथापि लोकांच्या संरक्षणाला बाध आणण्यासारखें वर्तन त्यांच्या हातून घडलेलें आह्मांस ठाऊक नाहीं- व बाईच्या विरुद्ध गिल्ला करणाऱ्या आंग्लोइंडियन पत्रांतल्या लेखकांपैकीं ही कोणीं दाखविलेलें नाहीं. बाईच्या एका पुस्तकांतलीं कांहीं वाक्यें आक्षेपार्ह आहेत असें एकानें टाइम्स ऑफ इंडिया पत्रांत ह्मटलें आहे. पण हें पुस्तक खुद्द मुंबई सरकारनें अद्याप जप्त केलेलें नाहीं यावरून सरकारला त्यांत आक्षेपार्ह कांहीं दिसत नाहीं हें उघड आहे. मग बाईच्या गृहकृत्यांतलें कोणतें कृत्य मुंबई सरकारास भयंकर वाटलें तें त्यांचें त्यांनाच ठाऊक!

गतकृत्यांबद्दल हें झालें. आतां भावी कृत्यांबद्दचा विचार पाहूं. मी अमुक करीन, तमुक करीन अशी आगाऊ सूचना देण्याची दुष्ट खोड बाईंना आहे हें आह्मांस ठाऊक आहे, आणि त्याप्रमाणें या स्वराज्यविषयक चळवळी संबंधानें विलायतेंत एकमध्यवर्ती आफिस उघडून तिकडे चळवळ करण्याविषयींचा आपला उद्देश ही त्यांनीं बोलून दाखविला होता. मुंबई सरकारचा कटाक्ष या भावी कृत्यावर असेल तर तें कृत्य मुंबई इलाख्याच्या संरक्षणाला बाधक कसें समजण्यांत आलें तें कळणें कठीण आहे. विलायतेहून इकडे स्वराज्यविषयक वाङ्मय येण्याची भीति सरकारला वाटत असली तर प्रेस आक्टाखालीं असें वाङमय मुंबई बंदरांत येतांच तें त्यांना जप्त करतां आलें असतें त्यासाठीं बाईंना अटक करण्याचें कारण नव्हतें. सारांश, मुंबई सरकारच्या या नोटिशींत सगळेंच कांहीं गूढ आहे; आणि हें गूढ खुद्द सरकार उकलून दाखवीत नाहीं तोंपर्यंत लोक निष्कारण त्याविषयीं टीका व कुतर्क करीत राहतील. याच्या योगानें लोकांच्या मनावर जो वाईट परिणाम होईल त्याच्या चतुर्थांश ही बाईच्या कोणत्याही कृत्यानें झाला नसता असें आह्मांस वाटतें. लोकांच्या संरक्षणासाठीं सद्धेतुपूर्वक मुंबई सरकारानें केलेलें हें कृत्य घराला लागलेली आग विझविण्यासाठीं आगीवर राकेल तेलाचा डबा ओतण्यासारखें सद्धेतुपूर्वक पण अविचाराचें व घाबरेपणाचें झालेलें आहे हें लोकांचें झालेलें मत दूर करण्याची व त्यांच्यापुढें सरळ बाजू शांतपणानें मांडून लोकांची सहानुभूति आपल्याकडे आकर्षून घेण्याची खटपट मुंबई सरकार करीत नाहीं, तोंपर्यंत लोक बिझांट बाई खऱ्या गुन्हेगार असोत कीं नसोत त्यांच्याच विषयीं सहानुभूतीनें प्रेरित झाले, तर त्यांत लोकांकडे तरी काय दोष आहे?

## मराठ्यांच्या इतिहासावर नवा प्रकाश.

मराठ्यांचा संबंध मुसलमानांचीं--विशेषतः दिल्लीचे व विजापूर, गोंवळकोंडा आणि हैदराबाद येथील बादशहांशीं—आल्यानें मुसलमान इतिहासकारांनीं त्या काळच्या गोष्टींविषयीं लिहून ठेवलेल्या इतिहासाचा शोध लावून त्या इतिहासाचा मराठी बखरीशीं कितीसा मेळ बसतो तें शोधकांनीं पहावयास पाहिजे. पण दुर्दैवाची गोष्ट आहे कीं पुण्याच्या इतिहास संशोधक मंडळांत फारशी भाषा येत असेलला व या दिशेनें ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध करणारा एक ही इसम नाहीं; इतकेंच नाहीं, तर मराठ्यांच्या दृष्टीखेरीज अन्य दृष्टीनें किंवा मराठी भाषेशिवाय अन्य भाषेंत लिहिलेल्या कागदपत्राची पर्वा ही सदर मंडळ करीत नाहीं. सदर मंडळावर हा जो आक्षेप आह्मी करीत आहों तो निराधार नाहीं. दोन वर्षांपूर्वी 'आनंद' संपादक रा. आपटे हे बंगाली भाषेंतल्या 'महाराष्ट्रपुराणा'वरून मिळविलेली रघोजी भोसल्याच्या स्वाऱ्यांसंबंधाची हकीकत सदर मंडळापुढें सांगण्यासाठीं पुढें आले असतां सदर मंडळाचे अग्रणी रा. राजवाडे यांनीं त्यांना ती सांगूं दिली नाहीं. तीच हकीकत रा. आपटे यांनीं 'मराठ्यांचा दरारा' या पुस्तकांत ग्रथित करून मराठी वाचकांपुढें मांडली, तेव्हां प्रत्येकजण सदर

अज्ञात इतिहासावर प्रकाश पाडल्याबद्दल रा. आपटे यांची तारीफ करीत आहे. इतिहास-संशोधन मंडळाचें हें एक कल्पीपणाचें वर्तन इतिहास संशोधनाला संवर्धक आहे असें खास कोणी ह्मणणार नाहीं. आमच्या इतिहासावर सर्व बाजूंनीं प्रकाश पडणें अवश्य आहे. आह्मी करूं ती पूर्व दिशा आणि सांगूं तें सत्य असें तत्त्व जिज्ञासूपणाच्या गप्पा ठोकणाऱ्या इतिहास मंडळानें लवकर सोडून देण्यांतच शहाणपणा आहे.

असो, मॉडर्नरिव्ह्यूच्या जूनच्या अंकांत पाटणा कॉलेजचे इतिहासाध्यापक व औरंगजेब बादशहाचें चरित्र फारशी ग्रंथांच्या आधारानें लिहिणारे प्रो. जदुनाथ सरकार यांचा मराठ्यांच्या इतिहासावर एक लेख आला आहे. त्यांत त्या इतिहासावर नवा प्रकाश पाडण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत त्या जिज्ञासूंनीं अवश्य वाचाव्या. त्यांत पुढील गोष्टी सिद्ध केल्या आहेत.

१ शहाजीला विजापूरच्या बादशहाच्या हुकुमावरून बाजी घोरपड्यानें दगलबाजीनें कैद केलें ही गोष्ट खोटी आहे. त्याला मुस्तफाखान नांवाच्या मुसलमान सरदारानें खाजगी द्वेषामुळें कैद केलें होतें. २ सन १६६५ मध्यें पुरंदर येथें मुसलमानांशीं जो तह झाला त्या संबंधाची मराठी बखरींतली माहिती चुकीची आहे. शिवाजीला विजापूरच्या राज्यांत चौथाई वसूल करण्याचा हक्क या तहानें मुळींच दिला नव्हता. ३ संभाजीच्या वधानंतर त्याचा मुलगा शिवाजी यावर जेबउन्नीसा हिनें पुत्रवत् प्रेम केलें वगैरे गोष्ट खोटी आहे. जेबउन्नीसा त्यावेळीं मुळीं दिल्लीस कैदेंत होती व ती आपल्या बापाबरोबर दक्षिणेंत कधींच गेली नव्हती. ४ संभाजीची बायको येसूबाई हिची लज्जा हरण करणाऱ्या दुष्ट मुसलमान किल्लेदाराला दिल्लीच्या बादशहानें योग्य शिक्षा केली. ही शेवटची गोष्ट तर अगदीं अश्रुतपूर्व आहे.

## क्षयरोगावर उपाय.

मुंबईचे डा. सोपारकर यांनीं क्षयरोगाचे संबंधांत कांहीं प्रयोग करून पाहिले आहेत ते विचार करण्यासारखे आहेत. त्यांनीं क्षयरोग्याची थुंकी उन्हांत ठेवून पाहिली. तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं त्या थुंकींतले जंतु सहा तास पर्यंत उन्हांत जिवंत राहूं शकतात, पण आठ तासांनीं मरतात. प्रत्यक्ष उन्हांत न ठेवतां चांगल्या उजेडाच्या खोलींत थुंकी ठेविली तर जंतु सहा दिवस जगतात; पण आठ दिवसांनीं मरतात; आणि अंधाराच्या कपाटांत तीच थुंकी घालून ठेविली तर सहा महिन्यांत सुद्धां ते जतु मरत नाहींत. यावरून क्षयरोगाच्या आजारी माणसाला रोज नेमानें कांहीं तास उन्हांत बसविलें तर सूर्यप्रकाशामुळें त्याचा तो रोग हटण्याचा फार संभव दिसतो.

## रेलवेचा प्रश्न.

रेलवेवर सरकारचा अधिकार असावा अशा अर्थाचा एक ठराव मद्रासचे ना. मि. विजयराघवाचार्य यांनीं वरिष्ठ कायदेकौंसिलांत आणिल्यावरून हिंदुस्थान सरकारनें या प्रश्नासंबंधानें निरनिराळ्या व्यापारी मंडळ्यांचीं मतें मागविलीं आहेत. जणूं काय रेलवेशीं ज्यांचा संबंध येतो अशीं हिंदुस्थानांत येवढींच काय तीं माणसें आहेत! सध्या हिंदुस्थानांत कांहीं रेल्वे सरकारच्या, कांहीं ग्यारंटीड कंपन्यांच्या आणि कांहीं खाजगी कंपन्यांच्या आहेत. या तिन्ही प्रकारच्या रेल्वेच्या व्यवस्थेंतल्या गुणदोषाची चर्चा करून उत्तम पद्धति कोणती हें ठरविण्याचें काम निःसंशय मोठें विचाराचें आहे. कंपन्यांच्या रेल्वेवर एक असा मोठा आक्षेप आहे कीं त्यांची दृष्टी प्रथम स्वार्थाकडे आणि नंतर युरोपियन व्यापारी व युरोपियन उतारू यांच्या सोयीकडे असते. देशी व्यापार किंवा देशी लोकांच्या सोयी यांच्याकडे लक्ष देण्यास त्यांना फुरसतच नसते जपानच्या रेल्वे जशा जपानासाठीं व जपानी लोकांचेंच हित पाहणाऱ्या आहेत तशे हिंदुस्थानच्या रेल्वेचें नाहीं. इकडील रेलवेवरचे इंजिनियर व दुसरे मोठाले अधिकारी सगळे युरोपियन असतात. त्यांच्या व्यवस्थेच्या बाबतींत हिंदुस्थानच्या लोकांचें मत कोणी विचारीत नाहींत व वर्तमानपत्र द्वारां तें प्रकट झालें तरी ऐकत नाहींत. अशी स्थिति जेथें नाहीं, आणि लोकमताचा प्रभाव राज्यकर्त्यांवर सुद्धां पडतो तेथें सुद्धां रेल्वे सरकारी असल्या पाहिजेत असें लोकमत होऊं लागलें आहे. मग हिंदुस्थानांत तसें होण्याची किती अवश्यकता आहे तें सांगावयास नकोच. सरकारनें हिंदुस्थानच्या रेल्वे हातीं घेतल्या शिवाय हिंदुस्थानचा व्यापार कधीं वाढावयाचा नाहीं. व सवतीच्या मुलांप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांना वागविण्याची कंपन्यांची खोड कधीं जावयाची नाहीं. रेल्वे कंपन्यांची मालकी हिंदुस्थान सरकारच्या हातीं आल्यावर सुद्धां तिच्या व्यवस्थेचें काम त्यांनीं विलायतेंत जिचें हेड ऑफिस व डायरेक्टर आहेत अशा कंपन्यांच्या हातीं कां द्यावी तें कळत नाहीं. रेल्वे सरकारी झाल्यावर लोकांच्या गाऱ्हाण्यांची कांहीं तरी दाद सरकार लावील. पण या कंपन्या कांहीं एक न करतां दुःखावर डागण्या मात्र देतात.

## शांतता व न्याय.

एका खटल्यांत आरोपीला जामिनावर खुला करण्याविषयीं अर्ज करतांना पाटण्याचे ब्यारिस्टर मि. हसन इमाम हे ह्मणाले, 'या देशांत जी शांतता स्थापित झाली आहे ती इंग्रजांच्या न्यायी अमलाचा परिणाम आहे. पण सदर खटल्यांतल्या म्याजिस्ट्रेटासारखे म्याजिस्ट्रेट जर या देशाला मिळाले, तर लोकांना ब्रिटिश राज्य नकोसें होईल.' आरोपीला जामीनावर खुले करूं नये असें हायकोर्टाच्या चीफ जस्टिसला प्रथम वाटत होतें. पण मि. इमाम यांच्या या कळकळीच्या व जोरदार भाषणाचा परिणाम होऊन कोर्टानें कागद मागविले आणि मि. इमाम यांच्या ह्मणण्याप्रमाणें आरोपीला जामीनावर खुले करण्याचा हुकुम देतांना चीफ जस्टिस यांनीं मि. इमाम यांचे आभार मानले. मि. इमाम यांनीं न्याय व शांतता यांचा जो नित्य संबंध एका वाक्यांत दाखविला तो पुष्कळ शहाणे ह्मणविणाऱ्यांच्या लक्षांत सहसा येत नाहीं. देशांत शांतता स्थापित करण्याला शस्त्रास्त्रांपेक्षां न्यायाच्या वागवणुकीचेंच साह्य अधिक होतें याला हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश अमलाच्या स्थापनेचा इतिहास हीच मोठी साक्ष आहे. लोकांना विचार, उच्चार, व आचार यांची स्वतंत्रता योग्य मर्यादेंत देण्यानें, व त्या मर्यादेच्या आंत जोंपर्यंत आपण आहों तोंपर्यंत आपल्या केसास धक्का लावण्याचें सामर्थ्य कोणाला नाहीं असा सरकारच्या न्यायबुद्धीविषयीं दृढ विश्वास उत्पन्न करण्यानें लोकांच्या ठायीं जो एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होतो तो राजनिष्ठेला दृढ करून देशांत शांतता स्थापित करीत असतो. ह्मणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं हिंदुस्थानांत शांतता नांदत आहे येवढ्यांतच संतोष व समाधान न मानतां न्यायाचा झरा अबाधित वाहत राहील याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे.

## अन्नकष्ट.

दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांची ग्रहदशा अजून संपली नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांशीं झगडून त्यांना न्यायाचे हक्क मिळवितांना किती कष्ट पडत आहेत तें सर्वांस विदितच आहे. पण आतां त्या कष्टांत अन्नकष्टाची भर पडलेली आहे असें कळतें, दक्षिण आफ्रिकेला खाद्य द्रव्यांचा पुरवठा हिंदुस्थानाकडून होत असतो, पण अलीकडे युद्धामुळें मालाची ने आण करणाऱ्या जहाजवाल्या कंपन्यांनीं भाड्याचे दर इतके वाढविले आहेत कीं धान्याच्या महागाईमुळें तिकडे मजूरगरिबांना पोटभर अन्न मिळण्याची अडचण झाली आहे. तेथील हिंदी रहिवाश्यांनीं या संबंधांत एक जाहिरसभा भरवून सरकारला एक अर्ज ही केला आहे असें कळतें.

## लॉर्ड क्रू विषयींची गप्प.

मि. चेंबर्लेन हे हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी झाल्यापासून प्रत्येक बाबतींत हिंदुस्थानचें पाऊल कसें मागें पडत चाललें आहे तें स्त्री शिक्षणविषयक त्यांच्या उद्गारांवरून आणि इंडिया कॉन्सॉलिडेशन आक्ट सारख्या कायद्यावरून दिसतेंच आहे. मि. चेंबर्लेन यांनीं आपल्या पदाचा स्वीकार केल्यावेळीं त्यांच्या कारकीर्दीसंबंधानें जाणत्या लोकांनीं केलेलें भविष्य अक्षरशः खरें ठरलें आहे. पण हे लवकरच त्या पदाचा त्याग करतील व त्यांचे जागीं पूर्वीचे स्टेटसेक्रेटरी लॉर्ड क्रू यांची नेमणूक होईल अशी सुवार्ता लंडन टाइम्स मध्यें प्रसिद्ध झाली आहे. लॉर्ड क्रू हे उदारमतवादी पक्षाचे एक प्रमुख सभासद आहेत. श्रीमान जॉर्ज बादशहांच्या हिंदुस्थानांतल्या आगमनाचे प्रसंगीं ते बादशहांच्या बरोबर इकडे आले होते. हिंदुस्थानची अढळ राजनिष्ठा व त्याची स्थिति त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेली आहे. त्यांच्या परत स्टेटसेक्रेटरीच्या पदावर येण्यानें हिंदुस्थानचें पाऊल प्रगतीचे मार्गांत विशेष पुढें न पडलें तरी हल्लीं सारखी पीछेहाट तरी होणार नाहीं असा भरंवसा वाटत आहे. ही सुवार्ता कधीं खरी ठरते तें पहावें.

## जमीन महसुला संबंधाचें धोरण.

कान्सॉलिडेशन आक्ट संयुक्त प्रांतांतील जहांगिराबाद अमेंडमेंटांतलें तत्व, मिसेस आनी बिझांट बाईवर मुंबई सरकारनें घातलेला निर्बंध, प्रेस आक्टाचा जुलूम वगैरे प्रश्न लोकांच्या मनांत क्षुब्धता उत्पन्न करण्याला पुरेसे न वाटूनच कीं काय सरकारनें सध्याच्या सारख्या अशांततेच्या वेळीं आणखी एक वादग्रस्त प्रश्न लोकांच्या पुढें चर्चेसाठीं आणिला आहे! सहा वर्षांपूर्वीं रॉयल डीसेंट्रलायझेशन कमिशननें सरकारच्या जमीन महसुलाच्या धोरणांत दोन सुधारणा सुचविल्या होत्या. त्यांतली एक अशी होती कीं शेतकऱ्यांस होणाऱ्या जमिनीच्या निव्वळ नफ्याचा कितवा अंश सरकारानें साऱ्याचा रूपानें घ्यावा आणि जमिनीचा बंदोबस्त ( सेटलमेंट ) किती वर्षांनीं करावा या विषयींचा निर्बंध घालून देणारा कायदा सरकारनें एकदां करून टाकावा. कमिशनच्या या दोन्ही शिफारसी हिंदुस्थानसरकारला व स्टेटसेक्रेटरी लॉर्ड मॉर्ले यांना पसंत न पडल्यामुळें कमिशनच्या सूचना रिपोर्टांतल्या रिपोर्टांतच राहिल्या होत्या. वस्तुतः या दोन्ही सुधारणा अवश्य अमलांत यावयास पाहिजेत अशा आहेत. दोन्ही सूचनांनीं साऱ्याच्या मागणीला कांहीं तरी आळा पडला असता. कायद्यानें साऱ्याचें प्रमाण ठरवून टाकलें व एखाद्या ऑफिसरानें त्या प्रमाणाच्या बाहेर सारा वसूल करण्याचा यत्न केला तर रयतेला न्याय मागण्याला न्यायाचें कोर्ट हा एक जागा झाली असती. याचा नैतिक व व्यावहारिक परिणाम रेव्हेन्यु अधिकाऱ्यांवर उत्तम प्रकारचा होऊन रयतेला सुख लागलें असतें. आपण शेतांत खर्च व परिश्रम करून ज्यास्त पीक काढलें तर त्यावर रेव्हेन्यु अधिकारी घारी सारखी झडप घालून लोण्याचा गोळा उचलून न नेतां ज्यास्त उत्पन्नाच्या मानानें रास्त तेवढीच वाढ साऱ्यांत करील, असा विश्वास शेतकऱ्यांचे ठायीं उत्पन्न व्हावा हाच कमिशनचा हा हेतु वरील सूचना करण्यांत होता. पण सरकारला या सूचना आवडल्या नाहींत. कमिशनच्या शिफारसी प्रमाणें कायदा केला असतां रयतेला उलट त्रास होईल; कारण कीं रयतेची स्थिति कशी ही असो, कायद्यानें ठरविलेली साऱ्याची रकम रेव्हेन्यु अधिकाऱ्यांना वसूल करावीच लागेल, असें सरकारचें ह्मणणें आहे. कायदा असो अगर नसो, जमिनीचा वसूल जितका ज्यास्त होईल तितका करण्याविषयीं रेव्हेन्यु अधिकाऱ्यांची स्वभावतःच प्रवृत्ति असते. ही गोष्ट जर खरी आहे, तर कायद्यानें त्या प्रवृत्तीला थोडा बहुत तरी आळा बसला पाहिजे ही गोष्ट नाकबूल करून कसें चालेल? रयतेला न्यायाच्या कोर्टाकडे दाद मागण्याचा हक्क राहील या भीतीनें तरी रेव्हेन्यु ऑफिसरांना वचक बसेल. हल्लीं असा वचक बसण्यास काय साधन आहे ? पण

रेव्हेन्यु ऑफिसरांना आपले वर न्यायकोर्टाचा दाब नको आहे हें आंतलें मर्म आहे आणि ही गोष्ट सन १९०० सालींच सर आंटनी म्याकडोनेल सारख्या अधिकाऱ्यांनीं स्पष्टपणें लिहून ठेविली आहे. त्यावेळच्या अधिकाऱ्यांच्या मनो वृत्तींत गेल्या दहा पंधरा वर्षांच्या पोक्त अनुभवानें कांहीं फरक पडूं नये ही शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे. वरील सूचना करणारांत सर फ्रे. लेली व मि. रमेशचंद्र दत्त यांच्या सारखे रेव्हेन्यु खात्यांतले दर्दी व अनुभविक गृहस्थ होते ही गोष्ट लक्षांत घेतली असतां वरील खेद द्विगुणित होतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं शेतीच्या सुधारणेसाठीं जे खरोखर मनापासून प्रयत्न चालविलें आहेत व ज्यामुळें सरकारी अधिकारी रयतेला मायबापासारखे वाटूं लागले आहेत, त्या प्रयत्नांवर अशा प्रकारच्या हट्टवादानें पाणी फिरेल अशी आह्मांस भीती वाटते. वारंवार सरकारच्या मर्जीस वाटेल तेव्हां सेटलमेंट करण्याची हल्लींची वहिवाट चालू राहील तों पर्यंत आपल्या परिश्रमाचें फळ आपल्या पदरांत पडेलच असा भरंवसा रयतेस कसा वाटेल या गोष्टीचा विचार सरकारनें अवश्य करावयास पाहिजे होता. शेतकींत सुधारणा होऊन रयत कायमची सुखी व्हावी अशी सरकारची इच्छा असेल, व ती आहे या विषयीं आह्मांस बिलकुल शंका नाहीं, तर शेतकीच्या सुधारणेबरोबर रयतेच्या मनांत दृढ भरंवसा उत्पन्न होईल अशा तऱ्हेचे फेरफार जमीन महसुलाच्या धोरणांत सरकारनें करणें अवश्य आहे. सरकारचा महसूल प्रमाणाबाहेर वाढत गेला, आणि रयतेला दाद मागण्यास न्यायकोर्टासारखे कांहीं साधन ही ठेविलें नाहीं, तर शेतसुधारणेविषयीं रयतेला उत्साह कसा वाटेल ? आणि तो न वाटला तर सरकारच्या शेतकीखात्याप्रीत्यर्थ होणाऱ्या जंगी खर्चाचें तरी काय प्रयोजन आहे ? शेतकऱ्यांनीं आपल्या कपाळीं कायमचेंच दारिद्र्य आहे अशी समजूत करून घऊन दैववादी होऊन बसावें अशी सरकारची इच्छा खास नाहीं. रेव्हेन्यु अधिकाऱ्यांच्या सदयतेवर सरकारचा पूर्ण भरंवसा आहे व त्यांच्या हातून अन्यायाचें कृत्य होणार नाहीं व होत नाहीं अशी त्यांची पक्की खात्री आहे तर कायद्यानें त्यांच्या वर्तनाला निर्बंध घालण्याची भीति बाळगण्यास वस्तुतः कांहीं कारण दिसत नाहीं.

## महायुद्धाची प्रगती.

गेल्या आठवड्यांत ही मित्रराष्ट्रसंबंधानें सर्वत्र जयध्वानच ऐकूं येत होता. जर्मन शत्रूंची तिसरी फळी ही फोडण्यांत आली ओडे असें जनरल हेग यांच्या रिपोर्टावरून कळतें. शत्रूंचीं वर्तमानपत्रें लढाईंत जर्मनांचा पराभव झाल्याबद्दलच्या बातम्या हळूं हळूं प्रसिद्ध करूं लागलीं आहेत. फ्रांक फर्टर झीटंग हें जर्मन पत्र ह्मणतें कीं सॉमवर चढाई सुरूं होण्याचे आदले आठवड्यांत मित्रराष्ट्रांनीं तीस लक्ष कुलुपी गोळे खर्च केले. या वरून युद्धाची भीषणता व मित्रराष्ट्रांची जय्यत तयारी यांचा प्रत्यय येईल. व्हर्डुनपाशीं फ्रेंचांनीं दाखविलेलें शौर्य व या नव्या चढाईंत ब्रिटिश सैन्यानें दाखविलेला पराक्रम या दोहोंत कोणाची कमी किंवा कोणाची ज्यास्त प्रशंसा करावी तें सांगणें कठीण आहे. दोघे ही आपापल्या परीनें अप्रतिम आहेत. आणि वीरांची खरी परिक्षा वीरांनाच या ह्मणीची सत्यता ब्रिटिश व फ्रेंच नी परस्परांची खरी प्रशंसा करीत आहेत तींत चांगली दिसून येते. शत्रूचे कांहीं कागदपत्र हातीं लागले आहेत त्यावरून जर्मनीची प्राणहानि फार भयंकर झालेली दिसते. ता. १३ जुलै पर्यंत सॉमजवळ २३९ जर्मन ऑफिसर, सुमारें १२००० शिपाई, ८९ तोफा, ८९ यांत्रिक तोफा इ० सामान पकडण्यांत आलें. जर्मन केसर ही त्या बाजूला गेल्याची बातमी आहे.

## प्राच्य रणक्षेत्र.

इकडील बातमी अलीकडे पूर्वींच्या सारखी भरपूर येत नाहीं. तथापि जी येते ती रशियाच्या विजयाचीच असते. रशिया लेंबर्ग कडे शत्रूला रेटीत चालला आहे, ही गोष्ट जर्मन सरकारी पत्रकांत ही कबूल केली आहे. येथें ही ३१९ जर्मन ऑफिसर १२६३७ शिपाई व ३० तोफा शत्रूच्या हातून रशियानें छिनावून घेतल्या आहेत. रिगाच्या बाजूला गेलेले खंदक परत मिळविण्याचे प्रयत्न शत्रूंनीं पुष्कळ ठिकाणीं केले, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. लिपाचा उत्तर किनारा शत्रूला अजीबात सोडून द्यावा लागला आहे. लुझकच्या बाजूला रशियानें आस्ट्रियनांना जो चोप दिला तो त्यांच्या चांगल्या आठवणींत राहील. शत्रूनें येथें फार दिवस टुरटुर चालविली होती.

# चिरायु करो!

(र. जश्री टिळक यांच्या संबंधानें महाराष्ट्रीय अभिनंदन)

संवत्सरांच्या गणनेंत मुख्य जशी कपिला षष्ठी तद्वत् व्यक्तिमात्राच्या आयुष्यांत ६१ वा वाढदिवस हा सोन्या सारखा योग होय. ज्या मानानें आपलें कुटुम्ब, समाज किंवा राष्ट्र असा जगणारा मनुष्य आपल्या कर्तृत्वानें व आपल्या उत्कर्षशाली शीलानें उदयास आणितो व उत्तरोत्तर भरभराटीला पोचवितो त्या मानानें कुटुम्बांत, समाजांत किंवा राष्ट्रांत त्याचा अशा सुमुहूर्तावर स्वाभाविकपणेंच जयजयकार होत असतो. अशा दृष्टीनें पाहतां राजश्री बाळ गंगाधर टिळक हे राष्ट्रीय पुरुष आहेत, आणि ह्मणूनच त्यांच्या ६१ व्या वाढदिवसा निमित्त सर्व महाराष्ट्रानें अभिनंदन करण्याची एक नवी युक्ती काढली असून ती बहुतेकांस फार फार आवडली आहे. चांद्रमासाच्या रितीनें ही ६१ वी तिथी ह्मणजे आषाढ वद्य ६ गेल्या गुरुवारीं आली आणि सौरमासाच्या रितीनें ६१ वी जन्माची तारीख ह्मणजे २३ जुलै काल आदितवारीं होती. हे दोन्हीं दिवस महाराष्ट्राचे शुभ दिवस ह्मणून आनंदोत्सवानें पाळण्यांत आले.

## आनंदोत्सव

(श्री जार्जच्या सुवर्ण व[illegible] मुद्रिकांची लाखोली)

वरील अभिनंदनाचे आनंदोत्सव करण्याची नवी पद्धत फार सुंदर आहे. आपल्या इष्ट देवतेला जशी फल पुष्पांची लाखोली वाहतात त्या प्रमाणें अशा राष्ट्रीय भूदेवाला एक लक्ष रुपयांची थैली अर्पण करण्याचा संकल्प कालच्या तारखेस पुण्यास सिद्धीस जावयाचा तो तसा यशस्वी झाला असेल असें आमचे मनाचें तारायंत्र सांगतें. रा० टिळकांच्या चारित्र्याबद्दल किती ही पक्षभेद असो, पण सर्व महाराष्ट्र या प्रसंगाला, कांहीं आपल्या दिलानें कांहीं आपल्या द्रव्यानें, व कांहीं आपल्या थोर सहानुभूतीनें, हा मंगल दिन साजरा करीत आहे. जेथें तेथें माणसांतील दैवी गुणांची वाहवा होते तेथें तेथें जनसमूहांतला जनार्दनच नांदत असतो आणि असे महोत्सव जेव्हां राष्ट्रांतील थोर पुरुषासंबंधानें लोक करूं लागतात तेव्हां त्या राष्ट्राचा अभ्युदय व उत्कर्ष हृदयंगम होत जातो आणि हीच गोष्ट ब्रिटिश साम्राज्याखालीं इंडियाला लाभणाऱ्या 'स्वराजाची' पहिली मुहुर्त मेढच होय.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** शेतीच्या दौलतीनें रात्रंदिवस डोळ्याचा आनंद वाढविण्या इतका सुंदर पर्जन्य, खुली हवा व जीवनरस ओतणारा सूर्यप्रकाश हीं अगदीं मनमुराद आहेत. पटकीनें मात्र ठिकाठिकाणीं उपद्रव चालविला आहे. या व्यतिरिक्त सार्वजनिक आरोग्य सुखमय आहे

**सत्यनारायणः—** रा. टिळकांच्या एकसष्ठाव्या वाढदिवसा निमित्त गेल्या गुरुवारीं येथील श्री राजेश्वराच्या भव्य सभामंडपांत रा रा. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षते खालीं सार्वजनिक सत्य नारायण करण्यांत आला. आणि तीर्थ प्रसाद देण्यापूर्वी रा. चिपळूणकर, खापर्डे, व दाते, यांनीं श्रद्धांगुलीनें सद्गुणांचीं शिखरें श्रोतृवर्गास दाखविलीं. समाज फारच मोठा होता, पण सरकारी पदवीवाले शिष्ट व छात्रसमूह मनोदेहानेंच हजर होते.

**प्रेमाची लीलाः—** पतिपत्नींची घरांतल्या कुजबुजीमुळें कशी दैना होते हें जगास दाखविण्यासाठींच कीं काय येथील एका रंगाऱ्याच्या बायकोनें रागाच्या आवेशांत जीवाला वैतागून लकड गंजांतील एका विहिरीत उडी टाकली त्यासरशी नवरा विहिरींतच सती गेला; पण आसपासच्या मंडळींनी उभयतांना बाहेर काढल्यावर प्रेमाची शुद्धी पुनः जागृत झाली. दोघे ही सुखरूप आहेत.

**सौंदर्यः—** स्त्री पुरुषांना नटण्याची मोठी हौस असते; पण त्यांना शिक्षक चांगला मिळत नाहीं. तेव्हां मनाला व शारिराला सौंदर्यानें परिप्लुत करण्यासाठीं हा ऋतु सायंकाळच्या क्षितिजाकडे बोट दाखवीत असतो. सौंदर्याभिलाषी लोकांनीं त्या वेळच्या सूर्य प्रकाशानें रंगणाऱ्या ढगांकडे दृष्टी देऊन योग्य धडा शिकण्याला विसरूं नये. असें 'सृष्टीसौंदर्य या ऋतूंतच' कवींना स्फूर्ति देत असतें.


# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

## ब्राम्हण लोकांकरितां

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्ट्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कमिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावीत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( अविस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकरितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पल्टण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बन्नू येथें आहे.

नो नं २४२

विक्री संबंधी

# जाहीरात.

( आकोला प्रांत वऱ्हाड येथील मौल्यवान स्थावर जिनगी संबंधानें विक्री )

विद्यमान नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई.

ओ. ओ सी. जे.

दिवाणी दावा नं. ३१९ सन १९१४

१ जेमशेटजी हारमसजी बिलीमोरिया पार्शी

२ हरमसजी जमशेटजी बिलीमोरिया पार्शी

३ मकनजी जगजीवन हिंदू

तीघेही भागीदारींत मर्चंटस् ब्यांकर्स व कमिशन एजंटस् ह्मणून व्यवहार करणारे असून त्यांच्या पेढीचें नांव जे. एच. बिलिमोरिया आणि को, दुकानचा ठिकाणा अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

वादी

विरुद्ध

१ ट्रीमकदास सदाराम

२ फोजमल गुलाबचंद

३ रामगोपाळ बिहारीलाल

सर्वजण हिंदू असून मर्चंट व श्राफ असून त्यांच्या व्यवहाराची दुकानें विठ्ठलवाडी, मुंबई येथें मोतीलाल तेजमल या नांवानें आकोला येथें ट्रिकमदास तेजमल या नांवानें, आणि खामगांव येथें श्रीराम रामगोपाळ या नांवानें आणि या शिवाय इतर ठिकाणीं निरनिराळ्या भिन्न नांवाखालीं.

प्रतिवादी

वरील दाव्यांतील वादीनें दिलेल्या अधिकारान्वयें खालीं सही करणार याजकडून **शनवार ता. ५ आगष्ट १९१६** रोजीं २ प्रहरीं ४॥ वाजतां (स्टँडर्ड टाइम) मुंबई येथील मेडो स्ट्रिट मधील नंबर ९२ येथें असलेल्या लिलावाच्या रूम्समध्यें लिलाव करण्यांत येईल.

वऱ्हाडांतील आकोला तहसिलींतील आकोला येथील मौजे ताजनापेठ येथें असलेला बंगला, औट हौसेस इत्यादि मौल्यवान पुढें वर्णन केलेल्या स्थावर जिनगींत वादींचा व प्रतिवादींचा जो हक्क, मालकी व हितसंबंध असेल तो विकावयाचा आहे. नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई यांनीं तारीख १ आक्टोबर १९१४ रोजीं वरील दाव्यांत जो कंसेंट हुकुमनामा दिला आहे त्यांत दिलेल्या अधिकारान्वयें वादी ही विक्री घडवून आणीत आहेत.

**विक्रीच्या जिनगीचें वर्णन.**

मौजा ताजनापूर ता॰ आकोला जि॰ आकोला येथें जी जमीन किंवा जमिनीचा भाग हा सर्वे नं॰ ९ चा असून अदमासें २८३१ क्षेत्रफळ आहे. त्यावर असलेला बंगला, इतर इमारती व इतर उभे असलेले इमले यासुद्धां याची चतुःसीमा येणें प्रमाणें—

पूर्वेस किंवा पूर्व भागाला—सार्वजनीक रस्ता.

पश्चीम किंवा पश्चिमेच्या भागाला मोर्णा— नदी

दक्षिणेस किंवा दक्षिणेच्या भागाला— नॉर्थ कोट नीनिंग फॅक्टरी.

उत्तरेला किंवा उत्तरेच्या भागाला— सरकारी जमीन व मोर्णा नदीला जाण्याचा रस्ता.

विक्री संबंधानें आणखी लागणारी माहिती व शर्ती ज्यांस पाहिजे असतील त्यांनीं खालीं सही करणार यांच्या आफीस रूम्स नंबर ९२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई येथें किंवा वादी तर्फेचे अटर्णी मेसर्स श्रॉफ दिनशा ॲन्ड धरमसी यांच्याकडे त्यांच्या ऑफिसांत नं. ३७९ हार्नबीरोड, फोर्ट, मुंबई येथें चौकशी करावी.

गांधी ॲन्ड को
लिलाव करणार

नो नं २६१

---

## नोटिशीचा जबाब

शेठ ठाकूरदास गोविंदराम गुजराथी रा. बाळापूर पेठ

यांसः—

गिरधारीलाल केशवदास बाळापूरकर यांचे जयगोपाल विंनतीकीं तुह्मी तारीख २६-६-१६ ची उघडे कार्डातून नोटीस दिली ती पावली. नोटिशींतील मजकूर पाहून आह्मास आश्चर्य वाटलें आह्मी जे देवळाचें काम हातीं घेतलें तें तुमचे व इतर पंच मंडळीचे सांगण्यावरून संमतीनें घेतले. काम सुरुं होण्यापूर्वीं तुह्मी व इतर पंच मंडळींनी आश्वासन दिलें कीं, देवळाचें काम पुरे होण्यास लागणारे पैसे वर्गणीनें गोळा करून देऊं. आतां देवळाचें काम अर्धें झाल्यानंतर व त्या कामांत तुह्मी व इतर लोक पुरेशी वर्गणी जमा करतील या भरंवशावर आह्मी पदरचे पैसे खर्च केल्यानंतर तुह्मी नोटीस देऊन सार्वजनीक कामांत विनाकारण तंटा व अडथळा उत्पन्न करीत आहां हें पाहून आह्मांस आश्चर्य व दुःख वाटते. तसेंच तुह्मास असेंही कळविण्यांत येतें कीं, पंच मंडळीच्या अगर तुमच्या इच्छेविरुद्ध देवळाचे काम करण्याची आमची मुळीच इच्छा नाहीं व आह्मी तें काम यापुढें बंद ठेवित आहों व आह्मी आपले पदरचे पैशानें आणलेला माल मसाला तुह्मास व्यर्थ तकलीफ व खर्च न यावा ह्मणून परत घेऊन जाऊ व आमची अशी ही विंनती आहे कीं आजपर्यंत झालेल्या कामाचा व खर्चाचा आमचे पासून पंचासमक्ष हिशेब घेऊन आह्मास मोकळे करावें व आमचे पदरचे खर्च झालेले पैसे आह्मास परत द्यावें कळावे. यापुढें काम अर्धें राहिल्यास अगर तसेंच पडल्यास व त्या योगानें कांहीं नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी तुमचेवर आहे कळावें आमचे पासून ४ दिवसाचे आंत हिशेब घेऊन आमचे पैसे चुकते करावे न केल्यास आह्मी तुह्मास जातीनें जबाबदार धरू व दिवाणी कोर्टांत दावा करून आमचे पैसे वसूल करून घेऊं ता॰ १४-७-१६ इ.

सही
गिरधारीलाल केशवदास गुजराथी
रा॰ बाळापूर

नो. नं. २६२

---


# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटे, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमतं ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुवाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचें वर्णन भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण-मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मोरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

अपूर्व ग्रंथ ? **मराठी भाषेंत** अपूर्व ग्रंथ

**आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध न झालेला अपूर्व ग्रंथ.**

# वशीकरण विद्या.

अर्थात दत्तात्रय तंत्र हा ग्रंथ दत्तात्रय व शंकर यांचा संवादरूपी असून दत्तात्रयांनीं प्रश्न केल्यावरून शंकरानीं कलीयुगांत त्वरित सिद्धी देणारे प्रयोग सांगितले आहेत. ते मारण, मोहन, स्तंभन, विद्वेशण, वशीकरण, स्त्रीवशीकरण, आकर्षण इंद्रजाल, यक्षिणीसाधन, रसायन विद्या, कालज्ञान, अनाहार, आहार, निधी दर्शन, वंध्यापुत्रवती करण, वाजी करण, भूतग्रहनिवारण, सिंह व्याघ्र निवारण इत्यादी अनेक प्रयोग सांगितले आहेत. किं. ८८ आणे ट. ख. ३

पुस्तकें मागाविण्याचा पत्ता.

ब्रँच आफीस
उंबरगांव जि ठाणें

**पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.**
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७


---

## जाहीर नोटीस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा बंधु नामे रतनसींग वा॥ सुर्यभान रजपुत रा. भिवरी ता. मुर्तिजापुर हा टवाळ लोकांचे नादीं लागून बिघडलेला आहे, अशी माझी समजूत झाली आहे. त्यांनी कांहीं सावकारापासून कर्ज काढलें आहे व कर्ज काढून शैाक करीत आहे. घरा मध्यें लोकांचे उसनवार पैसे काढून त्याजला आणण्याची जरूर नाहीं. कारण माझा व्यापार शेती व सावकारीचा आहे मजला सावकाराचे कर्ज काढण्याचा प्रसंग आतां पावेतों आला नाहीं. हल्लीं कळविण्यांत येते कीं रतनसींग वा॥ सुर्यभान याजला कोणी कर्ज वगैरे देऊ नये अगर त्याजला भूल थाप देऊन त्याजपासून गहाण खरेदी वगैरे लिहून घेऊ नये, त्याचप्रमाणें ज्या लोकाकडून माझें कर्ज येणें आहे त्या पावती घेऊ नये. घेतल्यास मी जबाबदार नाहीं. कारण त्याची चालचलण तूर्त बिघडली आहे. सबब त्याजबरोबर व्यवहार केल्यास मी अगर माझी जिनगी कोणतेही प्रकारें जबाबदार नाहीं. सर्व जिनगीचा वहिवाटदार या नात्यानें व्यवस्थापक मीच आहे. सर्व लोकांना ही गोष्ट कळावी ह्मणून मुद्दाम जाहिर नोटिस देण्यांत आली आहे कळावे ता॰ २०।७।१९१६

सही
जनार्दन वा॥ सुर्यभानसींग रजपुत रा॰
भीवरी द॰ खुद ता॰ २०-७-१६ इ.
मु॰ आकोला

नो. नं. २६३

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150.

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख ३१ माहे जुलै सन १९१६ इ० [ अंक ३०

## हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे अांत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वीं दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिका ऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचें कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

मी ———————————— अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढून घेण्याचा मी अधिकार देत आहे.

————

[ रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास ती किती त्या रकमा त्यांकारितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा. ]

एकूण रुपये........

(अ) माझी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरूं असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

[ (अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा. ]

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ————————————

पत्ता ————————————

तारीख ————————

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ————

रजिस्टर नंबर ————

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

( हा नंबर हेड पोस्ट मास्तरानें घालावयाचा ).

नो. नं. २४१

हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागुन येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

# नोटीस.

## हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

-:❀:❀:❀:-

## ब्राम्हण लोकांकरितां

—:*:0:*:0:*:—

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इनफन्द्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यांतून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावींत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( आवस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बलु येथें आहे.

नो नं २४२

———

विक्री संबंधी

# जाहीरात.

## आकोला प्रांत वऱ्हाड येथील मौल्यवान ( स्थावर जिनगी संबंधानें विक्री )

विद्यमान नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई.

ओ. ओ. सी. जे.

दिवाणी दावा नं. ३१९ सन १९१४

१ जेमशेटजी हारमसजी विलीमोरिया पार्शी

२ हरमसजी जमशेटजी विलीमेरिया पार्शी

३ मकनजी जगजीवन हिंदू

तीघेही भागीदारींत मर्चेंटस् ब्यांकर्स व कमिशन एजंटस् ह्मणून व्यवहार करणारे असून त्यांच्या पेढीचें नांव जे. एच. विलिमोरिया आणि को, दुकानचा ठिकाणः अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

वादी

विरुद्ध

१ ट्रीमकदास सदाराम
२ फोजमल गुलाबचंद
३ रामगोपाळ बिहारीलाल

सर्वजण हिंदू असून मर्चेंट व श्राफ असून त्यांच्या व्यवहाराची दुकानें विठ्ठलवाडी, मुंबई येथें मोतीलाल तेजमल या नांवानें आकोला येथें ट्रिकमदास तेजमल या नांवानें, आणि खामगांव येथें श्रीराम रामगोपाळ या नांवानें आणि या शिवाय इतर ठिकाणीं निरनिराळ्या भिन्न नांवाखालीं.

प्रतिवादी

वरील दाव्यांतील वादीनें दिलेल्या अधिकारान्वयें खालीं सही करणार याजकडून **शनवार ता. ५ आगष्ट १९१६ रोजीं २ प्रहरीं ४॥** वाजतां ( स्टँडर्ड टाइम ) मुंबई येथील मेडो स्ट्रिट मधील नंबर ५२ येथें असलेल्या लिलावाच्या रूममध्यें लिलाव करण्यांत येईल.

वऱ्हाडांतील आकोला तहसिलींतील आकोला येथील मौजे ताजनापेठ येथें असलेला बंगला, औट हौसेस इत्यादि मौल्यवान पुढें वर्णन केलेल्या स्थावर जिनगींत वादींचा व प्रतिवादींचा जो हक्क, मालकी व हितसंबंध असेल तो विकावयाचा आहे. नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई यांनीं तारीख १ आक्टोबर १९१४ रोजीं वरील दाव्यांत जो कॅंसेंट हुकुमनामा दिला आहे त्यांत दिलेल्या अधिकारान्वयें वादी ही विक्री घडवून आणीत आहेत.

**विक्रीच्या जिनगीचें वर्णन.**

मौजा ताजनापूर ता० आकोला जि० आकोला येथें ही जमीन किंवा जमिनीचा भाग हा सर्वे नं० ५ चा असून अदमासें २४३१ क्षेत्रफळ आहे. त्यावर असलेला बंगला, इतर इमारती व इतर उभे असलेले इमले यासुद्धां याची चतुःसीमा येणें प्रमाणें— पूर्वेस किंवा पूर्व भागाला—सार्वजनीक रस्ता. पश्चीम किंवा पश्चिमेच्या भागाला मोर्णा— नदी दक्षिणेस किंवा दक्षिणेच्या भागाला— नॉर्थ कोट जीनींग फॅक्टरी.

उत्तरेला किंवा उत्तरेच्या भागाला— सरकारी जमीन व मोर्णा नदीला जाण्याचा रस्ता.

विक्री संबंधानें आणखी लागणारी माहिती व शर्ती ज्यांस पाहिजे असतील त्यांनीं खालीं सही करणार यांच्या आफीस रूम्स नंबर ५२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई येथें किंवा वादी तर्फेचे अटर्णी मेसर्स श्रॉफ दिनशा ॲन्ड धरमसी यांच्याकडे त्यांच्या ऑफीसांत नं. ३७९ हार्नबीरोड, फोर्ट, मुंबई येथें चौकशी करावी.

गांधी ॲन्ड को
लिलाव करणार

नो नं. २६१

———

## सुबोधमाला.

**सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.**

नामांकित लेखकांचे विचार परिप्लुत निबंध, बोधपर गोष्टी, अनुकरणीय चरित्रें हृदयंगम कविता, चालू कादंबरी वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६. वार्षिक वर्गणी बाहेरगांवीं ट. ख सह १॥= उमरावतीस रु. १॥ उमरावतीचे एजंट रा. सदाशीवराव देशमुख. जानेवारी १९१६ पासून सुरू झालें आहे. एजंट पाहिजेत

संपादक— काशीराव बापुजी देशमुख
अंबागेट उमरावती.

नो. नं. २२३

———

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंपांचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥ सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.

नो. नं. २२४

———

## अस्सल अंगुरी.

# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १४३ आणि १४७ तो. खालिस कस्तुरी रु२९ तो. शुद्ध शिलाजीत ४९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।२।०९ } एजंट
नं १

———

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिळाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनठी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई याजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

———

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुदाम तयार केलेले उत्तम सोन्याचे **सुबक दागिने**— मंगळसुत्र साज, ठुशा-

मोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें सार्थी व धागन्याची वगैरे सर्व जातीचा माल–तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकरणी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर

नो नं ६


# वैद्य वि. ल. थत्ते,

याच्याच औषधानें

# जन्माची मूळव्याध जाते.

शेकडों औषधें घेऊन निराश झालेल्या रोग्यानीं वैद्य वि. ल. थत्ते यांचें औषध अवश्य घ्यावेंच. यानें मोड नाहींसे होतात. रक्त पडणें बंद होते. शौचास साफ होतें

**किंमत एका डब्यास तीन रु.**

**सोल एजन्ट,**

नारायण माधवराव खरे गंजे

२९३ सदाशिव, पेठ, पुणें शहर.

नो. नं. २६४


### नोटीस

नोटीस कलम ३१ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किर. दिवाणी मुकदमा नंबर ५४ सन १९१६ इ.

विद्यमान डिस्ट्रिक्ट जज साहेब बहादुर यांचे कोर्ट मुक्काम आकोला

नांव यशोदा उर्फ गुजाई

मर्द रायोजी वा पुंजाजी

जात निरमाळी राहणार मालखेड

तहसील चांदूर जिल्हा उमरावती

च्या अल्पवयी अज्ञान मुलगी मर्द मोतीराम

उमर वर्षे अंदाज ३

राहणार यवत ता मुर्तिजापूर जि. आकोला

शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता (१) पांडू वा जाणुजी घोडे यास

नेमलाजाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं–

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता पांडु वा जाणुजी यास नेमण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १६ माहे सप्टेंबर सन १९१६ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे, आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २० माहे जुलै सन १९१६ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

V. M. Kelker

डि० जज आकोला

पश्चिम वऱ्हाड

नो. नं. २६९

वऱ्हाडसमाचार

मिति श्रवाण शुद्ध १ शके १८३८

## हिंदुस्थानचा व्यापार.

प्रस्तुत युद्धाचा अंत अद्याप दृष्टीच्या टप्प्यांत आला नाहीं तोंच युद्धानंतर ब्रिटिश साम्राज्याच्या व्यापाराची वृद्धी कशी करतां येईल या विषयींच्या उपायांचें चिंतन ब्रिटिश मुत्सद्दी करूं लागले आहेत. शत्रूराष्ट्रांचें प्रस्तुतचें युद्ध संपल्यानंतर त्याच्या पाठोपाठ जर्मनीशीं व्यापारयुद्ध सुरू व्हावयाचें हें निश्चित धरून पुढील युद्धाच्या तयारीला आतांपासून लागण्यांत ब्रिटिश मुत्सद्यांची दूरदृष्टी स्पष्टपणें दिसून येते. या प्रश्नाचा खल करण्यासाठीं पारिस येथें मित्रराष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक परिषद नुकतीच भरली होती. सांप्रतच्या युद्धामुळें झालेली मनुष्यहानी कोणत्याही उपायांनीं भरून येणें कठीण आहे, पण निदान द्रव्यहानि तरी भरून काढण्यासाठीं जर्मनी आज कित्येक दिवसांपासून तयार माल वखारींत साठवून ठेवीत आहे व तहनाम्यावर सही होतांच हा सगळा माल जगाच्या बाजारांत सर्वत्र पाठवून मित्र राष्ट्रांचा व्यापार रसातळाला पोचविण्याचा जर्मनीचा बेत आहे अशा गप्पा आज पुष्कळ दिवसांपासून ऐकूं येत आहेत. अशा स्थितींत मित्र राष्ट्रांची सावधगिरी फाजील अथवा अनवश्यक आहे असें ह्मणण्याचें धाडस कोणी करणार नाहीं. पण हिंदुस्थानाचें काय? हिंदुस्थानचें हित या व्यापार विषयक प्रश्नांत गुंतलेलें नाहीं काय? हिंदुस्थानानें राजकीय बाबतींत तर आहेच, पण व्यापाराविषयक प्रश्नासंबंधानेंही ब्रिटिशसाम्राज्याचे प्रभावळींत शेवटचीसुद्धां जागा पटकावण्याची पात्रता त्याचे ठायीं नाहीं असें ब्रिटिश मुत्सयांना वाटत आहे काय? जें बादशहाच्या मुकुटांतलें अत्यंत दैदीप्यमान् रत्न समजलें जातें त्याची अशी अवहेलना कां व्हावी? हिंदुस्थान स्वतःच्या हिताला जपूं लागलें व तेथें कारखाने वगैरे निघून त्याचें व्यापारी परावलंबन रुपयांत आणा दोन आण्यांनीं कमी झाले तर तितका आपल्याच जातभाईच्या ह्मणजे ब्रिटिश कारखानेवाल्यांच्या पोटावर पाय येईल अशी भीती ब्रिटिश मुत्सयांस वाटते काय? इतके दिवस जर्मनीचा व आस्ट्रियाचा स्वस्त माल हिंदुस्थानांत स्वच्छंदानें आमच्याघरींदारीं संचार करीत होता. आणि इकडचा कच्चा माल त्या देशीं जात होता; पण या गोष्टीला आळा घालण्याचें ब्रिटिश सरकारनें मनावर घेतलें नाहीं; आणि आतांही शत्रूच्या स्पर्धेपासून बचाव करण्याचे वेळीं हिंदुस्थानाला स्वतःचे पायावर उभे राहतां येण्यास काय केलें पाहिजे, किंवा ब्रिटिश मालाशीं लागणाऱ्या स्पर्धेंत त्यानें टिकाव धरून राहावें ह्मणून उपाय योजण्याची घाई करण्याचीही अवश्यकता सरकारास दिसत नाहीं. याची अर्थ काय? सरकार विषयीं असा अनुदारपणाचा विचार मनांत येणें सुद्धां वाईट खरें; पण पारिस परिषदेच्यावेळीं हिंदुस्थानचें मत कोणी विचारलें नाहीं यामुळें अशी कुकल्पना मनांत येण्यास संधी मिळाली आहे. सुदैवानें सगळेच इंग्रज इतके अनुदारमताचे नाहींत. पुष्कळांना इंग्रजी मुत्सयांचें हें आपमतलबी वर्तन अगदीं नापसंत आहे. उदाहरणार्थ चालूं महिन्याच्या एशिआटिक कॉर्टर्ली रिव्ह्यूमध्यें सर रोपर लेथब्रिज यानीं आपल्या लेखांत हिंदुस्थानाविषयीं हा जाणूनबुजून किंवा न कळत होणारा अन्याय स्पष्टपणें दाखवून त्यावर चरचरीत टीका केली आहे. सर रो. लेथब्रिज यांचे हे विचार आजकालचे नाहींत. मि. जोसेफ चेंबर्लेन यांनीं टारिफ प्रश्नासंबंधाच्या चळवळीला सुरुवात केली तेव्हांपासून सर साहेब हिंदुस्थानचा कैवार घेऊन हिंदुस्थानाला न्याय द्या असें कंठरवानें ब्रिटिश लोकांच्या न्यायबुद्धीला आळवीत आले आहेत. ज्यासवलती ब्रिटिश साम्राज्याच्या इतर अंगांना देण्यासाठीं तुमचा अट्टहास चालला आहे त्या सवलतीपासून हिंदुस्थानाला वंचित कां करतां असा त्यांचा प्रश्न आहे. या प्रश्नाला समाधानकारक उत्तर अद्याप कोणीं दिलेलें नाहीं. सर रोपर यांच्या या मोहिमीला हिंदुस्थानच्या यच्चावत् लोकमताचा पूर्ण पाठिंबा आहे हें दाखविण्यासाठीं त्यांनीं आपल्या लेखांत इकडील पत्रांचे उतारेही दिले आहेत. ब्रिटिश मुत्सयांचा पाठिंबा मिळेल तर हिंदुस्थानाला अजून आपली व्यापारी व औद्योगिक उन्नति करून घेतां येईल. ब्रिटिश सरकारच्या प्रसादाचें यत्किंचित् चिन्ह ही हिंदी लोकांना त्या दिशेनें प्रयत्न करण्यास उत्तेजनदायक होईल; आणि हळूं हळूं एकेक पाऊल पुढें टाकीत हा देश ब्रिटिश साम्राज्यांतर्गत इतर राष्ट्रमालिकेंत आपले योग्य स्थानीं विराजमान होऊन तोऱ्यानें वर मान करून इतरांकडे पाहण्यास समर्थ होईल. सर रोपर यांनीं नुसत्या जकातीपुरताच या प्रश्नाचा विचार केलेला आहे. पण याच्या ही पलीकडे ह्मणजे हिंदुस्थानांतल्या सांपत्तिक द्रव्याचें संशोधन, भांडवल व मजूरी यांच्यांत समता ठेवण्याची तजवीज, औद्योगिक व शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार, वगैरे अत्यंत महत्वाच्या अशा अनेक गोष्टी आहेत कीं त्यांच्याकडे कोणाही जबाबदार सरकारास दुर्लक्ष करणें नीतिदृष्ट्या शक्य नाहीं.

## हिंदुस्थानचें आरोग्य.

आरोग्य आणि शिक्षण या दोन गोष्टींकडे विशेष सहानुभूतिपूर्वक आणि सढळ हातानें खर्च करण्याविषयींचें हिंदुस्थानसरकारचें धोरण या पूर्वी जाहिर करण्यांत आलें आहे. या दोन गोष्टींकडे सरकारी अधिकारी विशेष लक्ष देऊं लागल्यापासून हिंदुस्थानाच्या आरोग्यावर काय परिणाम घडत आला आहे तिकडे साहजिकच लोकांचें लक्ष वेधतें. सन १९१४-१५ सालच्या आरोग्यखात्याच्या रिपोर्टांतलें आंकडे विचार करण्यासारखे आहेत हिंदुस्थानांत गेल्या सालीं दर हजारीं १७ माणसें तापानें, हजारीं १ प्लेगनें, आणि कॉलऱ्यानें ही हजारीं एक याप्रमाणें माणसें मृत्युमुखीं पडलीं! हें प्रमाण विशेषतः तापाचें प्रमाण फारच मोठें आहे यांत शंका नाहीं. तापाच्या मृत्युसंख्येंत मलेरिया पासून घडलेल्या मृत्यूंची संख्याच विशेष आहे. सरकारी अधिकारी आरोग्यासाठीं इतका पैसा खर्च करीत असून व येवढी दक्षता ठेवीत असूनही मृत्यूचें प्रमाण इतर देशांच्या मानानें पहातां फारच मोठें ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. या प्रश्नाचा हिंदुस्थानाच्या दारिद्र्याशीं निकटसंबंध आमच्या मतें येतो. दिवसेंदिवस महागाई वगैरे कारणांमुळें लोकांना सत्वविशिष्ट अन्न खाण्यास मिळेनासें झालें आहे. निर्भेळ दुधाची दुर्मिळता तर सुप्रसिद्धच आहे. सत्त्वविशिष्ट पदार्थ खाण्यास न मिळाल्यामुळें लोकांची रोगप्रतिबंधक शक्ति क्षीण झाली आहे असें चांगल्या चांगल्या डाक्तरांचें मत आहे. ती शक्ति कमी न होतां वाढत जाईल असा कांहीं उपाय न करतां आरोग्यरक्षणाचे इतर उपाय कितीही केले तरी ते व्यर्थ होतात. प्रस्तुतच्या रिपोर्टावरून जर कांहीं सिद्धांत काढतां येण्यासारखा असेल तर तो हाच आहे. रोगप्रतिबंधक शक्ति अंगांत नसल्यानें जरा कांहीं प्रकृतीला विकृति होतांच माणसें कशीं पटकन् मृत्युमुखीं पडतात हें पाहावयाचें असेल तर सुशिक्षित पदवीधरांचें मृत्युप्रमाण वेगळें रिपोर्टांत दाखवावें ह्मणजे खात्री होईल.

## देशी कारखाने.

जोपर्यंत देशांत उद्योगधंद्याची व कारखान्यांची वाढ झाली नाहीं तोपर्यंत त्या

देशाची सांपत्तिक स्थिति कधीं सुधरावयाची नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. तेव्हां हिंदुस्थानाला हा नियम लावून त्याच्या सांपत्तिक स्थितीचें निदान करावयाचें ह्मणजे या देशांतल्या कारखान्यांची मोजदाद केली पाहिजे हें उघड आहे. आज हिंदुस्थानांतल्या कारखान्यांचा आंकडा पाहिला तर त्याचा उच्चार करण्यास ही शरम वाटते. हिंदुस्थानांत आज एकंदर १०७१ कारखाने आहेत. ३१ कोट प्रजेच्या देशांत ही संख्या निदान शंभरपटीनें तरी मोठी पाहिजे होती! या १०७१ कारखान्यांतून २६६ कापडाच्या गिरण्या, ११३ लोखंड वगैरे धातु सामान तयार करण्याचे, व ११० तेल काढण्याचे कारखाने वजा केले तर कागद, काच, रेशीम, औषधें, इतर रासायनिक द्रव्यें, साखर, आगपेट्या, वगैरे वगैरे शेकडों इतर अवश्य लागणाऱ्या वस्तु तयार करणारे सगळे एकंदर कारखाने ५८२ होतात. युरोपांतल्या एखाद्या साधारण शहरांत ही जवळ जवळ इतके कारखाने असतात. जपानसारख्या छोट्याशा--हिंदुस्थानचा एक प्रांत शोभण्या इतक्या लहान—देशांत याच्या शतपटीनें अधिक कारखाने आहेत! आमच्या देशांतली कारखान्यांची ही अल्पसंख्या विचार करणारास अनेक कल्पना खास सुचवील. आमच्या देशांत भांडवल नाहीं असें कोणाचें ह्मणणें आहे काय? पोस्टाच्या सेविंग ब्यांका व इतर ब्यांका यांचे रिपोर्ट पहा. ह्मणजे कोट्यवधि रुपया आह्मी कारखान्यांत न गुंतवितां ब्यांकांत अत्यल्प व्याजानें कसा गुंतविला आहे तें दिसेल. हिंदुस्थानांत मजूर नाहींत असें ह्मणणें आहे काय? नाताळ, फिजी, मारिशस, झांजिबार वगैरे परमुलुखास मुदतबंदी करार करून देऊन व हाल अपेष्टा सोसून हिंदी मजूर चारितार्थ चालवितात कीं नाहींत तें आढळून येईल. आमच्यांत धाडसाची वाण आहे काय? टाटा कंपनीचे कारखाने पहा. ह्मणजे तुमची खात्री होईल. मग कारखाने कां निघत नाहींत? गूढ आहे तें हेंच.

## राज्यरक्षणाचा कायदा.

अलीकडे राज्यरक्षणाच्या कायद्याखालीं सरकारला वाटेल त्या गोष्टी करण्याची सत्ता आपल्या हातांत घेतां येते हें अनेक उदाहरणांनीं सिद्ध झालें आहे, व या कायद्यापुढें न्यायदेवता प्रजेचें रक्षण करण्यास सर्वथा असमर्थ आहे हें न्या. मू. चौधरी यांनीं परवा एका खटल्याचे वेळीं स्पष्टपणें बोलून ही दाखविलें आहे. बिझांट बाईला मुंबई सरकारानें केलेली अटक, कलकत्त्याच्या 'भारत मित्र' पत्राचे संपादक रा. बाबूराव पराडकर यांना पोलिसांनीं कांहीं एक कारण न दाखवितां उचलून नेऊन अटकेंत ठेवणें, वगैरे गोष्टी वाचून या कायद्याच्या अमर्यादित सत्तेची कांहीं कल्पना करतां येण्यासारखी आहे. हा कायदा पास झाला त्यावेळीं दाखविलेलीं कारणें व उपयोग भिन्न होते. ती स्थिति आतां नाहीं. तरी तो कायदा हल्लींच्या काळीं लागू करण्यास सरकारा जवळ सबळ कारणें खास असलीं पाहिजेत. इतरांनीं सावध राहावें ह्मणून हीं कारणें त्यांनीं प्रसिद्ध करावयास पाहिजेत येवढेंच आमचें ह्मणणें आहे. आपल्यावरची जबाबदारी ओळखूनच सरकार अशा जोखमीच्या कामाला प्रवृत्त होत असतें. योग्य कारणा वांचून लोकांत अशांतता उत्पन्न करणारीं अशी गोष्ट सरकार कधीं करणार नाहीं अशी आमची पूर्ण खात्री आहे. एखादे वेळीं चुकीची समजूत होऊन उतावीळपणानें जर हातून भलताच हुकूम सुटला तर खरी हकीकत कळतांच तो हुकूम रद्द केल्याचीं हीं उदाहरणें घडलीं आहेत, हें आह्मांस ठाऊक आहे. ह्मणून राज्यरक्षणाच्या कायद्याचें शस्त्र त्यांनीं उपयोगांत आणिलें या बद्दल आह्मी त्यांना दोष देत नाहीं. फक्त या भयंकर शस्त्राचा प्रयोग करण्याइतका कोणता प्रसंग देशावर ओढवला आहे व अशा प्रसंगीं कशा रीतीनें वागलें असतां या कायद्याच्या तडाख्यांत सापडण्याची भीती उरणार नाहीं येवढें कळण्यासाठींच सरकारानें कारणें प्रसिद्ध करावीं अशी आमची त्यांना विनंति आहे

## युद्धाचा द्वितीय वार्षिक दिन.

सांप्रतच्या भीषण युद्धाच्या सुरुवातीला ता. २३ जुलै रोजींच दोन वर्षें पुरीं झालीं, व इंग्रजांचें आणि जर्मनीचें युद्ध जाहीर होण्यास आणखी ४ दिवसांनीं ह्मणजे ता० ४ आगष्ट रोजीं दोन वर्षें होतील. या दोन वर्षांत जगाच्या इतिहासाचें एकंदर स्वरूप पालटण्याचें केवढें मोठें सामर्थ्य होतें याची बरोबर कल्पना फार थोड्यानांच करतां आली असेल, या दोन वर्षांपैकीं जवळ जवळ दीड वर्षपर्यंत जर्मनीचे ग्रह उच्चीचे होते. भस्मासुराप्रमाणें त्याचा हात जेथें पडला त्याची राख झाली. बेल्ज्यम, व सर्विया या दोन देशांकडे त्याचा कटाक्ष होतांच दोन्हीं देश बेचिराख झाले. पाश्चात्य व पूर्व दोन्ही रणक्षेत्रांत जयश्री कोणाला माळ घालूं अशा मोठ्या विचारांत होती; तिला न्यायअन्याय सगळा दिसत होता. तथापि जर्मनीच्या दराऱ्यामुळें तिच्या अंगाचा थरकाप झालेला होता. पण गेल्या सहा महिन्यांत तो सगळा रंग एकदम पालटला बाल्कन मधला धुमाकूळ बंद पडला. पार्शीया, आशिया मायनर, वगैरे कडे शत्रूंची फजीती झाली. व्हर्डुन घेऊन पारिसवर चाल करून जाण्याचे त्याचे मनोरथ जागच्या जागीं जिरले. आरमारी युद्धाचा अवडंबर घातला खरा, पण तो ही फसला. रशियाजवळ दारुगोळ्याचा पुरवठा नसल्यामुळें त्याचा निरुपाय झाला होता. पण इंग्रजांनीं तो पोचविण्याची तजवीज केल्यामुळें त्याला जोर आला. त्यानें आस्ट्रियाला असा जोराचा फटकारा लगावला कीं पुनः ह्मणून त्यानें वर मान करूं नये. रिगापाशीं जर्मन सैन्य दबा धरून बसलें आहे त्याला पुढें मैदानांत येण्याची छातीच होत नाहीं. हवेंतल्या युद्धांत ही जर्मन वैमानिकांच्या श्रेष्ठतेचा भ्रमाचा भोपळा फुटला. फ्रेंच व इंग्रज वैमानिकांनीं जर्मनीच्या लौकिकाच्या चिंधड्या उडवून दिल्या. व्हर्डुनपाशीं लाखो जर्मन लोकांचें रक्त सांडलें. जर्मनपत्रकर्त्यांच्या फुशारक्या बंद पडल्या जर्मन व्यापाऱ्याला मित्र राष्ट्रांनीं बद्ध करून सोडलें. जर्मनीच्या राक्षसी कृत्यांचा डंका दुनियेभर सर्वत्र वाजूं लागला. इतकें सगळें परिवर्तन गेल्या वर्षांत झालें. या दुसऱ्या वर्षाला प्रारंभ होतांना मित्रराष्ट्रांच्या मनावर नाउमेदीचें जें पटल आलें होतें तें पार नाहींसें होऊन त्यांच्या मुद्रा आज प्रफुल्लित दिसत आहेत. आमावास्येची रात्र संपून उषःकालाला प्रारंभ झाला आहे. अद्याप तह होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं नाहींत व कदाचित् आणखी वर्ष दीड वर्षपर्यंत ही तीं दिसणार नाहींत. तथापि विजयसूर्याचे बाल किरण मित्रराष्ट्रांवर पडून त्यांच्या अंगांत जो उत्साह संचरला आहे तो कांहीं अपूर्व आहे. संकटाच्या काळानंतर प्राप्त झालेल्या सुखाची गोडी कांहीं विलक्षण असते. तसें युद्धाच्या पहिल्या वर्षांतल्या संकट परंपरेच्या मागून सध्याचा जो आनंदाचा, उत्साहाचा आणि आशेचा काळ प्राप्त झाला आहे त्याची योग्यता फार मोठी आहे. हा काळ मित्रराष्ट्रांना युद्ध समाप्तीपर्यंत असाच सदोदित लाभो आणि शत्रूचें पूर्ण निर्दालन करून आपणांस पाहिजेत त्या अटी शत्रूकडून कबूल करून घेण्याचें सामर्थ्य परमेश्वर मित्रराष्ट्रांस देवो अशीच हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेची खऱ्या कळकळीची त्या मंगलमय प्रभू जवळ अहर्निश प्रार्थना आहे.

## आफ्रिकेंत.

व्हिक्टोरिया सरोवराच्या नैर्ऋत्येस बेल्ज्यन लोकांनीं जर्मनीवर जय मिळविला तो फार महत्वाचा आहे. येथें शत्रूचे कित्येक लोक हातीं लागले असून पुष्कळ लूट ही मिळाली आहे. शत्रु दक्षिणेकडे पळत सुटले, पण तिकडे ही पाठलाग चालला आहे.

## कापूस तोलण्याची वजनें.

हिंदुस्थानांत सर्वत्र सारखीं वजनें व मापें असावीं अशी व्यवस्था करण्याची इच्छा हिंदुस्थान सरकारचे मनांत फार दिवस आहे. पण त्या प्रमाणें घडून येण्यास कांहीं अडचणी आहेत. सगळ्या हिंदुस्थानचा प्रश्न राहिला, पण निदान एका प्रांतांत तरी एकच वजनें सर्वत्र चालणें फार इष्ट व सोईचें होईल. आमचें मध्यप्रांत व वऱ्हाडचें सरकार या स्तुत्य उद्योगांत मन घालीत आहे. आमच्या प्रांताच्या उद्योगखात्याच्या डायरेक्टरांच्या विनंतीवरून ता. १७ रोजीं नागपूरच्या सेक्रेटरीएट मध्यें एक कॉनफरन्स भरलें होतें. मुंबई इलाख्याप्रमाणें मध्यप्रांतात ही कापूस तोलण्याचीं वजनें सर्वत्र सारखीं असावीं असें ठरलें, व हा ठराव सर्वानुमतें पास झाला हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो

## आयरिश प्रश्नाचा निकाल.

आयरिश होमरूलसंबंधानें कायमची व्यवस्था युद्ध संपल्यानंतर लागेल तेव्हां लागो, पण तूर्त तरी सर्व पक्षांच्या एकमतानें कांहीं मुदतबंदी व्यवस्था करण्याचें ठरलें आहे व त्याबद्दलचें बिल पार्लमेंट पुढें लवकर येईल असें मि. आस्क्विथ साहेबांनीं हौस ऑफ कॉमन्समध्यें नुकतेंच सांगितलें आहे.

---

सध्या ब्रिटिश राष्ट्राला युद्धाप्रीत्यर्थ रोज ६० लक्ष पौंड खर्च करावा लागत आहे.

---

# राष्ट्रदेवो भव.

**(श्री टिळक महर्षींची देववाणी.)**

प्रत्येकाच्या आयुष्यांत कांहीं अमृत वेळा अशा असतात कीं त्या वेळीं त्याच्या तोंडून अंतःकरणापासून जे उद्गार निघतात त्यांना मूर्तरूप आपोआपच येतें, आणि त्यांतल्या त्यांत राजश्री टिळकासारखे जे राष्ट्रीय संत असतात त्यांच्या वाणीला तर सत्यत्व त्यांच्या अंतःकरणाच्या स्फूर्तीनें सहजच प्राप्त होतें. कमळाचें फूल जसें आपल्या मृण्मय देंठाकडे न पाहतां मनोहर रूपानें वाऱ्यामध्यें डुलत डुलत व सूर्यप्रकाशाचा उज्वलपणा अधिक प्रकाशमान करीत चौफेर सुगंधाची वृष्टि करितें तद्वत् गेल्या ६१ व्या वाढदिवशीं राजश्री टिळक यांची मुखश्री आपलीं ऐहिक सुखें दुःखें विसरून आनंदाच्या निर्भरांत व अंतःकरणाच्या तीव्र वेगानें सर्व इंडियन राष्ट्रास "राष्ट्रदेवो भव" अशी ललकारी देत आहे. गेल्या **केसरी** च्या अंकांत हा सर्व प्रसंग फार बहारीनें वर्णिलेला आहे; पण त्या पेक्षांही राजश्री टिळकांच्या वाणीनें आलेला संदेश सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्या सारखा आहे. ब्रिटिश साम्राज्यानें बेल्ज्यम सारख्या अल्पशा राष्ट्राच्या स्वातंत्र्यश्री साठीं जो प्रचंड युद्धाचा महायज्ञ चालविला आहे, त्याच यज्ञाच्यावेळीं राजश्री टिळक यांनीं राष्ट्रदेव होण्याविषयींची केलेली प्रार्थना सर्व राष्ट्र उचलेल याच्यांत कांहीं नवल नाहीं; पण तेंच उदारधी ब्रिटिश साम्राज्य या अमृतमय प्रार्थनेला व्यावहारिक स्वराज्याचें स्वरूप दिल्याशिवाय कधींही राहणार नाहीं अशी आमची मनोदेवता साक्ष देते. राजश्री टिळक यांचें हें उज्वल, अनुभवानें पुनीत व सर्व सृष्टी आनंदमय करणारें ध्येय त्यांच्याच शद्बांत आह्मी खालीं देत आहों तें असें:—

"प्रियमित्र व सन्मान्य सग्रहस्थहो,

माझ्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त आपण मला जें मानपत्र दिलें व आहेर केला त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे असें ह्मटलें तर माझा आशय व्यक्त करण्यास ते शद्ब फार अपुरे आहेत हें मी जाणतों. पण आनंदादि विकारांची भाषा नेहमींच उद्गाररूपी ह्मणजे अत्यल्प शद्बांनीं व्यक्त होणारी असते हें लक्षांत बाळगून वरील उद्गारांत जो कांहीं अपुरेपणा आहे तो आपण आपल्या थोर मनानें पुरा करून घ्यावा अशी माझी आपणास अंतःकरणपूर्वक विनंति आहे. आणि मला अशी खात्री आहे कीं, आहेर थोडा थोडा ह्मणतांही तो जसा अनेक हजार रकमेपर्यंत गेला त्याचप्रमाणें माझे आभारप्रदर्शक थोडे उद्गारही

आपण उदार अंतःकरणानें वाढवून घ्याल. आजपर्यंत मला आपलें अनेक प्रकारें साहाय्य झालेलें आहे, व त्याचा उतराई मी कसा व्हावें या चिंतेंत असतांच माझ्यावर उपकारांचें आज हें दुसरें ओझें आपण लादलें आहे. जणुं काय, आपल्या ऋणांतून मी कधींच सुटूं नये अशी आपली इच्छा आहे! ही इच्छा लोभाची, प्रेमाची व कळकळीची आहे याबद्दल मला बिलकुल शंका नाहीं. पण ओझें प्रेमाचें असलें ह्मणजे तें कांहीं हलकें होतें असें नाहीं. ह्मणून तें ओझें उचलून आपल्या उपकारांतून मुक्त होण्यास आपल्या सर्वांच्या आशीवार्दानें मला परमेश्वर शक्ती देवो एवढेंच त्याच्यापाशीं मागणें आहे.

"मानपत्र व आहेर यांपैकीं मानपत्राचा स्वीकार करण्यास संकोच वाटत असला तरी औपचारिक रितीनें का होईना मीं त्याचा स्वीकार करतों. पण आहेराची गोष्ट तशी नाहीं; आज आपण मला दिलेली ही रक्कम घेऊन मी काय करणार हें मला कळत नाहीं. मला स्वतःसाठीं ती नको आहे. आणि स्वतःसाठीं ह्मणून ही रक्कम मी घेणें मला वाजवी हे दिसत नाहीं. तेव्हां मी या रकमेचा ट्रस्टी या नात्यानें, कायदेशीर व मला योग्य वाटेल त्या राष्ट्रीय कामाकडे खर्च करण्याकरितां आपण ती माझ्या स्वाधीन करीत आहां, अशाच भावनेनें ती स्वीकारतों. ती माझी नाहीं; अर्थात् ती विश्वासाची ठेव ह्मणून माझ्या हवालीं केली आहे असें मी समजतों; आणि मी आपणास असें आश्वासन देतों कीं वरील रकमेंत माझें स्वतःचें कांहीं तरी तुळशीपत्र घालून, तिचा विनियोग करण्याचें आपण माझ्याकडे सोंपविलेलें काम माझ्याकडून होईल तितक्या कसोशीनें व वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या कामाकडेच करीन. या संबंधाचे कागदपत्र व नियम वगैरे पुढें करण्यांत येतीलच. मी ज्या शर्तीवर ही रक्कम घेत आहे तिजमुळें आपली कांहींशी निराशा होईल. पण अशा वेळीं माझ्या मनाकडे लक्ष देऊन, आपण मला माफी करावी अशी माझी आपणास विनंति आहे

"साठ वर्षें पुरीं होऊन पुढच्या आयुष्यक्रमाकडे दृष्टि देऊं लागलें ह्मणजे मनुष्याचें मन साशंक झाल्याशिवाय राहत नाहीं. निदान माझें तरी तसें झालें आहे. मागील आयुष्यापैकीं चांगल्या दिवसापेक्षां संकटाचेच दिवस अशा वेळीं डोळ्यापुढें उभे राहतात; आणि शारीरिक शक्ति क्षीण होत चालल्यामुळें संकटांतून पार पडण्याची उमेदहि थोडी कमी होत जाते. तथापि, मला अशी आशा आहे कीं, परिक्षेच्या या कठीण प्रसंगींही पूर्वीप्रमाणेंच आपली सहानुभूति मला मिळून माझ्या हातून जे कांहीं थोडेबहुत लोककार्य झालें असेल त्यांत भर घालण्यापुरतें धैर्य व आयुष्य परमेश्वर कृपेनें मला लाभेल कारण असल्या कामांत संकटें हीं यावयाचींच

"आपण माझ्याविषयीं मानपत्रांत जे प्रशंसापर उद्गार काढले आहेत ते पाहून मला "परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसंत. संति संतः कियंतः" या भर्तृहरीच्या वचनाची आठवण होते त्या आपल्या उद्गारांमुळें माझ्या मोठेपणापेक्षां आपली उदारवृत्ति अधिक व्यक्त होते असें मीं समजतों. पण माझी आपणास येवढीच प्रार्थना आहे कीं, माझ्यासारख्या माणसानें केलेल्या यःकश्चित् कामगिरीनें आपण तृप्त होऊं नका. आज आपणा सर्वांपुढें जें राष्ट्रकार्य आहे तें इतकें मोठें व्यापक आणि इतकें जरूरीचें आहे कीं, त्याला आपण सर्वांनीं माझ्यापेक्षां कितीतरी पट अधिक निश्चयानें आणि स्फूर्तीनें लागलें पाहिजे तें दिनावधीवर टाकून चालावयाचें नाहीं. आपली मातृभूमि आपणा सर्वांस या उद्योगास लागण्याबद्दल आव्हान करीत आहे. आणि मला वाटत नाहीं कीं, तिचे पुत्र या आव्हानाचा अव्हेर करतील! तथापि माझें कर्तव्य ह्मणून मीं आपणास शेवटीं एवढीच विनंति करीत आहे कीं, मातृभूमीच्या या आव्हानाकडे लक्ष देऊन कोणताहि भेदभाव न ठेवतां आपण सर्व 'राष्ट्रदेव' होऊं या. येथें चढाओढ नाहीं, मत्सर नाहीं, मानापमान नाहीं व संकटाची भीति धरूनहि उपयोग नाहीं. कार्य सिद्धीस नेण्यास परमेश्वर समर्थ आहे. आपण जें काम करितों त्याचें फळ आज न उद्यां, आजच्या नाहीं तर पुढच्या पिढीस, मिळालेंच पाहिजे हें निश्चित होय. ह्मणून कशाचीही अपेक्षा न धरतां आपण सर्वांनींच या राष्ट्रीय उद्योगास लागलें पाहिजे. ईश्वर करो आणि ही प्रेरणा आपल्या सर्वांच्या मनांत जागृत होऊन माझ्या डोळ्यादेखत मला तिचें अल्प तरी फळ पाहावयास सांपडो एवढीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे."

## नवें महाभारत.

(रा. रा. सी. ब्राऊन यांचे आनंदोद्गार)

गेल्या १४ व्या तारखेला उमरावतीस हिंदी पलटणी तयार करण्यासंबंधानें रा. रा. स्टँडन साहेब कमिशनर यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरली होती. ती सभा फार सुंदरपणें यशस्वी झाली याबद्दल आनंद प्रदर्शित करण्याकरितां रा. रा. सी. ब्राऊन डिपटि कमिशनर यांनीं एक पत्र धाडलें आहे. त्याच्या उत्तरार्धाच्या अखेरीला ते ह्मणतात कीं "माझी आतां पुष्कळ वर्षें वऱ्हाडांत गेलीं आहेत तेव्हां वऱ्हाडच्या लौकिक, सौख्य व अभ्युदय हीं घडवून आणणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल मी काळजी वाहतों. मला अंतःकरणापासून उमेद वाटते कीं मुसलमानच नव्हे तर ब्राह्मण व मराठे इंडियन इतिहासांतल्या या मोठ्या निर्वाणीच्या प्रसंगीं आपापल्या सर्वोत्कृष्ट ईश्वरी स्फूर्तीनें प्रेरित होतील आणि आमच्या या नव्या महाभारताला ज्या ज्या राष्ट्रांनीं हातभार लावलेला आहे त्यांच्यामध्यें आपलाही समावेश होईल अशी मला आशा आहे.

## ब्राह्मणी पलटण

ब्राह्मणी पलटण ही एक स्थानिक सरकारची कसोटीच आहे. ब्राह्मणी अंतरंग समजून घेण्याला हा एक नामी प्रयत्न होय. पण सोन्याची परीक्षा जशी कसोटीच्या धोंड्यावर होते, त्या प्रमाणें अंतरंगाची परीक्षा या ब्राह्मणी पलटणीच्या धोंड्यावर होणारी नाहीं असा आमचा पक्का अभिप्राय आहे. अंतःकरणाला कसोटी अंतःकरणाचीच लागते तेव्हां ब्राह्मणासारख्या ब्रह्माचें शोधन करणाऱ्या अंतःकरणाला स्वागत देणारें राज्यकर्त्यांचें अंतःकरणही तितकें उन्नतम, उदार व वैभवशाली पाहिजे. विश्वासानें विश्वास वाढतो, प्रेमानें प्रेम बलवत्तर होतें व नव्या नव्या आशा मनुष्याला उंच उंच पर्वत शिखरावर नेऊं शकतात; असा हा अंतःकरणांच्या भागीदारींतला नियम आहे. या नियमाला अनुसरून राज्यकर्ते प्रजेच्या हातांत हात घालण्याला अद्याप पुढें यावयाला पाहिजेत तितके आले नाहींत. दोहों मधील अंतर ही फार दूर दूर आहे. त्या पुण्यप्रभावी विक्टोरिया महाराणींनीं जो जाहीरनामा भावी पिढ्यांपुढें ईश्वरी प्रेरणेनें प्रकाशित केलेला आहे त्यांतील समरसता, तुल्ययोग्यता व मंगल भेदभावशून्यता या अद्यापी प्रस्थापित व्हावयाच्याच आहेत. हत्याराचे कायदे व अधिकाराचीं नियंत्रणें यांची कितीतरी उलथा पालथ अजून व्हावयाची आहे. त्या सोन्यासारख्या जाहीरनाम्यानें प्रचलित केलेले मनोभाव या युद्धाच्या समयीं अगदीं समीप येत चालले आहेत हें ही आह्मी विसरत नाहीं. आज ब्राह्मणी पलटणी संबंधानें जो मुख्य मुख्य नगरींतून खल चालला आहे, तो खल शिशीर ऋतूंतल्या मेघगर्जनेप्रमाणें आह्मास तर वाटतो. जर ग्रेट ब्रिटनमध्यें लक्षावधी लोक आपलें सर्वस्व धारातीर्थी अर्पण करून ब्रिटिश राष्ट्राचे दैवी गुण उदयास आणीत आहेत, तर त्याच साम्राज्याच्या अंतर्गत आह्मी ३३ कोटी हिंदी लोक जगाला क्षात्रतेजानें हलवून सोडण्या इतक्या प्रचंड पलटणीच्या पलटणीच राजकर्त्यांना-आह्मी व राज्यकर्ते एकच अशा समभावानें—अर्पण करू तोच ब्रिटिश साम्राज्याचा खरा सोन्याचा दिवस होय. मग त्या कालापुढें या दोनशे ब्राह्मण शिपायांची पलटण ती काय!

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— पर्जन्याच्या पहिल्या नक्षत्र पंचकांतील चाऱ्ही नक्षत्रांनीं मोठी बहार करून सोडली आहे. इतका नियमित, विपुल व सुखकर पर्जन्य क्वचित् क्वचित् कालींच होतो. एकंदर पाणी २० इंचा जवळ जवळ झालें. पण हवेंत चांगला थंडपणा येण्यापूर्वी अजूनही कधीं कधीं उन्हाळ्यांतल्या प्रमाणें उष्मा होतो! हा यंदाचा विशेष आहे. पिकें जोमांत व जनावरें आनंदांत पाहून सर्व जण आशेचा पेला आकाशाच्या अद्भुत रंगांनीं आपापल्या बुद्धीवैभवा प्रमाणें बनवीत आहेत. अशा वेळीं रोगराईला आश्रय न देतां आरोग्य आपलें साम्राज्य स्थापो अशी ईश्वरा जवळ प्रार्थना आहे

आलिशान नामदार चीफ कमिशनर सर बेंजामिन राबर्टसन हे येत्या शनीवारीं प्रातःकाळीं उमरावतीस येऊन रवीवारीं रात्री परत नागपुरास जाणार आहेत. या विशेष आगमनाचें प्रयोजन अद्याप कळलें नाहीं.

**प्रांतिक काउन्सिल**—तारीख १६ आगष्ट रोजीं प्रांतिक काउन्सिलची बैठक नागपुरास भरणार असून त्यावेळीं प्रांतिक बजेट व आणखी दोन बिलें काउन्सिलपुढें मांडण्यांत येणार आहेत.

रा. रा. जे. मे एक्स्ट्रा आसि. कमिशनर नागपूर यांस एलिचपूर सब डिव्हीजनवर नेमण्यांत येऊन तेथील रा. रा. वॉटरस्टन यांची बिलासपूरकडे डिपटि कमिशनरचे जागीं नेमणूक झाली.

**प्लेग- स्वागत**—आकोला तालुक्याचे सरहद्दीवर प्लेग डोकावू पहात आहे व त्याचें आगमन शहरांतील उंदीरही आपल्या खडखडाटानें व विपुल प्रजाधनानें लोकांस ध्वनित करीत आहेत. अशावेळीं आमच्या नागरिकांनी आगाऊच तजविजी करण्यासाठीं गेल्या गुरुवारीं येथील थिएटरांत जाहिरसभा भरविली होती. आमचे लोकप्रिय डिपटी कमिशनर रा. रा. जठार हे अध्यक्ष होते. त्यांनीं प्लेगासंबंधीचा सर्व नवा जुना प्रपंच लोकांपुढे मांडला. त्यावर वादाविवाद बराच झाला. राजश्री मश्रुवाले वकील यांनीं सरकारी पद्धतींतले दोष दाखविले व राजश्री जठार यांनीं त्या भाषणाचा आदर आपल्या अधिकाराची बाजू दूर ठेऊन मोठ्या प्रेमानें केला. स्थानत्याग व प्लेगच्या देवी या उपायाविषयीं लोकांची जागृती करून गरीब लोकांना मदत करण्याविषयीं ही एक निराळी स्वागत कमिटी नेमण्यांत आली. प्लेगाच्या ऐन वेळीं सुरक्षित भागांत पुष्कळ लोक धावपळ कारितात व तेथें प्लेगाला नेऊन पोंचवितात, असा अनुभव आहे. त्याची पुनरावृत्ती न होण्यासंबधानें सर्व सभेचा विशेष कटाक्ष होता. या पुढें वेळोवेळ प्लेग कामिटीच्या योजना प्रसिद्ध करण्याचा आह्मी विचार केला आहे.

## नोटीस

वि. सीनीअर सबजज्य साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टांत

अर्जदार

सिताराम गुरु भगवानदास बैरागी रा० श्री खोलेश्वर संस्थान आकोला हे श्री खोलेश्वर संस्थान आकोला तर्फे वहिवाटदार व मालक आहेत.

या नोटीशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें मयत नैनसुखदास बलदेवदास राहणार आकोला यांचे लोकांकडून घेणें असलेल्या रकमांची वसुली करण्याकरितां सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल कि. अर्ज नंबर १४ सन १९१६ चा या कोर्टांत ता. १४-७-१६ इ. रोजीं दाखल केला आहे. या अर्जाची सुनावणीची ता० २-९-१६ ची नेमली आहे. तरी या संबंधीं कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्यानें स्वतः अगर आपला लेखी जबाब वरील तारखेस या कोर्टांत दाखल करावा. त्याप्रमाणें न केल्यास अर्जदार यांस वरील तारखेस सर्टिफिकेट दिलें जाईल. व मग पुढें या संबंधानें कोणाची कांहीं तक्रार ऐकली जाणार नाहीं.

Sd/ D. K. Kolatkar.
सीनीअर सबजज्ज सा. कोर्ट आकोला

नो० नं० २३९

## नोटीस

रा. रा. भांऊ चंद्रभान पाटील राहणार सोगोडे ता. जळगांव जि. बुलठाणा

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे दुकानावर मुखत्यारपत्रानें काम करीत होते. तुह्मास हिशेब समजून देण्यास दोन वेळां मनुष्य पाठावेला, परंतु आपण न येऊन आपणाजवेळ असलेले कागदपत्र वगैरे पाठविले नाहीं. हल्लीं नोटिस पावल्यापासून चार दिवसाचें आंत मुखत्यारपत्र वगैरे कागदपत्र घेऊन येऊन आमची पावती घ्यावी. या नोटिशीनें तुमचे जवळ असलेले मुखत्यारपत्र व तुमची नौकरी वरील तारखेपासून बंद केली जाईल. ह्मणजे नोटिस पावल्यापासून चार दिवसाचें आंत न आले तर पगार बंद व मुखत्यारपत्र रद्द असें समजावे कळावें. ता. १८-७-१६ इ. मुक्काम काटगव्हाण

सही

लक्ष्मण व रामराव वा॥ शंकरजी पाटील
अज्ञान पालन करणार चंद्रभागाबाई
जवजे शंकरजी पा. दु. काळगव्हाण ता. दर्यापूर जि. उमरावती नि. खु. हा. बां.

नो. नं. २६६

## नोटीस

नोटिस बेशमी भगवानजी वा नागोजी जात लिंगाइत म्हांली रा. ढवसरी पो. लोणी ता. व जिल्हा उमरावती

यांसीः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी आपले तर्फे सरासरी दोन वर्षांपूर्वी तुह्मास कुलमुखत्यारपत्र दिले होते. तरी या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, ते तुमचे कुलमुखत्यारपत्र आज रोजीं मी रद्द केले आहे. करितां या पुढें त्या कुलमुखत्यारपत्रांतील शर्तिप्रमाणें कोणतेही प्रकारचा व्यवहार तुह्मी करूं नये. केल्यास तो रद्द समजला जाऊन त्या बद्दल मी जबाबदार राहणार नाहीं. ही नोटिस लिहून दिली सही ता. २३ माहे जुलै सन १९१६ इसवी.

सही

सहीची नि॥ बांगडी जनाबाई मर्द
नारायणजी जात लिं. ह्माली रा.
चिखली ता. दारव्हा जि. यवतमाळ इचे हातची असे

नो. नं. २६७

## जाहीर नोटीस

बुनी मर्द नागो हटकरें रा. पानगांव ता. मुर्तिजापूर किंवा रा. पळाण ता. मुर्तिजापूर

इसः—

मी खालीं सही करणार कळवितो कीं, तूं माझी गंधर्वाची बायको असून सात आठ वर्षें माझे घरीं नांदली. तीन चार महिन्यापूर्वीं माहेरी गेली तेव्हां पासून माझे येथें नांदण्यास आली नाहीं. समजून मी तीन चार वेळां तुला घेण्याकरितां आलो. आज उद्या येते अशी थापा देत आली. व महिन्यापूर्वीं मुलालाच पाठऊन दिलें तूं आली नाहीं. यावरून आतां तूं माझे येथें नांदण्यास येत नाहीं असें समजून हात नोटिस केली ती तूं घेतली नाहीं. यावरून ही जाहीर नोटिस दिली आहे. तेव्हां माझे हातचे दागिने सोने चांदीचे व नगदी ठेविलेले मिळून किंमत अजमासे रु. १५० दिडशाचे आहेत. ते दागिने माझे मला आठ दिवसाचे आंत देऊन त्याची पावती घेणें. आणि तूं माझे घरीं नांदण्यास येणें. या दोन्ही गोष्टीस कबूल नसल्यास कोर्टमार्फत दिवाणी फौजदारी अगर दोन्हीही फिर्याद करीन. त्याचा खर्च सुद्धां सर्व तुला द्यावा लागेल. कळावें ता. २४ ७-१६

सहीची नि॥

नागो वा शामजी हटकर रा.
शेलुबाजार

नो. नं. २६८

## जाहीर नोटीस

रा. रा. बळीरामजी वा॥ सितारामजी. ठाकूर रा० कारंजा ता० मुर्तिजापूर जि० आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास ता० १७ जुलई सन १९१२ इसवी रोजी आममुखत्यारपत्र आमची दुकानातील व कोर्टातील वगैरे कामे करण्यास दिले होते तर तुमचा आमचा बेबनाव झाल्यामुळें ता. ३१-५-१९१६ इ. रोजी कामावरून बरतर्फ केले आहे तर आह्मी आतां या पुढें तुह्मास दिलेल्या मुखत्यारपत्राचे आधारे तुह्मी कोणते ही काम आमचे करितां करूं नये व कोर्टा संबंधी वगैरे आवंतर सर्व हिशेब आह्मास समजून द्यावे व आमचे कागदपत्र तुमचे जवळ जे असतील ते आह्मास आणून द्यावे व याच नोटीशीनें दुकानचे सर्व आसाम्यास व सर्वत्र लेकांस कळविण्यात येते की सदरहू रामजी वा॥ सितारामजी ठाकूर यांचे मुखत्यारपत्र रद्द केले असल्यामुळे त्याजबरोबर दुकान संबंधी कोणताही व्यवहार करूं नये केल्यास त्या बद्दल व्यवहार करणारा स्वतः जबाबदार राहील आमचे कडेस कोणती जबाबदारी नाहीं. दस्तूर गणपत रामचंद्र मुखत्यार तारीख २९-७-१९१६ इसवी

नो. नं. २९६ सही

देविदास गंगाधर चवरे द० खुद

## नोटीस

रा. रा. लादूराम बोदलाल साहु दुकान कसबे रिसवड ता० वाशीमं जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचेकडे तुमचे कांहींच देणें राहिले नाहीं. एक दस्ताऐवज तुमचे पाशी आहे. तो दस्ताऐवज व खातेबाकीची पावती ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आणून द्यावी. न दिल्यास सर्व कागदपत्र रद्द असें कळावें ही नोटीस दिली ता० २२।७।१६ इ.

सही

खंडेराव लक्ष्मण देशमुख द० खु०

नो. नं. २७० ता० वाशीम

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार जमना भ्रतार भिमाजी रंगारी रा० वाशीम

यांसः—

भरतार भिमाजी वल्लद राजाराम रंगारी रा. वझर ता. जिमपूर जि. परभणी याजला जाहिर नोटीशी द्वारे कळविण्यांत येतें कीं मला आपण माझी प्रकृती ना दुरस्त असल्यामुळें मला आपण गोपाळ, बळीराम, मनाजी या तिघा इसमाबरोबर मला आपण माहेरी पाठविली त्या वेळेस आपल्या येथील डाग फक्त चांदीचे पाटल्या तोळे ७ व माझी मुलगी नामे कौसल्या इचे अंगावर डाग नग २ बिंदले चांदीचे तोळे दोनचे व कोपर कड्या तोळे ४ चांदीच्या येणें प्रमाणें डाग माझे व माझ्या मुलीचे अंगावर होते या शिवाय एक सुतळीचा सडा देखील नव्हता याला साक्षीदार येथील पंच आहेत. मी आपले माहेरी ३॥ वर्षांपासून माझ्या मुलीसह राहत आहे तरी आपण जर मला वागवित असाल तर माझा व माझे मुलीचा खावठी बद्दल दरमहा १२ रुपये प्रमाणें ३॥ वर्षांचे ५०४ रुपये देऊन मला घेऊन जावें असे न केल्यास माझे वरील व मुलगी कवसल्या इजवरला आज तारखेपासून दोन महिन्याचे आंत न नेल्यास कोणत्याही प्रकारचा हक्क न राहून माझे खावटीबद्दल ५०४ रुपये कोर्ट मार्फत खर्चा सुद्धां घेतले जातील हे या जाहीर नोटीशी द्वारे आपणास कळविले आहे कळावें तारीख १८-७-१६ इ.

सहीं

जमना भ्रतार भिमाजी हातचा
आंगठा खुद्द असे

नो. नं. २७१


Oriental Government Security
Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

**FUNDS exceed 5 CRORES.**

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

**A Novennial Record of Progress.**

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1.034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63.407 |
| 1915 | 64 738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30 109 | 1,70,695 |
| 1888 | 11,..'8,6 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,9 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

***SPECIAL FEATURES.***

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

—:0—

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager
Bombay.

or

*A. C. Lal,*
Branch Secratary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.